
साप्ताहिक

# माणूस

११ जानेवारी ७५/२ रुपये

## मोटार वाहतूक

सदैव रस्त्यावर असणारा धंदा







बॅक बेंचर्स...
ज्युनिअर ऑफीस...
मिनिस्टर्स ऑफ स्टेट...
आणि आता ???

## 'रायल' कादंबरीचा चौथा भाग

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे
अंक : चौतिसावा

१९ जानेवारी १९८५

किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये




प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
सुरेश नावडकर

## मुंबापुरी

### आम्ही तयार आहोत !

मुंबईत सध्या बऱ्यापैकी थंडी आहे असं म्हटलं तर पुणेकर मंडळी ते थट्टेवारी नेतील. मुंबईत असून असून थंडी ती केवढी असणार ?

ठीक आहे; पण तुम्ही डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मुंबईत असायला हवं होतं. आम्हाला साक्षात हुडहुडी भरली होती अन् टी. व्ही. सुरू केला की विचारायला नको. अगदी कंबल लपेटून आम्ही गपगार. काही बोलण्याची सोयच नाही.

—लोक म्हणाले की, लाट आली की अशीच हुडहुडी भरते. आम्ही आपली मान डोलावली. दुसरं करणार तरी काय ? लाटच ती. तिच्यापुढे कोणाचं काय चालेल ?

आता आम्ही सध्या बरे आहोत. म्हणजे काय की थंडी आहे. अगदी गुलाबी थंडी आहे; पण ह्या थंडीचा अन् लाटेचा काहीएक वास्ता नाही. ही थंडी म्हणजे आपली नेहमीची नॉर्मल थंडी आहे.

म्हणून आम्ही स्वेटर, शाल वगैरे लेवून सध्या मजेत हिंडत-फिरत आहोत. लोक म्हणतात की, आमची प्रकृती सुधारलीये. किंचितशी.

पण म्हणून हुरळून अजिबात जायचं नाही असं आम्ही ठरवलंय. ऊतू नये, मातू नये. मग काय करावं ? मार्चमध्ये येणाऱ्या नव्या लाटेची वाट पहावी. आता ही नवी लाट कशी येते अन् काय होते, त्याचे अदमास ( मनातल्या मनात ) करत बसायचं. लिहिण्याचीही सोय नाही. नाहीतर पुन्हा हुडहुडी भरायची अन् एकसारखी अशी येता-जाता हुडहुडी भरत राहिली तर वृत्तपत्रस्वातंत्र्याचं भविष्य धोक्यात नाही का येणार ? तेव्हा, नव्या लाटेच्या स्वागतार्थ फ्लोराफाऊंटनपाशी आम्ही आमच्या झुंजार अन् निर्भय इन्व्हेस्टिगेटिव्ह बातम्यांची होळी पेटून ठेवलीये.

### नट-कम-नगरसेवक

स्मिता पाटीलला विधानसभेचं तिकीट मिळेल असं सध्या सगळेजण बोलतायेत. चांगलं आहे. राजकारणात, गांजलेल्या-पिचलेल्या जनतेचा प्रतिनिधी असायला हवाच. प्रत्येक वेळी त्या अहिल्या रांगणेकर अन् मृणाल गोरे कशाला हव्यात ?'

खरं तर कॉर्पोरेशनमध्येही सिनेमातली मंडळी यायला हवीत. म्हणजे कुंभारवाड्याहून पद्मिनी कपिला, कुलाब्याहून आयेशा दत्त, दहिसरहून सुलक्षणा पंडित अशा अत्यंत खानदानी, सोज्वळ, घरंदाज वळणाच्या होतकरू मुलींना तिकिटं द्यावीत. त्या सिनेमात असल्या म्हणून काय बिघडलं ? राजकारणात नवे वारे नको का वाहायला ?

ही मंडळी निवडून आली की, आम्हाला रिपोर्टिंगलाही बरं पडेल. स्थायी समितीत हरकतीचा मुद्दा उपस्थित करताना हल्लीचे नगरसेवक खूपच गलिच्छ बोलतात अन् ओंगळ हावभाव करून सदनाचं पावित्र्य कमी करतात.

पद्मिनी कपिला किंवा सिल्क स्मिता जर स्थायी समितीत असेल आणि महापालिका आयुक्तांनी त्यांच्या भावनांची योग्य कदर केली नाही तर त्यांनी चक्क कमिशनरांभोवती फेर धरावा.

हल्लीचे नगरसेवक लोक सभागृहात सतत हमरीतुमरीवर येऊन बोलतात. त्याऐवजी मॅकमोहन, प्रदीपकुमार वगैरे लोक असले की, ते चक्क गँगवॉरच सुरू करतील. नाहीतरी माईक फोडण्याची अन् चपला फेकण्याची थोर, उदात्त परंपरा आहेच ना आपल्याकडे. त्यात ह्या गँगफाइट्सची भर पडेल. 'एक नया इतिहास बनायेंगे' असं एक द्रष्टा, लोकोत्तर कवी म्हणून गेलाय.

नटमंडळींनी एकमेकांच्या उखाळ्या-पाखाळ्या काढताना 'खानदानची इज्जत' न विसरता काढावी. तेवढं आम्हाला रिपोर्टिंगला बरं पडेल. नाही तर म्युन्सिपाल्टीत डेली हल्ली काही कॉपीच मिळत नाही.

एखादा नट–कम–नगरसेवक परलोकवासी झाल्यास सगळ्या नट–कम–नगरसेवकमंडळींनी एक सुरात एखादं सॅड साँग गावं अन शक्य तेवढी जाम 'सिंपथी' क्रियेट करावी. सध्या सहानुभूतीला बरे दिवस आलेत.

## ☐ जितके अर्वाच्य, तितके जहाल

'पेन इज मायटीअर दॅन स्वोर्ड' असे आम्ही घसा खरवडून सांगितले तरी मुंबापुरीतल्या कामगार पुढाऱ्यांना ते मान्य दिसत नाही. 'चाकूने तासल्याशिवाय बोरुला धार येत नाही.' असे आमचे परममित्र गुलाब जोशी यांनी आम्हाला खाजगीत सांगितले.

गेल्या आठवड्यात महाराष्ट्र टाइम्सच्या फोरमनवर कामगार उत्कर्ष सभेच्या अनुयायांनी सुरी हल्ला केला. टाइम्समध्ये गुलाब जोशींची युनियन आल्यानंतर घडलेली हिंसाचाराची ही पहिलीच घटना नव्हे. गेल्या पाच–सहा महिन्यात असे एकूण चाळीस प्रकार घडले आहेत.

वसंतदादांनी मागेही गुलाब जोशींचा हा टाइम्समधील उत्कर्ष आटोक्यात आणण्याचे आश्वासन दिल्याचे आम्हाला आठवते. पण जोशींनी तब्बल दोन महिने कंपनी बंद पाडली तरी त्यांच्या केसालाही धक्का लागला नाही.

मागे दत्ता सामंतांनी इंडियन एक्सप्रेस आणि लोकसत्ता तीन महिने बंद पाडले होते. वृत्तपत्र निर्मितीची प्रक्रियाच अशा प्रकारची असते की, प्रिंटिंग सेक्शनमधल्या मुठभर लोकांनी मनात आणले तरी एका दिवसात त्यांना लक्षावधी वाचकांची गैरसोय करता येते. पत्रकारांनी संप केला तरी वृत्तपत्र छापता येते; पण छपाई कामगारच संपावर गेले तर सारा कारभारच ठप्प होतो.

पण याचा अर्थ आमचा संपावर रोष नाही. 'लोकशाही मूल्यांची जोपासना' करण्यासाठी छपाई कामगारांनी आपल्या मागण्या विसरून वृत्तपत्रे जगवण्यास कंबर कसावी असे आमचे म्हणणे नाही. पण वृत्तपत्रे म्हणजे काही गोल्डन टोबॅको कंपनी किंवा गोदरेज फॅक्टरी नव्हे. कामगार नेतृत्व कोठेही सुसंस्कृतच हवे. ह्या क्षेत्रात तर त्यांची अधिकच गरज आहे.

टिळकांच्या शिक्षेनंतर मुंबापुरीत पहिला संप झाला होता. त्यानतर कामगार नेतृत्वात क्रांतिकारी बदल घडत आज हे नवे नेतृत्व उदयाला आले आहे. आर. जे. मेहेता, जॉर्ज फर्नांडिस, दत्ता सामंत, भाऊराव पाटील असा प्रवास करत करत आज गुलाब जोशीही कामगारनेते म्हणून खपले जात आहेत. तुम्ही जितक्या अर्वाच्य घोषणा द्याल तितके तुमचे नेतृत्व जहाल.

गांधीजींनी स्वातंत्र्य लढ्यात शेवटापेक्षाही साधनशुचितेवर जो 'अवास्तव' भर दिला त्याचे महत्त्व आजची कामगार चळवळ पहाताना जाणवते. असो. आता शेवटी थॉट फॉर द वीक :–

Politics is not the only resort of a scoundral – he also has the trade union movement.

—विष्णु जयदेव

---

ह्या ना त्या निमित्ताने

# एकविसाव्या शतकाची तयारी

फिरोझ रानडे

'पण तुम्हाला इतका साधा अंदाज करता येत नाही ?' श्याम कातावून म्हणाला, म्हणजे प्रश्न विचारता झाला होता. 'वर्षांनु वर्ष स्वैपाक करता आहात. घरातल्या माणसांना किती पोळ्या लागतात त्याचा अंदाज तुम्हाला नाही ?'

'आता अंदाजाचे दिवस गेले !' राधा शांतपणे म्हणाली, 'आता आपण २१ व्या शतकात जाणार आहोत. त्याची तयारी केली पाहिजे.'

'त्याची तयारी म्हणजे आमची उपासमार. घरातल्या लोकांना भूक किती आहे हे घरच्या बाईला कळत नाही...'

'सांगितले ना तुम्हाला एकदा आता अंदाजाचे दिवस राहिले नाहीत.' जवळ जवळ ३१ डिसेंबरपासून राधाने शांतपणे व स्पष्टपणे बोलण्याचे व्रत घेतले होते. थंडी होती म्हणून की देशात तसे वातावरण होते म्हणून नकळे, पण अंगाभोवती शालही गुंडाळू लागली होती.

आता राधाशी काही बोलण्यात अर्थ नाही हे श्याम उमजला व पानावरून जेवण संपवून पण पाऊण पोटीच उठून हात धुवायला गेला.

राधा–श्यामच्या घराचे चित्र गेल्या महिन्यापासून बदलले होते. बाकी जग एकविसाव्या शतकात जायला अजूनी सोळा वर्षे होती तरी त्यांचे घर त्या शतकात आधीच पोहोचले होते.

आणि ह्या सगळ्याला कारण होता राधाचा कोणी मामे की मावसभाऊ. तो अमेरिकेहून काही दिवसाकरता सुट्टीवर आला होता. त्यातले चार दिवस तो श्याम-राधाकडे राहिला होता आणि त्या चार दिवसात त्या भावाने त्यांच्या संसारात चौफेर सुधारणा घडवून आणली होती. खुद्द सुधारणा मात्र चौफेरात झाली होती.

आतापर्यंत श्यामची आई, बहिणी, वहिनी एवढच काय पण अगदी राधासुद्धा साधारण त्यांच्या नेहमीच्या अंदाजाने स्वैपाक करत. भात किती टाकायचा, कणिक किती घ्यायची वगैरे गोष्टी त्यांच्या अंदाजाप्रमाणे व अंदाजेच घेत असे. साधारण अडीच वाट्या तांदूळ, चार–पाच वाट्या कणिक घेतली म्हणजे त्यांच्या लहानशा व म्हणून सुखी संसाराचे त्या दिवसाच्या जेवण्याचे निभाऊन जात असे.

आणि समजा कधी अेखाद–दिड पोळी राहिली वा थोडा भात राहिला तर तो वाया

जात नसे. कारण दुसऱ्या दिवशी चांगला फोडणीचा भात व पोळीचा साखर–तूप घालून केलेला लाडू करता येत असे. लहानपणापासून असा भात व लाडू खाल्ल्यामुळे श्यामला ते आवडत असे व नेहमी बनवत असल्यामुळे त्यांच्या मुलांनाही त्याचा लळा लागला होता.

त्या अमेरिकन भावाने प्रथम राधाची कान उघाडणी व मग मन भरवणी केली. राधाने त्या दिवशी भाताकरता तीन वाटद्या तांदूळ घेतो आहोत सांगितल्यावर तो रागाने म्हणाला, 'आपण लोक किती अडाणी राहिलो आहोत!'

'ते कसे काय?' राधा थोडा राग, जास्त आश्चर्य व खूप जास्त कौतुकाने विचारती झाली. कारण तो अडाणी म्हणत होता तरी अमेरिकेत मोठ्या हुद्यावरचा व मोठा पगार मिळवणारा होता व त्यातून तो तिच्या माहेरचा होता. त्यामुळे थोडा राग व खूप आश्चर्य व कौतुक.

राधाच्या 'ते कसे काय?' प्रश्नाला त्या भावाकडे उत्तर तयार होते. 'हे बघ ह्या तीन वाटद्या तांदूळाला काही अर्थ आहे का? आधी वाटद्या असतातच मुळी किती तरी धातूच्या व आकाराच्या. तेव्हा लहान आकाराच्या तीन वाटद्या तांदूळ व मोठ्या आकाराच्या तीन वाटद्या तांदूळ ह्यात फरक नाही का पडणार? तरी मी ह्या वेळी वाटद्यांच्या धातूचा प्रश्न उपस्थित करत नाही आहे. काशाची, पितळेची, स्टेनलेसची जाडी वेगवेगळी असते. त्यामुळे काशाच्या तीन वाटद्या तांदूळ व स्टेनलेस स्टीलच्या तीन वाटद्या तांदूळ ह्यात फरक पडणार नाही का?'

आता सगळे आयुष्यभर वाटद्यांनी तांदूळ मोजूनसुद्धा वाटद्या इतक्या भानगडीच्या असतील असे राधाला कधी वाटले नव्हते. त्यामुळे त्याचे सगळे बोलणे तिच्या अगदी डोक्यावरून गेले तरी पण ती धीर करून म्हणाली,

'अरे माधव, आम्ही बायका आयुष्यभर अशाच वाटद्यांनी भात टाकत आलो आहोत व पोळ्या करता कणिक घेत आलो आहोत. आमचे कधी अडले नाही की बिघडले नाही.'

'हेच तर चुकते आपणा भारतीयांचे!' नशिब तो निदान 'आपणा' भारतीयांचे तरी म्हणत होता. त्याने 'तुम्हा' भारतीयांचे म्हणायला पाहिजे होते. कारण त्याच्याकडे अमेरिकेचे ग्रीन–कार्ड होते. 'आतापर्यंत काही अडले नाही वा बिघडले नाही, ह्या वाक्याला काही अर्थ नाही. कारण बिघडते कुठे हेच तुम्हांला कळत नाही व कळणार नाही.

'समजा तुमच्या दररोज दोन पोळ्या उरतात, म्हणजे वर्षाला किती झाल्या? ३६४ गुणिले २ म्हणजे किती?'

राधाचे पाढे आधीच कच्चे तेव्हा २×३६४ हा हिशोब तिला कसा जमावा. बरे चार दुणे आठ, सहा दुणे बारा वगैरे हिशोब करावा तर तिला तोंडी हातचे धरणे वगैरे प्रकार जमत नसे. त्या अमेरिकन भावाकडे तेव्हा कॅलक्युलेटर नव्हता त्यामुळे त्यालाही ३६४×२ हे गणित जमेना. श्याम सरकारी नोकर त्याने चटकन ३६० मनाशी धरले व दोनाने त्याला गुणून ७२० पोळ्या वर्षाला उरतील म्हणून सांगितले. श्यामची चलाखी पकडली जाण्याचा संभवही नव्हता.

'म्हणजे वर्षाला तुमच्या ७२० पोळ्या वाया जातात.' तो भाऊ आनंदाने व अभिमानाने म्हणाला.

'वाया कशा जातात? आम्ही त्याचे लाडू करून खातो.' श्यामने तेवढ्याच आनंदाने व अभिमानाने उत्तर दिले. राधानेही संकटाच्या वेळी कामी आला म्हणून त्याचेकडे कौतुकाने पाहिले.

'पण शिळ्या पोळ्या खा कशाला?' भाऊ आपले म्हणणे पुढे ढकलत म्हणाला. 'पोळ्यातली जीवन-सत्वे शिळ्या झाल्यावर कमी होतात. वर साखर खाल्ली जाते, तूप खाल्ले जाते! दोन्ही गोष्टी शरीराला तापदायकच.'

'मग तुझं म्हणणं काय आहे?' राधाने विचारले.

'प्रथम स्वैपाक–तराजू आणा. आमच्या बोस्टनला फार छान मिळतात, येथे इंडियातही तयार होत असतील.'

'त्या तराजूचे काय करावयाचे?' आता श्यामला भावाच्या बोलण्यात रस निर्माण झाला होता. कारण गेले कित्येक वर्ष डॉक्टर श्यामला साखर कमी करा, तूप कमी खा म्हणून सांगत होते.

'तराजू आणल्यावर हे तीन–वाटद्या आणि चार वाटद्या प्रकार अगदी बंद! तांदूळ, कणिक, मीठ काय जायचे ते ग्रॅममध्ये! व त्याप्रमाणे स्वैपाक करावयाचा. म्हणजे नको काही वाया जायला वा काही शिळं खायला.'

येथपर्यंत सगळे ठीक झाले होते. श्यामने लगेच स्वैपाक–तराजू आणला, वजने–मापे घेऊन आला व त्याघरचे जेवण सगळे तोलून मापून होऊ लागले.

पण सुधारणेचे फक्त पहिले पर्व होते. दोन दिवसांनी श्यामच्या मेव्हण्याने नवीनच बूट काढला. आपला देश म्हणजे चपला व जोडा घालणाऱ्यांचा देश तेव्हा 'नवीन बूट काढला' हा शब्दप्रयोग कसा आला असेल बरे? असा विचार करेपर्यंत भावाने बहिणीला नवा 'बूट' समजावून सांगितला होता.

आता आपण एकविसाव्या शतकात प्रवेश करणार आहोत. तेव्हा त्याप्रमाणे आपण वागले पाहिजे. कॉम्प्युटरचा उपयोग अगदी घराघरातून झाला पाहिजे. वगैरे म्हणून त्याने राधाला एक मिनी–कॉम्प्युटर बक्षीस दिला. आतापर्यंत तांदूळ व कणिक वगैरे कती घ्यावयाती ह्याचे शिक्षण झाले होते; पण आता तो कॉम्प्यूटर त्या वस्तू किती व का घ्याव्यात ते सांगणार होता.

'श्याम दररोज २॥ पोळ्या खातो व राधा २ पोळ्या खाते असे समजू या. पण आज समजा त्याच्या कचेरीत कोणाचा तरी वाढदिवस आहे का कोणाचो पाठवणी आहे म्हणजे तो कचेरीत केक, सामोसे खाणार तेव्हा त्याचा श्यामच्या जेवणावर परिणाम होणार, तो किती होणार व श्यामला किती पोळ्या लागतील हे हा मिनी कॉम्प्युटर सांगणार!' अमेरिकन भाऊ आत्मियतेने सांगत होता. आता राधाच्या महिला-मंडळाची बैठक आहे तेथे खाणे–पिणे होणारच. कोणाचा उपवास आहे तेव्हा ती व्यक्ति त्या दिवशी पोळ्या खाणार नाही. मग किती पोळ्या लागतील ते हा मिनी-कॉम्प्युटर सांगेल!'

'म्हणजे आपण प्रथम ही सगळी माहिती मिनीला भरवायची म्हणजे ती आम्ही पोटात किती भरवायचे ते सांगणार म्हणा की!' श्यामने मोठ्या आनंदाने मिनीच्या उपयोगाचे कौतुक केले.

मलपृष्ठ १ वर

## लोकसभा निवडणूक : महाराष्ट्रातील चित्र

# विरोधी पक्षांच्या दृष्टीने फारसे निराशाजनक नाही

अभय गोखले

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने जरी ४८ पैकी ४३ जागा मिळवून मागच्या निवडणुकीपेक्षा चांगली कामगिरी केली असली तरी या वेळेस राज्यात ५०.६८ टक्के मते मिळवणाऱ्या काँग्रेसच्या मतात मागच्या वेळेपेक्षा थोडी घटच झाली आहे. काँग्रेस (स)चे दोन, जनताचा एक, शे. का. प. चा एक व अपक्ष एक असे पाचच खासदार विरोधकांतर्फे निवडून आले असले तरी निराश होण्याचे कारण नाही. कारण बहुतेक ठिकाणी विरोधी पक्षांनी व विशेषत: काँग्रेस (स)ने सत्तारूढ पक्षाला कडवी लढत दिली आहे. मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, राजस्थान या राज्यांप्रमाणे मोठे मताधिक्य घेऊन काँग्रेसचे उमेदवार बहुसंख्य ठिकाणी महाराष्ट्रात विजयी झालेले नाहीत. काँग्रेस (स)ने राज्यात २६ लाख ४० हजार मते मिळवताना १२ टक्क्यांपेक्षा थोडी ज़ास्तच सरासरी गाठली तर दुसऱ्या क्रमांकावरील भाजपने सुमारे २२ लाख मते मिळवून दहा टक्क्याहून अधिक सरासरी राखली तिसऱ्या क्रमांकावरील जनता पक्षाने साडेसात टक्के सरासरीने सुमारे साडे सोळा लाख मते मिळवली. शेकाप, दोन्ही कम्युनिस्ट पक्ष व रिपब्लीकन पक्ष यांनी मिळून साडेपाच टक्के मते मिळवली.

महाराष्ट्रात सर्व जागी विरोधकांत जागा वाटपाच्या बाबतीत एकमत न झाल्याने त्याचा थोडासाच फायदा काँग्रेसला मिळाला आहे. मुंबईचेच उदाहरण घ्यावयाचे झाल्यास वायव्य मुंबई व उत्तर मुंबईत जनता व भाजप यांच्यात समझोता झाला होता; परंतु द. मुंबई, मध्य मुंबई ( उत्तर ), मध्यमुंबई ( दक्षिण ), ईशान्य मुंबई या मतदारसंघात विरोधी पक्षांत समझोता झाला असता तरी त्यामुळे परिस्थितीत विशेष फरक पडला नसता. दक्षिण मुंबईत काँग्रेसचे विजयी उमेदवार मुरली देवरा यांना सुमारे दोन लाख मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी जनताचे रतनसिंग राजदा व भाजपच्या जयवंतीबेन मेहता या दोघांची मिळून मते होतात फक्त एक लाख चोवीस हजार. मध्यमुंबई ( उत्तर ) मतदारसंघात मात्र विरोधी पक्षांना काँग्रेस उमेदवारापेक्षा जास्त मते मिळाली आहेत. या मतदार संघात काँग्रेसचे दिघे यांना दोन लाख अकरा हजार मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी जनताच्या प्रमिला दंडवते, शिवसेनेचे मनोहर जोशी व कामगार आघाडीचे दादा सामंत यांना मिळून दोन लाख अकरा हजाराहून थोडी जास्त मते मिळाली आहेत. शिवाय लोकदलाच्या उमेदवाराने सुमारे ५ हजार मते मिळवली आहेत. मध्यमुंबई ( दक्षिण ) मतदार संघात तर कामगार आघाडीचे म्हणजेच विरोधी पक्षाचे उमेदवार डॉ. दत्ता सामंत विजयी झाले आहेत. डॉ. दत्ता सामंत यांच्यासकट काँग्रेस विरोधकांना या मतदारसघात ( कांबळे, महाडिक वगैरे ) सुमारे अडीच लाख मते मिळाली आहेत तर पराभूत काँग्रेस पुरस्कृत उमेदवार रोझा देशपांडे यांना फक्त ८६ हजार मते मिळाली. ईशान्य मुंबई मतदारसंघात काँग्रेसचे गुरुदास कामत यांना सुमारे दोन लाख चौऱ्याहत्तर हजार मते मिळाली तर भाजपचे प्रमोद महाजन, कामगार आघाडीचे बोराडे, दमकीचे स्वामी, जनता पुरस्कृत अरुण कांबळे, प्रकाश आंबेडकर आणि एक अपक्ष फारुकी या काँग्रेस विरोधकांना मिळून सुमारे साडेतीन लाख मते मिळाली आहेत. याचा अर्थ ईशान्य मुंबई व मध्य मुंबई ( उत्तर ) मतदारसंघात विरोधकांत समझोता होऊन काँग्रेसशी सरळ लढत झाली असती तर त्याचा फायदा विरोधकांना मिळाला असता उत्तर मुंबई, वायव्य मुंबई ठाणे मतदारसंघात विरोधी पक्षांत समझोता होऊनही त्यांचे उमेदवार लाखाहून अधिक मतांनी पराभूत झाले. कुलाबा मतदार संघात ए. आर. अंतुले व ए. टी. पाटील यांच्यात मते विभागली गेल्याने त्याचा फायदा शेकापचे डी. बी. पाटील यांना मिळाला. पाटील यांना दोन लाख अकरा हजार तर अंतुले यांना एक लाख त्र्याहत्तर हजार आणि ए. टी. पाटील ( काँग्रेस ) यांना ६३ हजार मते मिळाली याचा अर्थ अंतुले व डी. बी. पाटील यांच्यात सरळ सामना झाला असता तर अंतुले विजयी झाले असते. रत्नागिरी मतदारसंघात अंतुले यांच्या पक्षाचे केळोसे यांची सुमारे ४७ हजार मते मिळवूनही त्याचा फायदा भाजपचे नातू यांना उठवता आला नाही व ते पराभूत झाले. मात्र राजापूर मतदारसंघात अंतुले यांचे उमेदवार अरविंद बाक्रे यांनी २६ हजार मते मिळविल्यानेच जनताचे मधू दंडवते विजयी झाले. कारण बाक्रे यांनी काँग्रेसचे भाई सावंत यांची मते खाल्ली व तेवढ्याच मताधिक्याने दंडवते यांनी भाई सावंत यांचा पराभव केला.

### ... तर या जागा मिळाल्या असत्या

पुणे मतदारसंघात विरोधकांच्यात समझोता झाला असता तरी निकालात फारसा फरक पडला नसता. काँग्रेसचे विजयी उमेदवार विठ्ठलराव गाडगीळ यांना सुमारे ३ लाख ११ हजार मते मिळाली तर त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी भाजपचे जगन्नाथराव जोशी व जनताचे मोहन धारिया यांच्या मतांची बेरीज होते फक्त १ लाख ६६ हजार. या उलट डहाणू मतदारसंघात विरोधक एकत्र आले असते तर काँग्रेस उमेदवाराचा सहज पराभव करू शकले असते. या मतदारसंघात काँग्रेसचे विजयी उमेदवार शिंगडा यांना सुमारे १ लाख ६६ हजार तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कोम व भाजपचे बनगा

यांना मिळून सुमारे १ लाख ७७ हजार मते मिळाली आहेत. हीच परिस्थिती बुलढाणा मतदारसंघात दिसते. या मतदारसंघातील कॉंग्रेसचे विजयी उमेदवार वासनिक यांना सुमारे १ लाख ६६ हजार मते मिळाली तर त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी कॉंग्रेस (स)चे काळे व भाजपचे गवई यांना मिळून सुमारे १ लाख ९१ हजार मते मिळाली. ही जागा भाजपने कॉंग्रेस (स) करता सोडली असती तर विरोधी पक्षांना आणखी एक जागा मिळाली असती. अकोला मतदारसंघातही विरोधकांनील फाटाफुटीचा लाभ कॉंग्रेसला मिळाला आहे. कॉंग्रेसचे विजयी उमेदवार मधुसुदन वैराळे यांना सुमारे १ लाख ७६ हजार मते मिळाली तर त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी प्रकाश आंबेडकर यांना १ लाख ६५ हजार तर भाजपचे पांडुरंग फुंडकर यांना सुमारे एक लाख ४९ हजार मते मिळाली. या दोघांच्या मतांची बेरीज होते ३ लाख १४ हजार. याचा अर्थ फुंडकर किंवा आंबेडकर यांच्यापैकी एक जण उभा राहिला असता तर त्याने कॉंग्रेसच्या वैराळचांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला असता. अकोल्यातही विरोधकांच्या फाटाफुटीची तीव्र झळ इतरत्र त्यांना लागलेली नाही. अकोल्यात विरोधकांना सुमारे ६५ टक्के मते मिळूनही त्यांचा उमेदवार निवडून आला नाही तो केवळ त्यांच्यात समझोता न झाल्यानेच.

नासिक मतदारसंघातही तोच प्रकार घटला आहे. तेथील विजयी उमेदवार कॉंग्रेसचे मुरलीधर माने यांना सुमारे १ लाख ९७ हजार मते मिळाली तर त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी कॉंग्रेस (स.) चे प्रल्हाद पाटील कराड यांना सुमारे १ लाख ६० हजार तर भाजपचे पोपटराव हिरे यांना सुमारे ३७ हजार मते मिळाली. ही जागा भाजपने कॉंग्रेस (स) करिता सोडली असती तर कॉंग्रेस (स) चा उमेदवार कदाचित निवडून आला असता. बीड आणि जालना मतदारसंघात जरी कॉंग्रेसचे उमेदवार निवडून आले असले तरी विरोधकांनी बरीच मते मिळवली आहेत. बीडमध्ये कॉंग्रेसच्या विजयी उमेदवार केशरबाई क्षीरसागर यांना सुमारे २ लाख ३१ हजार मते मिळाली तर त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी अंतुले यांच्या पक्षाचे श्रीधर गितेपाटील यांना सुमारे १ लाख ११ हजार तर भाजपचे आदिनाथ नवले यांना १ लाख २ हजार मते मिळाली. जालना मतदारसंघात कॉंग्रेसचे विजयी उमेदवार बाळासाहेब पवार यांना सुमारे १ लाख ८६ हजार, त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी भाजपचे पुंडलीक दानवे यांना सुमारे १ लाख २० हजार तर अंतुले यांच्या पक्षाचे किसनराव भिसे यांना सुमारे ५६ हजार मते मिळाली. वायव्य मुंबई, ठाणे, पुणे, हिंगोली, परभणी, नांदेड, लातुर, भंडारा, यवतमाळ, नागपूर, रामटेक, चंद्रपूर, अमरावती, चिमूर, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर, सातारा, कराड, धुळे नंदुरबार, सोलापुर, पंढरपूर येथील कॉंग्रेसचे उमेदवार प्रचंड मताधिक्याने निवडून आले. यातील हिंगोली, नांदेड, भंडारा, नागपूर, अमरावती, सांगली, अहमदनगर, ठाणे येथील कॉंग्रेसचे उमेदवार एक लाखाहून अधिक मताधिक्य मिळवून निवडून आले तर वायव्यमुंबई, यवतमाळ, रामटेक, चंद्रपूर, चिमूर, कोल्हापूर, पुणे, नंदुरबार, सोलापूर येथील उमेदवार दीड लाखाहून अधिक मताधिक्य मिळवून निवडून आले. कराड मतदारसंघात कॉंग्रेसच्या प्रेमलाबाई चव्हाण तर दोन लाख ८५ हजार इतके प्रचंड मताधिक्य मिळवून निवडून आल्या.

## पुलोदची पुनरावृत्ती

वरील आकडेवारी पाहाता परिस्थिती विरोधकांच्या बाबतीत अगदीच निराशाजनक म्हणता येणार नाही. शिवाय विधानसभा निवडणुकीच्या वेळेस काही गोष्टींचा फायदा कॉंग्रेसला मिळणार नाही. इंदिरा गांधींच्या हत्येने जी सहानुभूतीची लाट निर्माण झाली होती तिची तीव्रता खूपच कमी होईल. लोकसभेप्रमाणे, महिला मतदार, विधानसभा निवडणुकीत प्रचंड संख्येने कॉंग्रेसला मतदान करणार नाहीत. राष्ट्रीय प्रश्न बाजूला सारून राज्यांचे जे प्रश्न व समस्या असतील त्याला मतदान करताना प्राधान्य देण्यात येईल. राष्ट्रीय सुरक्षा, ऐक्य, स्थैर्य या गोष्टींना विधानसभा निवडणुकीत फारसे महत्त्व असणार नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकसभा निवडणुकीत विरोधकांना आपापली खरी ताकद समजल्याने त्यांच्यात विधानसभा निवडुकीच्या वेळेस समझोता होण्यास मोठी अडचण भासणार नाही.

कॉंग्रेस (स.) चे अध्यक्ष शरद पवार यांनी आतापासूनच विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या दृष्टीने प्रचारसभा, खेडोपाडी दौरे याद्वारे व्यापक जनसंपर्क मोहीम आखली असून त्याचा कित्ता भाजप, जनता यांनी गिरवायला हवा. लोकसभा निवडणुकीत पक्षाचा का पराभव झाला यावर व्यर्थ काथ्याकूट न करता भाजप, जनता कार्यकर्त्यांनी जनतेचा गमावलेला विश्वास परत प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेस (स), भाजप, जनता शेकाप या प्रमुख विरोधी पक्षांमध्ये जागा वाटप करताना त्यांना लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या मतांचा प्राधान्याने विचार व्हायला हवा. मात्र तडजोडीच्या वेळेस कोणत्याही पक्षाने फार ताणून धरता कामा नये. यातील एखादाही पक्ष स्वतंत्ररीत्या लढू पाहील तर तो पक्ष स्वतःचेच नुकसान करणार नाही तर अप्रत्यक्षरीत्या कॉंग्रेसलाच सहाय्यभूत ठरेल.

शरद पवार यांच्या समंजस भूमिकेमुळे विरोधी पक्षांमध्ये समझोता होण्यास अडचण भासणार नाही. एकाच चिन्हावर सर्व विरोधी पक्षांनी निवडणूक लढविण्याची पवारांची कल्पना वाईट नाही. मात्र सर्व विरोधी पक्ष या गोष्टीला तयार होतील की नाही याबाबत शंका आहे. सर्व विरोधी पक्षांना एकमेकांत भांडणे न होता एकत्र राखता येते याची प्रचिती शरद पवार पुलोदचे (जनता राजवटीत) मुख्यमंत्री असताना त्यांनी आणून दिली होती. जनता, भाजप, शेकाप यांना संभाळत त्यांनी मुख्यमंत्री म्हणून चांगला कारभार केला. या गोष्टीचा फायदा सर्व विरोधक येत्या विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली लढल्यास, त्यांना नक्कीच मिळेल. बहुतेक ठिकाणी कॉंग्रेस (स) व भाजप यांनी कॉंग्रेस उमेदवारांना कडवी लढत दिली. या पक्षांना ग्रामीण भागातही जोरदार पाठिंबा मिळाला. वेळ पडल्यास विरोधी पक्षांनी अंतुले यांच्या पक्षाशीही समझोता करण्यास हरकत नाही. लोकसभा निवडणुकीत अंतुले यांच्यासह त्यांच्या पक्षाचे सर्व उमेदवार पराभूत झाले असले तरी त्यांना मिळालेली मते दुर्लक्षित करण्यासारखी नाहीत. शिवाय राजकारणात कोणीही कायमचा अस्पृश्य असू शकत नाही. कॉंग्रेसशी चांगली लढत देण्याकरीता मिळेल ती मदत घेण्यात विरोधकांनी संकोच बाळगता कामा नये. □

# मोटार वाहतूक : सदैव रस्त्यावर असलेला व्यवसाय

शिरीष सहस्रबुद्धे

मोटार वाहतूक हा धंदा चौऱ्याऐंशी साल-अखेर एकदम प्रकाशात आला तो अगदी निराळ्याच आणि अभद्र कारणामुळे. इंदिराजींच्या हत्येनंतर उसळलेल्या दंगलीत ठिकठिकाणी धडाडून पेटले ते मालवाहू ट्रक. आणि त्यांच्या विषण्ण करणाऱ्या प्रकाशात या धंद्याची दुरवस्था उघड झाली. हमरस्त्यावर पेटणाऱ्या या मालमोटारींना कोण संरक्षण देऊ शकणार होतं ? निदान दोन हजार मालमोटारी त्या वणव्यात जळून खाक झाल्या असाव्यात– त्यासुद्धा मालांसह असा कयास आहे. अर्थात या संख्येत पंजाब–हरियानातल्या जळिताचे आकडे धरलेले नाहीत, कारण वृत्तनियंत्रणामुळे विश्वसनीय आकडे मिळू शकलेले नाहीत; पण खरा प्रश्न संख्येचा नाही तर या धंद्याच्या अंगभूत दुबळेपणाचा आहे. एक ट्रक म्हणजे दीड–दोन लाख रुपयांची मालमत्ता. त्यावर त्यात भरलेल्या मालाची किंमत. एवढी सगळी संपत्ती नुसती उघड्यावरच नव्हे तर चक्क रस्त्यावर सदासर्वकाळ असते. ती रस्त्यावर असल्यामुळेच धंदा चालून नफा मिळतो आणि रस्त्यावर असल्यामुळेच अपघात किंवा हल्ल्यातून नुकसानही पदरी पडतं. या दोन्ही शक्यता गृहीत धरूनच या धंद्याची चाकं भर रस्त्यावर अखंड चालू आहेत.

किती काळ ती सुरळितपणे चालू राहतील ?

आज निव्वळ महाराष्ट्रातच नोंदलेल्या मालवाहू ट्रक्सची संख्या चौऱ्याऐंशी हजारांपेक्षा अधिक आहे. संपूर्ण देशातला ताजा अधिकृत आकडा उपलब्ध नसला तरी तो सहा लाखांपेक्षा अधिकच आहे. या संख्येत सतत भर पडते आहे. टेल्कोचा फक्त पुण्याचा कारखानाच दरवर्षी अकरा हजारांपेक्षा जास्त वाहनं तयार करतो. जमशेदपूर टेल्कोचं उत्पादन वेगळंच. शिवाय अशोक लेलँन्ड आणि प्रीमियर ऑट्रोमोबाइल्स हे दुसऱ्या नि तिसऱ्या क्रमांकाचे ट्रक उत्पादक आहेतच. दुसरीकडे राष्ट्रीयीकृत बँकांद्वारे सुशिक्षित बेरोजगार योजनांखाली सरकार धडाक्यानं कर्जवाटप करून ही वाहनं रस्त्यावर आणते आहे. परिणामी मालवाहू मोटारींची संख्या बेसुमार फुगत चालली आहे आणि साहजिकच धंद्यातली स्पर्धा अवास्तव वाढते आहे.

इतकी, की उद्या हा धंदा आपल्याच वजनानं खचला तर आश्चर्य वाटू नये !

एखाद्या धंद्यात स्पर्धा वाढते तेव्हा बहुधा स्पर्धक एकत्र यायची प्रक्रियाही सुरू होते. व्यवसायवार संघटना यातूनच तयार होतात आणि त्यातून एकमेकांना पायात पाय घालून पाडायची प्रवृत्ती कमी होते. पानविडीवाले, हेअरकटिंग सलूनवाले यांच्यासुद्धा संघटना आहेत नि संघटनेने ठरवलेल्या दरातच ग्राहकांना सेवा मिळते. फार काय, मोटार वाहतूक धंद्यातल्याच हमालांच्यासुद्धा संघटना आहेत व त्यांनी एकत्र झगडून हमालीचे दर ठरवून घेतलेले आहेत. मोटारमालकांनी मात्र संघटना स्थापल्या तरी बेहिशेबी स्पर्धा चालूच ठेवली. काम आपल्याच पदरात पडावं यासाठी अविचारानं दर उतरवून द्यायला सुरुवात केली. हा दर मला परवडतो आहे की नाही याचा विचार करायला या गतिमान व्यवसायात सवडही नाही आणि कित्येक मोटारमालकांची कुवतही नाही. अल्पशिक्षित मंडळींचा भरणा या व्यवसायात भरपूर. शास्त्रशुद्ध पद्धतीनं कॉस्टिंग करून दर आकारणार कसा ?

याचं एक उदाहरण दिलं श्री. जगदीश शहा यांनी. जगदीशभाईंचा मालवाहतुकीचा व्यवसाय आहे आणि पुणे डिस्ट्रिक्ट मोटार ट्रान्स्पोर्ट को–ऑपरेटिव्ह सोसायटीचे चेअरमन म्हणून ते नुकतेच निवडून आले आहेत. त्यांचं वैशिष्ट्य म्हणजे ते कॉमर्स आणि कायद्याचे पदवीधर तर आहेतच; पण चार्टर्ड अकाउन्टन्टही आहेत. मोटारवाहतूक धंद्यात त्यांच्याइतका सुशिक्षित मोटारमालक विरळा. तर जगदीशभाईंचं म्हणणं असं की, निव्वळ पुणे–मुंबई आणि परत अशा फेऱ्यांचा हिशेब नमुना म्हणून केला तर सध्या दर किलोमीटरमागे वाहतूक खर्च ४.६३ रुपये येतो. यात डिझेलचा खर्च, ड्रायव्हर–क्लीनरचा पगार, हमाली, व्याज, टायरची झीज, घसारा या आवश्यक गोष्टी धरल्या आहेत. मात्र ग्राहकांकडून सरासरी तीन सव्वातीन रुपये प्रति किलो मीटरपेक्षा जास्त दर आम्हाला मिळू शकत नाही. म्हणजेच तोटयात धंदा करणं भाग पडतं. सरकारनं ठरवून दिलेला किमान दर ( रु. २.४० ) तर इतका कमीआहे की त्याचा आम्हाला काहीच आधार नाही.

असं असेल तर पुणे–मुंबई मार्गावर काय किंवा इतरत्र काय, मोटार वाहतूक चालतेच कशी ?

जगदीभाईंनी दिलेलं उत्तर असं की, बहुसंख्य मोटारमालक डिझेल, हमाली नि ड्रायव्हर–क्लीनरचे पगार यासारखे 'डायरेक्ट' म्हणजे प्रत्यक्ष नि अत्यावश्यक खर्चंच तेवढे भाडं आकारताना गृहीत धरतात. त्यामुळे मिळणाऱ्या भाड्याच्या उत्पन्नातून हे खर्च नि त्यांचा घरखर्च यांची तोंडमिळवणी होते खरी. पण एकीकडे बँकेचे हप्ते नि व्याज थकतं, तर दुसरीकडे मोठी दुरुस्ती वा स्पेअरपार्टबदली यासारख्या आकस्मिक खर्चाची ( कॉन्टिन्जन्सी ) काहीच तरतूद उभी राहू शकत नाही. याचा परिणाम असा होतो की, असलेलं कर्ज फिटत जाण्याऐवजी छोटा मोटारमालक आणखी कर्जबारी होतो. हप्ते नि व्याज थकल्यामुळे 'पीनल इंटरेस्ट' लागू होतं आणि कधी न संपणारं एक दुष्ट चक्र सुरू होतं.

कर्जफेडीचा नि व्याज थकण्याचा विषय निघाला म्हणून मग बँक ऑफ महाराष्ट्रच्या काही वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि अधिक माहिती मिळवली. महाराष्ट्र बँक पुणे जिल्ह्यासाठी अग्रणी (लीड) बँक

आहे आणि तिने वाहतूक व्यावसायिकांना दिलेल्या कर्जाची एकूण रक्कम इतर बारा बँकांनी दिलेल्या एकंदर कर्जाच्या चौपटी-पेक्षा जास्त आहे. त्यांच्याकडची थकबाकीही तशीच बाळसेदार म्हणजे सात कोटी रुपयांच्या घरात आहे. त्यातली खरोखर किती वसुली होऊ शकेल हा एक प्रश्नच आहे. कारण अलिकडच्या तीन–चार वर्षांत ज्यांना कर्जे दिली, त्यांच्यापैकी बहुसंख्य छोटया मोटरमालकांची परतफेडीची इच्छा असली तरी ऐपतच नाही. अर्थात ज्यांची इच्छाच दिसत नाही, असेही महाभाग बँकेच्या अधिकाऱ्यांना भेटतातच; पण काही टक्के बनवेगिरी ही समाजातल्या इतर व्यवसायां-प्रमाणे वाहतूक व्यवसायातही असणारच. बहुसंख्य नवे नि छोटे मोटारमालक मात्र कर्जफेड करायला असमर्थच ठरले आहेत ही वस्तुस्थिती आहे नि त्यांच्या वार्षिक नफातोटापत्रकावर नजर टाकली तरी याचा प्रत्यय येतो. एक मोटारमालक असेही भेटले की, त्यांनी बँकेचा एकही हप्ता चुकवलेला नाही; पण मग स्वतःला महिन्याकाठी मिळतात सरासरी फक्त अडीचशे रुपये. पत्नी कमावते म्हणूनच प्रपंच चालला आहे असं सांगून ते खेदाने हसले.

सरकारी योजना राबवणं, ठरलेली लक्ष्यं गाठणं या नादात बँकेला फार चिकित्सा न करता कर्जवाटप करावं लागतं. सव्वा लाख ते दीड लाख रुपये बारा टक्के व्याजानं उचलणाऱ्या माणसाची कुवत ते वेळच्या-वेळी फेडायची आहे की नाही, या व्यवसायाचा काही अनुभव त्याला आहे की नाही, त्यातले बारकावे नि खाचखळगे ठाऊक आहेत की नाही या गोष्टींचं मूल्यमापन करायला बँकेला फारसा वाव राहत नाही. कर्ज घेणारेही दोन लाखांची चालती-फिरती 'ॲसेट्' आपल्या नावे होते आहे, या खुशीत मागचापुढचा विचार पुरेसा करीत नाहीत. निव्वळ दहावी पास आहे नि ड्रायव्हिंगचं लायसन्स आहे, एवढया गुणवत्तेवर दोन लाखांचा ट्रक घेणाऱ्या माणसाला कर्ज डोईजड झालं तर नवल नाही. बऱ्याच केसेस अशा आहेत की, सव्वा लाख रुपये बँकेकडून कर्जाऊ घेतले जातात आणि उरलेली रक्कम–जी उद्योजकानं स्वतःची गुंतवणं (मार्जिन मनी किंवा निजधन) आवश्यक असतं, तीही स्वतःकडे नसल्यानं खाजगी कर्ज म्हणून जबर व्याजानं आणलेली असते. साहजिकच ती आधी फेडायची निकड वाटते व बँकेच्या हप्त्यांना विलंब होतो. एकदा हप्ते थकले की, कर्जदार बँकेला तोंडच दाखवीत नाही. तो नि त्याची 'ॲसेट्' दोन्ही जागेवर नसल्याची उदाहरणंही घडतात.

बँक अधिकाऱ्यांनी हेही सांगितलं की; मोटार वाहतूक धंद्याची तब्येत इतकी खालावली ते गेल्या चार वर्षांतच. १९८१ पूर्वी इतके अडचणीचे दिवस नव्हते. अलिकडच्या सार्वत्रिक मंदीचा फटका एकीकडे या व्यवसायाला बसला. कारण इतर उद्योगातच काम कमी म्हटल्यावर मालवाहतुकीचं प्रमाणही घटलं, तर दुसरीकडे आणखी आणखी मालमोटारी, निव्वळ सरकार/बँका उदार झाल्या म्हणून, मंदीचा विचार न करता, रस्त्यावर येत राहिल्या. साहजिकच स्पर्धा प्रमाणाबाहेर वाढली, काम बेताचंच राहिलं आणि अपरिहार्यपणे वाहतुकीचे दर उतरले तरी किंवा इतर बाबतीतल्या महागाईप्रमाणे न वाढता स्थिर राहिले. वाढले ते फक्त खर्च.

मालवाहतुकीच्या दरांबद्दलच्या या म्हणण्याला जोरदार पाठिंबा दिला तो श्री. रामभाऊ कुलकर्णी यांनी. श्री. रामभाऊ कुलकर्णी हे महाराष्ट्र लॉरी ऑपरेटर्स असोसिएशनचे अध्यक्ष आणि 'मोटार वाहतूक' पाक्षिकाचे संपादक. दोन्ही संस्थाचं हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. पूना डिस्ट्रिक्ट मोटार ट्रान्स्पोर्ट को–ऑप. सोसायटीचेही श्री. कुलकर्णी अध्यक्ष आहेत. शास्त्राचे नि कायद्याचे पदवीधर असलेले श्री. कुलकर्णी स्वतःसुद्धा चाळीस वर्षे वाहतूक व्यवसायात आहेत. 'भाऊसाहेब कुलकर्णी' या नावाला आज त्या क्षेत्रात आदराचं स्थान आहे. त्यांचं म्हणणं असं की, आज मालवाहतूक क्षेत्रातले ८५ टक्के व्यावसायिक हे छोटे ऑपरेटर्स आहेत, म्हणजेच एक किंवा दोन ट्रक बाळगणारे आहेत. दिवस कठीण आहेत ते मुख्यतः या छोटया धंदेवाल्यांनाच. बाकीचे धंदेवाले एक तर सहकारी सोसायटया आहेत किंवा मोठे 'फ्लीट ओनर्स.' सहा गाडयांपेक्षा जास्त मोठा ताफा बाळगणारा फ्लीट ओनर म्हणून ओळखला जातो. त्यांची परिस्थिती पुष्कळच बरी आहे.

काय समस्या आहेत छोटया ऑपरेटर्सच्या?

पहिली गोष्ट म्हणजे परवडणारा भाडेदर मिळत नाही. इकॉनॉमिक रेट नाही. काहीही करून गाडी रस्त्यावर चालू रहावी या हेतूनं मिळेल तो माल मिळेल त्या दरात भरायचा या प्रवृत्तीमुळे संघटना करून नि किमान दर ठरवून फायदा नाही.

इकॉनॉमिक रेट मिळत नाही तो कसा काय?

त्याचं गणित असं आहे. एकोणिसशे सत्तर सालात ट्रकचा एक टायर बाराशे रुपयाला मिळायचा. आता त्याला पडतात चव्वेचाळीसशे रुपये. डिझेलची दरवाढ तर वर्तमानपत्रातनं वेळोवेळी जाहीर होतेच. बॅटऱ्यांचे भाव बारा वर्षात चौपटीनं कडाडले आहेत. जकाती वाढल्या. पुणे महानगरपालिकेचा एस्कॉर्टचा दर ऱ्याऐंशी साली एका फटक्यात चार रुपयांचा बारा रुपये झाला! मोटारवाल्यांना असे भाव वाढवून मिळतात का? सत्तर साली पुणे–मुंबई एकेरी ट्रिप साडेतीनशे रुपयात करीत होतो ती आज जेमतेम पाचशे रुपयात करावी लागते. त्यातसुद्धा बुकिंग एजन्टचं कमिशन द्यावं लागतं.

## ही काय भानगड?

बुकिंग एजन्टस् ही आमच्या व्यवसायातली एक चमत्कारिक समस्या आहे. छोटया मोटारमालकांचं त्यांच्यावाचून चालत तर नाही; पण त्यांचं कमिशन सोसून धंदा करणं परवडतही नाही. एकेकटया मोटारमालकाचे कॉंटॅक्टस कमी असतात. काम थेट गिऱ्हाइकाकडून मिळवणं जमतंच असं नाही. म्हणून बुकिंग एजंटस् या मध्यस्थाचा उदय झाला. काही एजन्टस्च्या स्वतःच्या गाडया असतात तर काही निव्वळ दुसऱ्याच्या गाडयांवर धंदा करतात. गिऱ्हाइकाकडून घाऊक प्रमाणात काम मिळवायचं नि छोटया मोटारमालकांना ते वाटून द्यायचं हे यांचं काम. छोटया मोटारमालकांना नियमित काम मिळतं नि तेही दारोदार न हिंडता, हा त्यांचा फायदा; पण त्याबरोबर बुकिंगस् एजंट देईल तो भाडेदर मान्य करावा लागतो यात खरा फायदा घेऊन जातात ते एजन्टस्. मोटार व्हेईकल ॲक्टमध्ये एजन्टस्ना बंधनकारक अशा तरतुदी फारशा नाहीत. त्यांनी लायसन्स घ्यावं आणि ठराविक कमिशन

आकारावं यासाठी केंद्र सरकारनं कायदा केला आहे; पण बड्या बुकिंग एजन्टस्नी सर्वोच्च न्यायालयात जाऊन स्थगिती मिळवल्यामुळे त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. आज पुष्कळ छोटे मोटारमालक पिळवणूक सहन करूनही बुकिंग एजन्टस्मार्फतच धंदा करतात. इलाज नाही.

## यावर काय उपाय ?

उपाय मूलभूत स्वरूपाचा हवा आहे. उदाहरणार्थ एकेकट्या मोटारमालकानं एखाद-दुसरी मालमोटार ठेवून धडपड करण्याऐवजी किमान वीस ते पंचवीस गाड्या एकत्र करून त्यांचं एक युनिट बनवायला हवं. त्यासाठी छोट्या मोटारवाल्यांनी आपल्या 'मालकी'च्या परंपरागत कल्पना सोडून एकत्र यायला हवं. अर्थात गाडी ज्याची त्याच्या नावावरच राहील. मात्र ती तो स्वतंत्रपणे वापरणार नाही तर मोठं युनिट काम मिळवील आणि सभासदात वाटून देईल. मोठ्या युनिटला जास्त प्रतिष्ठेनं नि थेट गिऱ्हाइकाशी वाटाघाटी करता येतील, बऱ्या दरात मोठी कॉन्ट्रॅक्टस् मिळवता येतील. फायदा सगळ्या गाड्यांवर सारखा विभागला जाईल. अशी काही व्यवस्था लावली तरच छोटे व्यावसायिक यापुढे तरून जातील. पण अशा तऱ्हेनं एकीनं काम करणं त्यांच्या आजवरच्या खाक्यात बसेल की नाही, हीच शंका आहे.

आतापर्यंतच्या सगळ्या उहापोहातून निघणारा निष्कर्ष थोडा धक्कादायक होता, म्हणून तो 'कन्फर्म' करून घेण्यासाठी अनेकांशी चर्चा केली. श्री. घेवरचंद बोरा, श्री. बंकटशेट कोठारी, श्री. केशरचंद नवलखा, श्री. मेहेर अंकलेसरिया, श्री. बाफना आणि श्री. एम्. के. मेहेंदळे व श्री नित्यानंद मेहेंदळे हे अनुभवी नि प्रतिष्ठित वाहतूक व्यावसायिक वेळोवेळी भेटले तसेच सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्स्पोर्ट, भोसरी या केंद्रीय संस्थेचे संचालक डॉ. प्रभाकर पाटणकर यांच्याशीही बोलणं झालं. एस. टी. चे कार्यकारी संचालक म्हणून डॉ. पाटणकरांनी ह्या अवाढव्य कारभारावर आपला चांगला ठसा उमटवला होता. नेहमी संपर्कात असणारी आणखी एक मान्यवर व्यक्ती म्हणजे 'मोटारवाल्यांचे वकील' म्हणून ओळखले जाणारे श्री. वामनराव भागवत. सार्वजनिक कार्याची नितांत हौस असणारे श्री. भागवत आज वयाच्या सत्तरीनंतरही वाहतूक व्यवसायातल्या प्रत्येक घटकासाठी नि प्रश्नासाठी उत्साहानं कार्यमग्न असतात. चाळीसहून अधिक वर्षांच्या वकिलीत मोटारवाहतुकीशी संबंधित खटले सोडून दुसरी एकही केस घेतली नाही असं ते अभिमानानं सांगतात.

या ज्येष्ठ मंडळींपैकी बहुतेक या निष्कर्षाशी सहमत होते की या पुढच्या काळात 'सिंगल ट्रक ऑपरेटर्स'चा निभाव या धंद्यात लागणार नाही. एक किंवा दोन ट्रक बाळगणं हा आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य व्यवसाय (व्हायेबल युनिट) होऊच शकत नाही एक वा दोन गाड्या बाळगणाऱ्यांपैकी जे मालक स्वतःच गाडी चालवीत असतील ते थोडाफार जास्त टिकाव धरू शकतील; पण त्यालाही मर्यादा आहेत, कारण मालकच ड्रायव्हर झाला की धंद्याच्या आर्थिक नि व्यापारी (कमर्शियल) बाजूकडे त्याचं दुर्लक्ष होतं. पगारी ड्रायव्हर नेमले तर त्यांचा पगार निघण्यापुरता धंदा होतो; पण स्वतःला फारसं काही उरत नाही.

एकीकडे अशी आर्थिक दुर्दशा आहे. दुसरीकडे कायदेशीर तरतुदी नि गुंतागुंती वाढताहेत. जुन्या कायद्यांच्या जोडीला प्रदूषण प्रतिबंधक कायद्यांसारख्या नव्या तरतुदींची भर पडली आहे. नेहमीप्रमाणेच या नव्या कायद्याचा उद्देश स्वागतार्ह आहे; पण अंमलबजावणी सदोष आहे. छोट्या मोटारमालकांना प्रदूषणमापक नि प्रतिबंधक उपकरणं सहजपणे उपलब्ध करून द्यायची नि ती वापरायचं जुजबी शिक्षण द्यायची सोय नाही. दंड मात्र सुरू. त्यातून लाचलुचपतीला प्रोत्साहन मिळण्याची शक्यता.

कर वाढताहेत नि नवे कर येताहेत. आंतरराज्य वाहतूक करणाऱ्यांना तर नानाप्रकारचे कर, तितकी चलनं नि फॉर्म्स भरून हैराण व्हायला होतं. करबुडवेगिरी नि भ्रष्टाचार हातात हात घालून चालतात ती यामुळेच. हरयाना नि कर्नाटक राज्यात तर मोटारमालकांवरचे कर आश्चर्य वाटावं इतके मोठ्या प्रमाणात आहेत. जकात (ऑक्ट्रॉय) हा मध्ययुगीन कर महाराष्ट्रासारख्या अनेक राज्यात अजूनही चालू आहे. मोटारवाल्यांना तो कमालीचा जाचक ठरतो. वेळ, पैसा यांचा कमालीचा अपव्यय होतो.

कायदे-नियम नि करपद्धतीत राज्यागणिक फरक पडत असल्यानं कायदेशीरपणानं वागायचं म्हटलं तरी मुष्किल होतं. मध्यप्रदेशात मान्य होणाऱ्या वजनाचा माल घेऊन गाडी महाराष्ट्रात आली की 'ओव्हर लोड' म्हणून दंड ठोठावला जातो. ड्रायव्हरनं रस्त्यात उतारूंची वाहतूक केली तर पैसे त्याच्या खिशात जातात. तो सापडला तर दंड मात्र मोटारमालकाला होतो. आर्टिक्युलेटेड व्हेइकल्स म्हणजे उदाहरणार्थ ट्रॅक्टर व त्याच्याकडून ओढला जाणारा ट्रेलर यांच्या संबंधीच्या स्पष्ट तरतुदी कायद्यात नसल्यानं ठिकठिकाणचे अधिकारी मर्जीप्रमाणे नियमाचा अर्थ लावून दंड करू शकतात.

अपघातांचं प्रमाण वाढलंय्. एकूण जीवनाचा वेग नि बेदरकारपणा वाढलाय् आणि निर्व्यसनी ड्रायव्हरांचा तुटवडाही वाढलाय्. एक अपघात म्हणजे छोट्या मोटारवाल्याचं कंबरडंच मोडतं. गाडी दोन-तीन आठवडे दुरुस्तीसाठी गॅरेजमध्ये पडते. उत्पन्न थांबतं. बँकेचं कर्ज नि व्याजाचे हप्ते चालूच राहतात. म्हणजे बहुधा थकतात. इन्शुरन्सचा चेक बँकेत जमा झाला की बँक हप्त्यापोटी वळता करून घेते. दुरुस्तीचा खर्च मात्र मोटारमालकाच्या डोक्यावर बसतो. पुन्हा गाडी रस्त्यावर येईतो सगळी आर्थिक घडी विस्कटलेली असते. इन्शुरन्स सगळ्या गाडीचा असला तरी भरपाई देताना रंग, दिवे अशा अनेक बाबी वगळल्या जातात. इन्शुरन्स कंपनी पॉलिसीमधल्या नियम क्रमांक अमुक पोटकलम तमुकवर बोट ठेवतात.

विम्याबाबत एक मोठी अडचण म्हणजे फक्त गाडीचा विमा उतरवला जातो. गाडीतल्या मालाचा नाही. एकेका गाडीत पाच पाच लाख रुपयांचाही माल असतो. अपघात झाला तर जबाबदारी मोटार मालकाची. विमाकंपनी मालाच्या मालकाला भरपाई देते नि मोटार मालकावर वसुलीसाठी दावा लावते. कॅरियर्स ॲक्टप्रमाणे मोटार मालकाकडून त्यांना भरपाई घेताही येते. पण मोटार मालकानं अगोदर मालाचा विमा (स्वतः प्रीमियम भरून) उतरवायची तयारी दाखवली तरी त्याला इन्शुरन्स पॉलिसी कंपन्या देत नाहीत. कारण राष्ट्रीय धोरण ! छोटे मोटारमालक एकेका अपघातामुळे स्वतःची गाडी दुरुस्ती नि मालाची भरपाई यात साफ बुडाल्याची उदाहरणं आहेत.

या आणि अशा कित्येक लहानमोठ्या अडचणींच्या गराड्यात वेढला गेलेला छोटा मोटारमालक आपलं अस्तित्व व्यवसायातनं साफ पुसलं जाण्याचा धोका पत्करून उभा आहे. खरं म्हणजे रस्त्यावर धावतो आहे. तशी कमीजास्त अडचण आहे सगळ्याच मोटार व्यावसायिकांची, पण सार्वत्रिक मंदीची चक्रं उलट दिशेनं फिरतील तेव्हा फ्लीट ओनर्स ग्रहणातनं बाहेर पडू शकतील. संख्येनं शंभरात पंचाऐंशी असलेले छोटे व्यावसायिक-त्यांची चाकं मात्र किती काळ सुरळीतपणे रस्त्यावर धावती राहतील, याची शंका वाटते ! □

# नव्या सरकारच्या काही उलाढाली

विनायक गोखले

पंतप्रधान राजीव गांधी निवडून आले. विरोधकांच्या भाषेत त्यांना एक संधी देण्यात आली आहे. राजीव गांधींना सर्वसामान्यांच्यात अमाप लोकप्रियता आहेच; पण खास करून उद्योजकांत. परदेशात घेतलेले शिक्षण, तरुण रक्त, आधुनिकतेची आवड आणि त्यांच्या बरोबरीने राजकारणात प्रवेशलेली त्यांची मित्रमंडळी या कारणास्तव उद्योजकांना 'राजीव प्रेम' निर्माण झाले ते काही अपेक्षा धरून. उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणारी अर्थव्यवस्था आणली जाईल ही अपेक्षा. निवडणुका झाल्या आहेत, त्यानंतर घडणाऱ्या घटना ह्या उद्योजकांच्या अपेक्षाभंग करणाऱ्या निश्चितच नाहीत.

स्थिर सरकार राज्य करत आहे. ते इतके स्थिर झाले आहेत की, त्यांची कार्यक्षमता विरोधामुळे कमी होण्याची शक्यता नाही. भारताच्या आर्थिक व्यवस्थेत झपाट्याने चांगले बदल व्हावेत आणि त्याकरता उत्पादनक्षमता आणि उत्पादने वाढवण्याचे खास प्रयत्न व्हावेत हे अपेक्षित आहे. पंतप्रधानांनी निवडणुकांच्यावेळी दिलेली आश्वासने वेळेत पुरी केली जातीत असे सांगितले,वेगवेगळ्या सभांत बोलताना, आपल्या प्रगतीचा वेग वाढवून तंत्रज्ञान व इतर क्षेत्रात पुढारलेल्या स्थितीत २१ व्या शतकात पदार्पण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. २१ व्या शतकाकडे बघणारा पहिलाच नेता असे त्यांचे वर्णन काही वृत्तपत्रे करत आहेत आणि या सर्व गोष्टी घडण्याकरता सरकार भारतीय उद्योगांना सर्वतोपरी सहाय्य करेल अशी अपेक्षा आहे. उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी आणि प्रगतीसाठी अनेक योजना भावी काळात अमलात आणल्या जाव्यात अशीसुद्धा अपेक्षा आहे.

आजवर कोणत्या सरकारचे कार्यक्रम वाईट होते? कोणता राजकीय नेता आश्वासन देत नाही? अपेक्षा कोणाकडून नसतात? सर्व राजकीय पुढारी आश्वासने देतात, निरनिराळे कार्यक्रम मांडतात आणि लोकं त्यांच्याकडून काही 'चांगल्याची' अपेक्षा ठेवतात; पण त्या अपेक्षांची कधीच पूर्तता होत नाही, हा अनुभव जमेस असूनसुद्धा 'राजीवजीं'चा अपवाद का केला जातोय? खरं आहे! राजीव गांधी लोकांच्या अपेक्षा पुऱ्या करतील असे लोकांना वाटते आहे. राजीव गांधी इतर राजकीय नेत्यांपेक्षा 'काही' वेगळे आहेत, 'मि. क्लीन' आहेत, असा त्यांच्याबद्दलचा ठसा जो लोकांच्या मनावर बिंबला आहे तो यास कारणीभूत आहे. हा लोकांचा भ्रम आहे का सत्य आहे? सध्या तरी खात्रीनी काहीच सांगता येत नाही; पण सत्तेवर आल्या आल्या जी काही पावलं उचलली गेली आहेत ती उत्साहवर्धक आहेत.

तांत्रिक व तत्सम क्षेत्रातील विकास ही अपेक्षापूर्तीच्या दृष्टीनी एक आवश्यक बाब समजली जात आहे. पंतप्रधानांनी काही महत्त्वाची खाती आपल्याकडे राखून ठेवली आहेत, त्यात कॉमर्स इंडस्ट्री अॅण्ड कंपनी अफेअर, परराष्ट्र तंत्र आणि विज्ञान यांचा समावेश आहे आणि लोकांचा उत्साह वाढण्यास हेच कारणीभूत आहे. उद्योग, व्यापार, सायन्स व टेक्नॉलॉजी यासारखी खाती स्वतःकडे ठेवून काही महत्त्वपूर्ण बदल करण्याची योजना पंतप्रधानांकडे असावी असे वरकरणी दिसते. या खात्यातील खाचाखोचा समजून घेऊन त्यात जर काही महत्त्वपूर्ण बदल केले गेले तर ते स्वागतार्ह होतील असे वाटत असतानाच भारताची निर्यात वाढावी याकरता यंत्रणेत काही आमुलाग्र बदल करून उद्योजकांचा वाया जाणारा वेळ वाचवण्याचा प्रयत्न करणारी एक योजना पुढे आणली जात आहे. निर्यात वाढवून, परदेशी चलन जास्त मिळवून, १९८५ च्या अखेरीस जागतिक नाणे निधीला द्यावयाच्या पहिल्या हप्त्याच्या दृष्टीनी टाकली जाणारी पावलं लोकांचा अपेक्षाभंग करणारी नव्हेत. सरकारी प्रभावाखालील बुडीत उद्योगांबाबत पुर्नविचार करण्याची योजनाही स्वागतार्ह आहे. अर्थमंत्रालयाने त्यांच्या यंत्रणेत 'कॉम्प्युटरचा' वापर जास्त करून वेळ वाचवण्याची जी योजना जाहीर केली आहे, तीसुद्धा 'बदला' कडे नेणारी आहे.

ही सुरुवात आहे. पुढे काय होईल सांगता येत नाही; परंतु सुरुवात मात्र योजनाबद्ध दिसते. त्यामुळे तिचे पडसाद लागलीच उमटतात. शेअर बाजार, ही एक अत्यंत संवेदनाशील जागा आहे. भारतातील राजकीय व आर्थिक बदलाचे प्रतिसाद येथे झटकन उमटतात. निवडणुका जाहीर झाल्या की शेअर बाजार 'थंडा' होऊ लागतो. व्यवहार कमी होऊ लागतात; पण यंदा राजीव गांधी बहुमत मिळवणार या अपेक्षेने शेअर बाजार निवडणुकांच्या धामधुमीत सुद्धा जोरात होता. राजीव गांधींना मिळालेले प्रचंड बहुमत व आलेले स्थिर सरकार या पार्श्वभूमीवर, ख्रिसमसच्या सुट्टीनंतर सुरू झालेला शेअर बाजार तेजीत सुरू झाला यात नवल ते काय!

२ जानेवारीला शेअर बाजार उघडला. प्रिमियर अॅटोमोबॉईलचा १०० रुपये दर्शनी किंमतीचा शेअर १९.५० नी वाढून ३२८ वर पोहोचला. एसीसीच्या १०० रुपये दर्शनी किंमतीच्या शेअरची वाढ १० रुपयानी झाली व ३८५ वर पोहोचला. टाटा स्टीलचा १०० रुपये दर्शनी किंमतीचा शेअर ३८२.५० वर पोहचला तो १५ रुपयांनी वाढून. रिलायन टेक्स्टाईल १० रुपये दर्शनी किंमतीचा शेअर १२८ वर स्थिर राहिला. ही झाली मोठ्या उद्योगांबाबत घडामोड. याबरोबर 'इलेकॉन इंजिनियरिंगचा' दहा रुपये दर्शनी किंमतीचा शेअर ५७ रुपयांवरून ६४ वर गेला तर बजाज ऑटो १० रुपयांनी वाढून ८६५ वर. एशियनपेंटमध्ये ३ रुपयांची वृद्धी झाली तर लॅक्मे पॉंडस् यामध्ये जोरदार व्यवहार झाले. सध्या ज्या शेअरमध्ये वाढ होईल अशी अपेक्षा नसतानासुद्धा त्यांच्यात जी वाढ झाली ती नवीन सरकारबद्दलचा विश्वास आणि अपेक्षा दर्शविते.

अर्थमंत्री म्हणून विश्वनाथ प्रतापसिंग यांची झालेली निवड अनेकांना नापसंत होती. पूर्वीचे अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांचा 'अंदाज' अनेकांना आला होता. त्यांची धोरणं आणि कार्यपद्धती ही काहींना हवीहवीशी वाटणारी होती. अशात विश्वनाथ प्रतापसिंग यांची

निवड ही अनेकांना फायदेशीर नव्हती. परदेशस्थ भारतीय आणि तत्सम मंडळींना ही निवड त्रासदायक ठरू शकेल; परंतु विश्वनाथ प्रतापसिंग यांनी श्रीमती इंदिरा गांधींच्या राजवटीत उद्योग खाते सांभाळत असताना उच्च तंत्र विज्ञानाच्या आयातीसंबंधीची आणि निर्यात वाढावी या दृष्टीनी केलेल्या प्रयत्नांसंबंधीची जाणीव सर्वांना असल्याने 'गडबड' करू इच्छिणारी मंडळी सोडली तर इतरांना त्यांची निवड वाढत्या निर्यातीच्या आवश्यकतेच्या दृष्टीनी स्वागतार्ह वाटते आहे. आर्थिक प्रगतीसाठी लागणारा धक्का नवे अर्थमंत्री देतील असे त्यांच्या समर्थकांना वाटत आहे.

राजीव गांधींचे 'स्वच्छ आणि कार्यक्षम' सरकार या पुढे कोणत्या योजना आणणार व राबवणार याकडे सर्वांचे लक्ष असताना एक गोष्ट जाणवल्याशिवाय राहात नाही ती अशी की नेतृत्व बदलले; परंतु साथीदार बदलले का? पुन्हा बन्सीलाल अवतरले, त्याचे काय? स्वच्छ कारभाराची घोषण शासकीय यंत्रणा अंमलात आणणार कशी?, आर्थिक परिवर्तनासाठी केल्या जाणाऱ्या योजना राबवण्याकरता यंत्रणेची आवश्यकता असते. कॉंग्रेस (आय) मध्ये अशा प्रकारची यंत्रणा उपलब्ध आहे का? भारतीय अर्थ व्यवस्थेचा पाया शेतकरी, त्या संदर्भात किंवा त्याच्या स्थितीत बदल करणारा कोणता कार्यक्रम आणणार? 'ग्रामीण विकास योजना', 'संजय गांधी निराधार योजना' या काही वाईट होत्या का; भारताच्या प्रगतीच्या दृष्टीनी आखलेल्या योजना होत्या त्या यंत्रणेअभावी कोसळल्या. 'स्वच्छ व कार्यक्षम' सरकार देण्याची घोषणा करणे, लाटेवर आरूढ होऊन निवडून येणे एकवेळ सोपे आहे; परंतु पक्ष यंत्रणेशिवाय योजना खालपर्यंत राबवणं..... बघुया काय होतंय ते?

□

---

## बघुया... विधानसभा निवडणुकीनंतर

एका पक्षाची राजवट जाऊन दुसऱ्या पक्षांची राजवट कार्यरत झाली की सरकारी यंत्रणांतील अधिकाऱ्यांच्या बदल्या ह्या अपेक्षित असतातच; परंतु राजवट न बदलता होत असलेले बदल अनपेक्षित असतात म्हणून त्यांना वरील संदर्भ प्राप्त होतात.


गेल्या राजवटीतील प्रणव मुखर्जी जाऊन विश्वनाथ प्रतापसिंग येतात, नियोजन खाते नरसिंहरावांकडे राहते ह्या सारख्या घटना 'काही बदल' होणार असे किमान दर्शवतात, त्याचप्रमाणे मनमोहनसिंग बेदी सध्याचे रिझर्व बँकेचे गव्हर्नर, यांची नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून झालेली नियुक्ती आणि अर्थखात्याचे माजी मुख्य सचिव आणि सध्याचे भारताचे जागतिक नाणेनिधीचे कार्यकारी संचालक आर. एन. मलहोत्रा यांची रिझर्व बँकेचे गव्हर्नर म्हणून झालेली नियुक्ती, होऊ घातलेला बदल दर्शवितात.

तीन लाख कोटीचा Out-lay असणाऱ्या, ७० व्या नियोजन मंडळाच्या उपाध्यक्षपदी केली गेलेली डॉ. मनमोहनसिंग बेदी यांची नियुक्ती ही सध्याच्या आर्थिक पेचप्रसंगातून मार्ग काढण्यास चांगला आराखडा देऊ शकणारी ठरेल असे वाटते. ५० हजार कोटींपेक्षा जास्त ठेवी असलेल्या बँका व ४० हजार कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक असलेले उद्योग, हे आर्थिक परिवर्तन घडवण्याकरता योग्य रितीने वापरावे लागणारे दुवे आहेत. या दोहोंवर नियंत्रण ठेऊ शकणाऱ्या रिझर्व बँकेच्या अध्यक्षपदी करण्यात आलेली नवीन नेमणूक हा सुद्धा 'बदलातील' टप्पा असू शकतो.

H. M. T., हिंदुस्थान पेट्रोलियम, इंडियन ऑइल या सारख्या सरकारी नियंत्रणाखाली असणाऱ्या संस्थांना आम जनतेतून पैसे उपलब्ध करण्याची परवानगी द्यावी की काय.. किंवा IDBM सारख्या बँकांनी किंवा वित्तीय संस्थांनी कर्जाची परतफेड भांडवलाद्वारेच करावी की?...परदेशी नागरिकांची भारतातील 'गुंतवणूक' या विषयी पुनर्विचार, अर्थातच त्यांना दिल्या जाणाऱ्या सवलती संबंधी...म्हणूनच परदेशी चलन मिळवण्याचा एकमेव मार्ग 'परदेशस्थ भारतीय' असा न ठेवता निर्यात वाढवणे असा ठेऊन देशातील अर्थकारणातील हस्तक्षेपांना आळा घालण्याचा प्रयत्न... यासारख्या अनेक गोष्टी घडतील–घडाव्यात असे अंदाज केले जात आहेत.

प्रत्येक जिल्ह्यात 'सेंट्रल स्कूल' ची योजना या सारखी काय, की जी सामाजिक परिवर्तनाला मदत करेल आणि निर्यात वाढवण्यासाठी केल्या जात असलेल्या योजना ज्या आर्थिक परिवर्तनाचा वेग वाढवतील...कदाचित विरोधकांच्या मते विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केला जाणारा हा 'प्रोपगंडा' असेल; परंतु तो नसावा अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे कारण सत्ताधाऱ्यांना त्याची तशी आवश्यकता नाही.

आर्थिक परिवर्तन, सामाजिक परिवर्तन एकूणच 'संपूर्ण बदल' होण्यासाठी नुसते 'कार्यक्षम व स्वच्छ' सरकार व शासकीय यंत्रणा पुरेल? लोकांच्या भावनांवर मिळवलेला विजय, त्यांच्या भावनांना हात, ज्या परिवर्तनासाठी घालावा लागणार आहे तिथे जर तो घातला गेला तर या सर्व गोष्टींना वेग येईल. 'लोकसंख्या वाढ!!!' हे थांबवण्याकरता कोणतीच योजना नवीन सरकारजवळ दिसत नाही की जी सर्व 'प्रश्नांचा' पाया आहे. बघुया कदाचित विधानसभा निवडणुकांनंतर...!




**मूळ लेखक : जेफ्री आर्चर**
**रूपांतर : विष्णू जयदेव**

**( ४ )**

चार्ल्स आणि सायमन दोघंही कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे; पण पक्षाध्यक्षाच्या निवडणुकीपासून त्यांच्यात स्पर्धा सुरू झाली. चार्ल्सला जरी इनव्हॉयर्नमेंट टीममध्ये जागा मिळाली असली तरी चार्ल्सच्या दारू पिऊन गाडी चालवण्यामुळे, भाषणाची जबाबदारी पेलू न शकल्यामुळे, त्याची रवानगी व्हिपच्या कार्यालयाकडे करण्यात आली. सायमनला मात्र सुखद धक्का बसला – चार्ल्सची जागा सायमनला मिळाली. पुढे नव्या मित्रमंडळात सायमन अंडर सेक्रेटरी तर चार्ल्स ज्युनिअर ‘ व्हिप ’ झाला. लेबर पार्टीचा पराभव झाल्यामुळे रेमंडची मात्र निराशा झाली. शॅडो कॅबिनेटमध्ये त्याची काही वर्णी लागली नाही; पण अँड्रूला मात्र ज्युनिअर स्पोकस्मन म्हणून बोलावणं आलं.
मधल्या काळात इंग्लंडमधील बेकारीचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चालला. नाईलाजाने पंतप्रधान हीथना वस्तूंच्या किमती आणि कामगारांचे पगार गोठवावे लागले. देशभर संपाचे लोण पसरले आणि पुन्हा एकदा सार्वत्रिक निवडणुका झाल्या आणि लेबर पार्टी सत्तेवर आली.
‘ फर्स्ट अमंग इक्वल्स ’ ही १९८४ सालातली नवी कादंबरी. त्यातल्या सत्ता-शर्यतीचं चित्र पुढे कोणते रंग भरणार ???

□

कॅलहॅनने पंतप्रधानपदाची सूत्रे हातात घेतली त्या दिवशी अँड्र्यू घरीच होता. सकाळपासून तो फोनची वाट पहात होता. बीबीसी-वरच्या बातम्यात नव्या कॅबिनेट मिनिस्टर्सची नावे जाहीर झाली होती. अजून स्टेट मिनिस्टर्सची यादी आलेली नव्हती. त्याचे होम डिपार्टमेंट मात्र दुसऱ्या कुणाला तरी गेले होते. कॅलहॅन आपल्याला कुठले खाते देतील ह्याकडे त्याचे लक्ष होते.

रॉबर्ट आता पाच वर्षांचा झाला होता. त्याचे हॉलमध्ये फुटबॉल खेळणे चालू होते.

‘ उगाच फोनशी येरझाऱ्या घालत बसू नकोस. रॉबर्ट येथे त्रास देण्यापेक्षा त्याला बाहेर खेळायला घेऊन जा. फोन आला तर मी हाक मारते. ’ लुईस अँड्र्यूला म्हणाली.

लुईस पुढे काही बोलायच्या आत रॉबर्ट धावत त्याच्या खोलीत जाऊन फुटबॉल खेळायचा ड्रेस घेऊन आला आणि अँड्र्यूच्या पुढ्यात त्याने अँड्र्यूचे बूट टाकले. अँड्र्यू हसायला लागला. रॉबर्टला खांद्या-वर बसवून काखेत फूटबॉल धरून तो बाहेर पडला.

बापलेक घरासमोरच्या बागेत आले तेव्हा अँड्र्यू गोलकिपर झाला आणि फूटबॉल हातात घेऊन रॉबर्ट दुसऱ्या टोकाला उभा राहिला. अँड्र्यूचे सगळे लक्ष फोनकडेच होते. पायाने बॉल लोटत लोटत सरळ अँड्र्यूच्या दिशेने आला आणि मग झट्कन बॉल डाव्या बाजूला ढकलत स्वतः उजव्या बाजूला धावला. अँड्र्यू गोंधळून उभा आहे तेवढ्यात रॉबर्टने बॉलकडे उडी मारून थेट गोल केला.

अँड्र्यू हसायला लागला. रॉबर्ट आता चांगलाच चपळ झाला होता.

'बघूया परत जमतं का तुला ?' असं म्हणत त्याने बॉल रॉबर्ट-कडे फेकला.

बॉल पायाने उडवत रॉबर्ट पुन्हा अँड्र्यूच्या दिशेने यायला लागला. रॉबर्टला ही खेळी अँड्र्यूनेच शिकवली होती. अँड्र्यूने आता बॉल अडवायचे ठरविले. रॉबर्टने बॉलला लाथ मारली एवढ्यात फोनची घंटा वाजली. अँड्र्यू खिडकीकडे पाहायला लागला आणि फुटबॉल सरळ त्याच्या तोंडावर येऊन आदळला व उडून रिंगणात गेला. अँड्र्यू नाक चोळतो आहे तोवर खिडकीतून वाकून लुईस म्हणाली, 'कॅलहॅनचा नाही. माझ्या आईचा फोन होता.'

'वेक अप डॅड' त्याला हलवून रॉबर्ट म्हणाला.

रॉबर्ट गोलकिपर झाला आणि अँड्र्यू फूटबॉल घेऊन बागेच्या एका टोकाला गेला. रॉबर्टच्या दिशेने येता येता अँड्र्यूने उजव्या बाजूला वळल्यासारखे केले आणि तो एकदम डाव्या बाजूला वळला. रॉबर्टला अँड्र्यूचा डाव कळला. अँड्र्यूने बॉलला रिंगणाच्या दिशेने लाथ मारताच रॉबर्टने झडप घालून बॉल पकडला.

'नो गोल. नो गोल. डॅड' तो ओरडला. रॉबर्टने बॉल अँड्र्यूकडे फेकला. अँड्र्यू बॉल घेऊन परत बागेच्या टोकाशी आला. बॉल पायात खेळवत अँड्र्यू रॉबर्टच्या दिशेने आला. रॉबर्ट रिंगण सोडून थोडा पुढे आला आहे असे पाहाताच त्याने डाव्या पायाने बॉलला किक् मारली. बॉल रिंगणापलिकडच्या खांबावर आपटून सरळ कंपाऊंडमधून बाहेर गेला. एवढ्यात परत फोन वाजला. अँड्र्यूने खिडकीकडे पाहिले. लुईसने वाकून सांगितले, 'इटस् प्राईम मिनिस्टर'

अँड्र्यू घाईघाईने घराकडे वळणार तोच त्याने रॉबर्टला बॉलपाठी धावत कंपाउंडबाहेर रस्त्यावर जाताना पाहिले. वळणावरून येणाऱ्या ट्रककडे रॉबर्टचे लक्षच नव्हते.

'नो' म्हणून किंचाळत अँड्र्यू रॉबर्टच्या दिशेने धावला. लुईस जागच्या जागी थिजून उभी राहिली. रिसिव्हर अजून तिच्या हातात होता. धक्क्यावर आपटून बॉल परत रस्त्याच्या मध्यावर आला. रॉबर्टने बॉलवर झडप घातली आणि अँड्र्यूने स्वतःला त्याच्यावर झोकून दिले. लॉरीच्या ड्रायव्हरने जीवाच्या आकांताने ब्रेक्स् लावले. गाडी वळणावर कलंडली. मडगार्डच्या धक्क्याने रॉबर्ट आणि अँड्र्यू दहा पंधरा फूट दूर उडवले गेले आणि भेलकांडत गटारात पडले.

'आर यू देअर अँड्र्यू' पंतप्रधानांनी विचारले. लुईस तसाच रिसीव्हर टाकून बाहेर धावली.

अँड्र्यू बेशुद्ध होऊन पडला होता आणि त्याच्या अंगाखाली छातीशी बॉल घट्ट धरून रॉबर्ट पडला होता. लुईसने त्यांना हलवायचा प्रयत्न केला. अँड्र्यूच्या नाकातून ठिपकणारे रक्त रॉबर्टच्या खांद्यावरून ओघळायला लागले.

हात छातीशी धरून लुईस मटकन् खाली बसली. 'लेट देम लिव्ह गॉड. लेट देम लिव्ह.'

दुसऱ्या दिवशी सगळ्या मंत्रिमंडळाची यादी टाइम्समध्ये प्रसिद्ध झाली. फक्त मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर डिफेन्सची जागा अजून भरली गेली नव्हती. कॅलहॅनने ती अँड्र्यूसाठी राखून ठेवली होती. अँड्र्यूचा आणि रॉबर्टचा फोटो सगळ्या पेपरात पहिल्या पानावर छापला होता.

अपघात झाल्यावर काही मिनिटातच त्या दोघांना सेंट थॉमस



अँड्र्यू–रॉबर्ट–लुईस–अपघाताच्या जबर धक्क्यात...

¤

हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. रॉबर्टच्या मेंदूला इजा झाली होती. अँड्र्यूच्या छातीचे हाड मोडले होते. त्याच्या हातापायांनाही इजा झाली होती. डॉक्टरांनी प्रयत्नांची शिकस्त करून अँड्र्यूला वाचवले पण रॉबर्टला काही त्यांना वाचवता आले नाही.

अँड्र्यू शुद्धीवर येऊन घरी परतेपर्यंत आठ दिवस उलटले. अपघात झाला त्या दिवसापासून लुईसची वाचाच गेली होती. डोळे उघडे ठेवून ती अंथरुणावर पडून असायची. तिची काळजी घ्यायला अड्र्यूचे वडील सर डंकन फ्रासर आणि अॅन्ड्र्यूची आई त्यांच्या घरी येऊन राहिले होते. अॅन्ड्र्यू घरी परतला त्या दिवशी रॉबर्टची प्रेतयात्रा काढण्यात आली. अॅन्ड्र्यूला अजून महिनाभर तरी कुबड्या घेऊन चालावे लागणार होते. चर्चमध्ये जाईपर्यंत लुईसला दोनदा मुर्च्छा आली. सर डंकन फ्रासरनी तिला आधार दिला.

घरी आल्यावर अॅन्ड्र्यूने वडिलांना विचारले, 'डू यू थिंक शी विल एव्हर स्पीक अगेन ?'

'तिला फार मोठा धक्का बसला आहे. पण ती सावरेल. तिला अजूनही मूल होऊ शकेल.

अॅन्ड्र्यूने मान हलवली. वडिलांना त्याने डॉक्टर एलिझाबेथ कस्लेक बरोबर झालेले संभाषण सांगितले. 'दॅटस् आऊट ऑफ क्वेश्चन्' तो म्हणाला.

अॅन्ड्र्यूच्या आईने त्याला सांगितले की, लुईसची तब्येत सुधारायची असेल तर त्याने तावडतोब जागा बदलायला हवी. 'लुईस येथेच राहिली तर रॉबर्टचा विचार तिच्या डोक्यातून जायचा नाही.'

'पंतप्रधानांच्या ऑफरचे तू काय ठरवले आहेस ?' सर डंकन फ्रासरनी विचारले.

'मी अजून त्याचा विचारच केला नाही. सोमवारपर्यंत त्यांनी मला वेळ दिला आहे.' अॅन्ड्रयू म्हणाला.

'मला वाटतं तू ती स्वीकारावीस. तुला हळूहळू कामाला लागलंच पाहिजे. घरी बसून रॉबर्टचं दुःख तू आणखी किती दिवस करणार आहेस ?' बोलता बोलता सर डंकन फ्रासरच्या डोळ्यातही पाणी आले.

अँड्र्यूने वडिलांकडे पाहिले. त्याच्या डोक्यात एकच वाक्य घोळत होते 'नो गोल, नो गोल डॅड.'

आईवडिलांना सोडून अँड्र्यू बेडरूममध्ये गेला. लुईस पडून होती. तिच्या चेहऱ्यावर कोणतेच भाव नव्हते. डोळे उघडे होते पण दृष्टी शून्यात हरवलेली. अश्रूंचा एक थेंबही दिसत नव्हता. तिच्या मानेखालून हात घालून अँड्र्यूने तिला छातीशी धरले. रॉबर्ट गेल्यापासून पहिल्यांदाच त्याला रडू आले. त्याचे अश्रू लुईसच्या खांद्यावरून उशीवर ओघळायला लागले. अँड्र्यूला तशीच झोप लागली.

त्याला जाग आली तेव्हा सकाळचे तीन वाजले होते. खिडक्यांचे पडदे अजून ओढून घेतले नव्हते. लुईस थंडीत तशीच पडून होती. अँड्र्यू पडदे ओढून घेण्यासाठी खिडकीशी आला. बागेत आणि रस्त्यावर चंद्राचा शांत प्रकाश पसरला होता. 'नो गोल, नो गोल डॅड' 'आयुष्य किती जर तर वर अवलंबून असते. जर फोनच आला नसता ? जर कंपाऊंडचा दरवाजा उघडा राहिला नसता ?...जर मी अधिक जोराने धावलो असतो...जर...'

लुईसच्या प्रकृतीत काहीच सुधारणा नव्हती. रोज तिच्यासोबत झोपताना अँड्र्यूला अधिकाधिक एकटे वाटायचे. शेकडो सांत्वनपर पत्रे आली होती. त्यातली निवडक अँड्र्यूने लुईसला तिच्या बिछान्यावर बसून वाचून दाखवली. पंतप्रधानांचे–ज्यो मॅक पर्सनचे, सायमन कस्लेकचे–रेमंड गोल्डचे–लुईस ऐकत होती की नाही त्याला कळत नव्हते. डॉक्टरांचे म्हणणे होते की, तिला अॅक्यूट डिप्रेशनचा अॅटॅक आला आहे. यातून बाहेर पडायला तिला वेळ लागेल. खोलीतल्या खोलीत चार पावले चालली तरी लुईसला थकवा यायचा.

सोमवारी अँड्र्यूने वडिलांना सांगितले की, पंतप्रधानांची ऑफर त्याने नाकारायचे ठरविले होते. 'लुईसच्या प्रकृतीत अजून काही फरक नाही. तिला सोडून इतका वेळ जाणे मला योग्य वाटत नाही.'

सर डंकन फ्रासर काहीच बोलले नाहीत.

अँड्र्यू परत बेडरूममध्ये येऊन लुईसच्या उशाशी बसला.

'त्यांनी मला मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर डिफेन्स म्हणून बोलाविले आहे. तुला काय वाटतं, मी ऑफर स्वीकारू का ?'

लुईसच्या चेहऱ्यावरून त्याला कसलाच बोध होत नव्हता.

मग लुईसचा हात हातात घेऊन स्वतःशीच पुटपुटल्यासारखे तो म्हणाला, 'शुड आय् हॅव टेकन द जॉब ?' लुईसची मान किंचित हलली. तिने हलकेच त्याचा हात दाबला आणि मग तिला झोप लागली. अँड्र्यूने ताबडतोब पंतप्रधानांना फोन केला, 'आय् शल टेक द जॉब' तो म्हणाला.

अपघात झाला त्याच्या दुसऱ्या दिवशी अँड्र्यू, रॉबर्ट आणि लुईसचा फोटो सायमन आणि इलिझाबेथनी वृत्तपत्रात पाहिला.

'त्यांच्या मानाने आपले दुर्दैव काहीच नाही. आपली दोन्ही मुलं व्यवस्थित मोठी झाली आहेत' सायमन म्हणाला.

इलिझाबेथ लुईसची काय अवस्था झाली असेल याचा विचार करत होती.

सायमनला आज पक्षाच्या व्हीपला त्याच्या राजिनाम्याबद्दल सांगायचे होते. ब्रेकफास्ट घेऊन सायमन बाहेर पडला. गाडी अँड्र्यूच्या 'चेन वॉक' ह्या घराकडून घेताना थोडावेळ भेटून यावे असे त्याला वाटले. व्हीपकडचे काम झाल्यावर ताबडतोब अँड्र्यूला पत्र लिहिण्याचे त्याने ठरवले.

सायमनने सभागृहाच्या आवारात गाडी पार्क केली आणि तो लिफ्टमध्ये शिरला. व्हीपच्या अपॉइंटमेंटला अजून पंधरा मिनिटे अवकाश होता. सायमनने व्हीपची सेक्रेटरी नोर्सकडे चौकशी केली. ती म्हणाली मार्गारेट थॅचर व्हीपबरोबर चर्चा करीत होत्या. नोर्सने सायमनच्या अपॉइंटमेंटबद्दल व्हीपना आठवण करून दिली होती.

सायमनने लेटरबॉक्समधून मतदारसंघातून आलेली पत्रे गोळा केली आणि तो कॉमन्सच्या लायब्ररीत गेला. सगळ्या पेपरात पहिल्या पानावर अँड्र्यू, लुईस आणि रॉबर्टचा फोटो होता. टाइम्सच्या आतल्या पानावर नेदरकोट अँड कंपनीबद्दल बातमी होती. त्यात कंपनीचे दिवाळे निघण्याची शक्यता वर्तवली होती.

पण संपूर्ण बातमीत सायमनचा वा इतर कोणत्याही संचालकाचा उल्लेख नव्हता. सायमनला वाटले आता अर्ध्या तासात त्याच्या राजिनाम्याची बातमी बाहेर पडली की, दुसऱ्या दिवशी त्याचाही फोटो पहिल्या पानावर येईल. त्याच्या डोळ्यापुढे हेडलाईन आली, 'राइझ अॅंड फॉल ऑफ सायमन कस्लेक' एका दिवसात त्याचे दहा वर्षांचे परिश्रम धुळीला मिळणार होते.

व्हीपची मार्गारेट थॅचरबरोबरची चर्चा संपली; पण ते कॅबिनेट मिटिंगला जायच्या घाईत होते. त्यांनी सेक्रेटरीला सायमनला आत पाठवायला सांगितले. नोर्स सायमनला म्हणाली की, तो लायब्ररीत असताना रॉनी नेदरकोट नावाच्या माणसाने त्याला दोनदा फोन केला. त्याने सायमनला ताबडतोब फोन करायला सांगितले होते. सायमन व्हीपच्या केबिनमध्ये शिरणार तोच परत फोन वाजला.

'इटस् रॉनी नेदरकोट, मिस्टर कस्लेक. ही सेज इटस् अर्जंट.'

सायमनला रॉनीशी बोलायची इच्छा नव्हती; पण तरीही त्याने फोन घेतला.

'गेले दोन तास मी तुझ्याशी बोलायचा प्रयत्न करतो आहे. तू व्हीपला अजून भेटला नाहीस ना ?'

'नाही.'

रॉनीने सायमनला सांगितले की, त्याला मॉर्गन अॅंड ग्रेनफेल कंपनीकडून फोन आला होता. या कंपनीचा एक क्लायंट नेदरकोट अॅंड कंपनीचे शेअर्स प्रत्येकी १.५० पौंडांना घ्यायला तयार होता.

सायमनने मनातल्या मनात गणित करून पहाण्याचा प्रयत्न केला.

'विचार करायची गरज नाही.' रॉनी म्हणाला. 'तुझ्या शेअर्सची किंमत नव्वद हजार पौंड होते.'

'माझा ओव्हर ड्राफ्ट एक लाख आठ हजार पौंडाचा आहे.' सायमन म्हणाला.

'कबूल. पण ह्या भावाने शेअर्स गेले तर तुझे अठरा हजार पौंडांनी नुकसान होते आहे. नुकसान मोठे असले तरी निदान दिवाळे तरी निघत नाही. मॉर्गन कंपनीला कुणीतरी आपली कंपनी ताब्यात

घेण्याचा सल्ला दिलेला दिसतो आहे. त्यांना हा सौदा फार स्वस्तात पडेल; पण निदान आपली अब्रू तरी वाचेल.'

रॉनीने सायमनला रात्री जेवायला बोलावले ह्याकडे सायमनचे लक्षच नव्हते. त्याने रिसिव्हर खाली ठेवला. अजूनही अठरा हजार पौंडाचे कर्ज त्याला फेडावे लागणार होते. रॉनी बरोबरचा सगळाच व्यवहार आतबट्ट्याचा झाला होता. पण निदान राजकारणातून तरी तो उठला जाणार नव्हता. आनंदाच्या भरात सायमनने व्हीपच्या सेक्रेटरीला मिठी मारली आणि तिच्या कपाळाचे चुंबन घेतले.

सायमन अजून आत आला नाही हे पाहून व्हीप बाहेर आले आणि सायमनच्या मिठीत आपल्या सेक्रेटरीला पाहून हसत म्हणाले.

'ॲन ऑर्जी इन् द् चीफ व्हीपस् ऑफिस ? यू विल बी ऑन पेज थ्री ऑफ 'द् सन' नेक्स्ट, मिस नोर्स.'

'द सन्' हे इंग्लंडमधील लोकप्रिय वृत्तपत्र आहे. कामगार वर्गात त्याचा विशेष खप आहे. सन आणि डेली मिरर ह्या दोन वृत्तपत्रांचा कल लेबर पार्टीकडे आहे. सनच्या तिसऱ्या पानावर नेहमी न्यूड मॉडेल्सचा फोटो असतो.

सायमनला हसू आले. तो व्हीपना म्हणाला की आज रात्री त्याला 'पेअरिंगची' गरज होती. त्याला कामासाठी थोडे बाहेर जायचे होते. पण एव्हढ्यासाठी सायमनने खास अपॉइंटमेंट का घेतली हे व्हिपना कळले नाही.

सायमनने ताबडतोब मिलबर्नना फोन करून बातमी दिली. 'मार्गन कंपनीचा क्लायंट कोण आहे कुणास ठाऊक पण तो नसता तर मी आयुष्यातून उठलो असतो.' सायमन म्हणाला. सायमनने मिलबर्नला सांगितले की तो त्याचे राजीनाम्याचे पत्र परत घेईल.

'तू इंग्लंडचा पंतप्रधान बनशील त्याच दिवशी तुझ्या राजीनाम्याचे पत्र मी परत करेन.' मिलबर्न म्हणाला. सायमनने दुसरा फोन एलिझाबेथला केला.

चार्लसला ही बातमी समजली तेव्हा त्याने ताबडतोब क्लाईव्हला बोलावून घेतले.

'मॉर्गन कंपनीने ज्याप्रकारे नेदरकोट कंपनी ताब्यात घेतली त्यावरून त्यांना आधी कुणी तरी माहिती दिली असली पाहिजे. ह्याखेरीज त्यांनी असं धाडस केले नसते.'

क्लाईव्ह काहीच बोलला नाही.

तो चार्लसला म्हणाला की, नेदरकोट कंपनीचा अकाऊंट बंद करण्यात सेमूर बँकेची चूकच झाली होती. त्यामुळे मॉर्गन कंपनीचा अनायासे फायदा झाला. फक्त रॉनी नेदरकोटला आता नव्याने सुरवात करावी लागेल पण अशा निर्णयामुळे बँकिंग सर्कलमध्ये सेमूर बँकेचे नाव खराब झाले आहे

चार्लसने क्लाईव्हला बजावून सांगितले की, ह्याविषयी त्याने बाहेर कोठेही वाच्यता करता कामा नये.

क्लाईव्ह फारच कमी बोलायचा. त्यामुळे त्याच्या मनात काय आहे याचा चार्लसला थांगपत्ता लागत नसे; पण तरीही हाऊस ऑफ कॉमन्सच्या कामात क्लाईव्हची चार्लसला फार मदत व्हायची.

नोव्हेंबर १९७६ मध्ये लेबर पार्टीच्या फायनान्स मिनिस्टरांनी सभागृहापुढे अंदाजपत्रक मांडले त्या वेळी फायनान्स बिलावर झालेल्या चर्चेत चार्लसची भाषणे इतकी अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद



चार्लस–फिओनाने केलेला विश्वासघात...

□

होत असत की त्याने सुचविलेल्या एक–दोन सुधारणांचा जेव्हा लेबर फायनान्स मिनिस्टरांना बिलात सामावेश करणे भाग पडले तेव्हा मार्गारेट थॅचरने खास पत्र लिहून चार्लसचे अभिनंदन केले. भाषणापूर्वी प्रत्येक मुद्द्यावर चार्लस क्लाईव्हबरोबर चर्चा करीत असे. चार्लसच्या या यशामुळे निवडणुकीपूर्वी कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या शॅडो फायनान्स टीममध्ये त्याची वर्णी लागेल अशी कॉमन्सच्या स्मोकिंग रूममध्ये अलेक् पिमकिनने चर्चा सुरू केली.

हाऊस ऑफ कॉमन्समध्ये मार्गारेट थॅचरचा विश्वास संपादन करण्यात चार्लसला यश लाभले. पण त्याची पत्नी फिओनाच्या बाबतीत मात्र तो अपयशी ठरला.

सभागृहामधून एकदा दुपारी चार्लसने फायनान्स बिलाच्या एका तरतुदीची चर्चा करण्यासाठी क्लाईव्हला कॉमन्सजवळच्या एका हॉटेलमध्ये जेवायला बोलावले.

हॉटेलजवळ गाडी उभी करताना चार्लसने फिओनाला पलिकडच्या एका हॉटेलमध्ये एका माणसाबरोबर शिरताना पाहिले. फिओनाने घातलेला पोषाख चार्लसने ह्यापूर्वी कधीच पाहिला नव्हता.

क्लाईव्हबरोबरची अपॉइंटमेंट विसरून चार्लसने फिओनाचा पाठलाग सुरू केला. दोन तास स्टॅफोर्ड हॉटेलबाहेर ताटकळत उभे राहिल्यानंतर चार्लसने फिओनाला अलेक्झांडर डग्लसबरोबर हॉटेलमधून बाहेर पडताना पाहिले. दोघेही वेगळ्या टॅक्सीत बसून निघून गेली. चार्लसला त्या दिवशी कॉमन्समध्ये फायनान्स बिलाची चर्चा चालू आहे याचाही विसर पडला.

त्याच दिवशी त्याने अल्बर्ट क्रुडिक नावाच्या एका खाजगी गुप्तहेराला महिनाभर फिओनावर नजर ठेवायला सांगितले. महिनाभराच्या कामानंतर क्रुडकने चार्लसला वेळ, तारखा, जागा, टॅक्सीनंबर, नकळत काढलेले फोटो इत्यादीसहित तयार केलेली फाईल आणि एक हजार पौंडाचे बिल दिले. बिल पाहून चार्लसला फिओनाचा अधिकच राग आला.

फिओना डग्लसला केव्हा भेटायला जाते ह्याची आता चार्लसला

कल्पना आलेली होती. एके दिवशी तो मुद्दाम वेळ काढून लवकर घरी आला. फिओना डग्लसला भेटून घरी परतली तेव्हा चार्ल्स खोलीत बसलेला पाहून तिला धक्का बसला. पण तिने चटकन स्वतःला सावरून घेतले. चार्ल्सने कुडिकने तयार केलेली फाईल तिच्या पुढे टाकली.

दोन-तीन पाने उलटल्यावरच फिओना पलंगावर पडून रडायला लागली; पण आता चार्ल्स ऐकायला तयार नव्हता.

'मी तुला एक आठवडयाचा वेळ देतो. तेवढयात तुझे सामान घेऊन तू येथून चालायला लाग' तो म्हणाला. चार्ल्सला काही आपली दया येण्याची शक्यता नाही हे पाहताच फिओनाने पवित्रा बदलला.

'आणि मी येथून गेले नाही तर ?'

'मला धक्के मारून तुला बाहेर काढावे लागेल. तुझी अशी हकालपट्टी झाली तर डग्लसला कोर्टात घटस्फोट मिळणे कठीण होईल.'

चार्ल्सने तिला बजावून सांगितले की, तो सात दिवस बाहेर राहील. तेवढया वेळात तिने नवी जागा शोधली पाहिजे. या नंतर दोन वर्षे त्यांनी एकमेकांना भेटताही कामा नये. म्हणजे फारसा गाजावाजा न करता त्यांना घटस्फोट घेणे शक्य होईल.

अशा रीतीने ब्रिजवॉटरच्या तेराव्या अर्लचा मुलगा चार्ल्स सेमूर आणि त्याची पत्नी, फालकीर्कच्या ड्यूकची एकुलतीएक मुलगी फिओना यांनी विभक्त व्हायचे ठरवले. चार्ल्सपेक्षा फक्त नऊ मिनिटे मोठा असलेला त्याचा जुळा भाऊ रुपर्ट ह्याला मूलबाळ नव्हते. आता अर्ल ही पदवी पुढे कोणाकडे जाणार हा प्रश्नच होता.

चार्ल्स एक आठवडयानंतर परत आला तोवर फिओनाने तिचे सामान घेऊन घर सोडले होते.

### पहारेकऱ्याला धक्काच बसला

फायनान्स बिलाची चर्चा जेव्हा सभागृहात चालली होती तेव्हा रेमंड ब्रिटिश सरकारचा प्रतिनिधी म्हणून अमेरिकेला आला होता. रेमंडची अमेरिकेची ही दुसरी वारी. दोन महिन्यापूर्वी युनायटेड स्टेटस् कॉंग्रेसपुढे सरकारतर्फे भाषण देण्यासाठी इतर दोन कॅबिनेट सेक्रेटरींबरोबर तो वॉशिंग्टनला येऊन गेला होता.

या खेपेस वॉशिंग्टनमध्ये वेगवेगळया देशातील व्यापारमंत्र्यांची परिषद होती. ब्रिटनला इंटरनॅशनल मॉनेटरी फंडा ( आय्‌एम्‌एफ् ) कडून मिळणाऱ्या कर्जाचे नूतनीकरण केले जावे अशी मागणी परिषदेत करण्यासाठी लेबर गव्हर्नमेंटतर्फे रेमंडला पाठविण्यात आले होते.

रेमंड अमेरिकेच्या प्रथमदर्शनीच प्रेमात पडला होता. ह्या लोकांच्या जीवनात असलेले सततचे नाविन्य, त्यांचा उत्साह, स्वतंत्र वृत्ती, ह्यामुळे त्याला केटची आठवण व्हायची. मागच्या भेटीत त्याने अमेरिकेतील महत्त्वाच्या राजकीय नेत्यांची भेट घेतली होती. यावेळी प्रेसिडेंट फोर्ड आणि सिनेटर गॅरी हार्ट यांना वेळातवेळ काढून भेटण्याचे त्याने ठरविले.

परिषदेतील रेमंडचे भाषण तयार करण्यासाठी त्याच्या खात्यातील सचिवांनी फार परिश्रम घेतले होते. बॅंक ऑफ इंग्लंडच्या गव्हर्नरचाही सल्ला घेण्यात आला होता. जागतिक परिषदेत देशाचे प्रतिनिधित्व करण्याची रेमंडची ही पहिलीच वेळ. त्यामुळे त्याने कित्येक दिवस भाषणाची तयारी केली होती. केटला कंटाळा येईपर्यंत त्याने तिच्यापुढे भाषणाचा सराव केला होता. केटनेही त्याला भाषण तयार करण्यासाठी बरीच मदत केली होती.

रेमंडचे भाषण तिसऱ्या दिवशी होते. पहिल्या दोन दिवसात रेमंडला अशा प्रकारच्या जागतिक स्वरूपांच्या परिषदांतील वातावरणाचा अंदाज आला. लीडस्‌मधील मतदारांपुढे भाषण करणे, कोर्टात जज्जपुढे बोलणे आणि हाउस ऑफ कॉमन्समध्ये भाषण करणे यापेक्षा हा प्रकार वेगळा आहे हे त्याच्या ध्यानात आले.

इतके दिवसांच्या तयारीचा रेमंडला फायदा झाला. भाषण करताना त्याला नोटस्‌चा आधार घ्यावा लागला नाही. तेरा वर्षांच्या सरावानंतर रेमंडने प्रयत्नपूर्वक वक्तृत्वकला आत्मसात केली होती. भाषण संपवून तो खाली बसला तेव्हा त्यालाही जाणवले की, त्याच्या आयुष्यातले हे सर्वोत्कृष्ट भाषण होते. आय्‌एम्‌एफ्‌च्या कर्जाचे नूतनीकरण केले जाईल याची त्याला शंका वाटत नव्हती.

त्या दिवशीचे वॉशिंग्टनमधील संध्याकाळचे पेपर्स त्याने पाहिले. त्याच्या भाषणाचा विस्तृत वृत्तांत छापून आला होता. वॉशिंग्टन पोस्टने रेमंडचा ब्रिटनचा भावी फायनान्स मिनिस्टर म्हणून उल्लेख केला होता. वॉशिंग्टन पोस्टच्याच आऊटलूक ह्या सेक्शनमध्ये लिहिताना एका पत्रकाराने रेमंडबद्दल 'ही हॅज द आउटलूक ऑफ अ फ्युचर प्राइम मिनिस्टर' असा उल्लेख केला होता. केटला दाखविण्यासाठी रेमंडने ते कटिंग काळजीपूर्वक बाजूला काढून ठेवले.

जागतिक परिषदेतील आपल्या यशाचा रेमंडला इतका आनंद झाला होता की, परिषद आटोपल्यावर संध्याकाळी तो एकटाच चालत ब्रिटिश वकिलातीकडे निघाला. वकिलातीत प्रवेश करताना पहारेकऱ्याला रेमंडने त्याचे ओळखपत्र दाखविले तेव्हा त्याचा विश्वास बसेना. ब्रिटनचा ट्रेड मिनिस्टर चक्क एकही बॉडीगार्ड न घेता पायी चालत आलेला त्याने कधीच पाहिला नव्हता.

रेमंड वकिलातीच्या मुख्य इमारतीशी आला, तेव्हा त्याने ब्रिटिश फ्लॅग अर्ध्यावर आणलेला पाहिला. त्याने ताबडतोब रिसेप्शनवर कोण मृत्यू पावले ह्याची चौकशी केली.

'फॉरेन सेक्रेटरी अँथनी क्रॉसलॅंड' असे त्याला सांगण्यात आले. रेमंड अमेरिकेला निघाला त्याच्या आदल्या दिवशीच फॉरेन सेक्रेटरींना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. निघण्यापूर्वी रेमंड त्यांना हॉस्पिटलमध्ये भेटून आला होता. रेमंडने लंडनला टेलेक्स करण्याचा प्रयत्न केला; पण लाईन क्लिअर नव्हती. ऑपरेटरकडे निरोप ठेवून रेमंड सिनेटर हार्टबरोबर रात्रीचे जेवण घ्यायला बाहेर पडला. ट्रेड मिनिस्टरला परत एकटेच बाहेर पडताना पाहून पहारेकऱ्याला धक्काच बसला पण रेमंडला तसे सांगण्याचा त्याला धीर झाला नाही. ब्रिटनच्या प्रत्येक मंत्र्याला आयरिश रिपब्लिकन आर्मीच्या दहशतवाद्यांपासून धोका होता.

चौथ्या दिवशी परिषदेत फ्रेंच कॉमर्स मिनिस्टरचे भाषण चालू असताना ब्रिटनच्या वॉशिंग्टन मधील राजदूताने रेमंडला आत चिठ्ठी पाठवली. चिठ्ठीतल्या निरोपानुसार रेमंडला तातडीने लंडनला परत बोलावण्यात आले होते. आणखी एक तासाभरात विमान सुटणार होते. संध्याकाळी सव्वासातला लंडनच्या हिथ्रो विमानतळावर उतरल्यावर रेमरंडला थेट टेन डाऊनिंग स्ट्रीटवर येण्याची सूचना

होती. रेमंडने राजदूताला निरोपामागचे कारण विचारले. त्यांना काहीच ठाऊक नव्हते. दहा मिनिटांपूर्वी पंतप्रधानांकडून फक्त एवढाच निरोप आला होता.

राजदूताने सांगितले की, रेमंडला सरळ विमानतळावर जाता येईल. त्याचे सामान वकीलातीवरून परस्पर विमानतळावर पाठविण्यात येईल.

रेमंड कॉन्फरन्स अर्ध्यावर सोडून ताबडतोब लंडनला परतला. विमानातून त्याला प्रथम उतरू देण्यात आले. विमानतळावर त्याला घेण्यासाठी गाडी हजर होती. रेमंड साडेसातपर्यंत टेन डाऊनिंग स्ट्रीटवर हजर झाला.

रेमंड पोहोचला तेव्हा पंतप्रधान कॅलहॅन मालावीचे प्रेसिडेंट डॉ. बांदाबरोबर होते. रेमंड आल्याचे कळल्याबरोबर पंतप्रधान दोन मिनिटांसाठी बाहेर आले. रेमंड पंतप्रधानांच्या अभ्यासिकेत उभा होता.

'अँथनी क्रॉसलॅंडच्या मृत्यूमुळे मंत्रिमंडळात काही बदल करावे लागतील. सेक्रेटरी फॉर ट्रेडना मी क्रॉसलॅंडची जागा घ्यायला सांगितले आहे. तू सेक्रेटरी फॉर ट्रेडचे पद घेशील का ?'

रेमंडचा विश्वासच बसेना. 'आय शुड बी ऑनर्ड, प्राईम मिनिस्टर' तो म्हणाला.

'गुड. यू हॅव अर्नड युवर प्रमोशन' कॅलहॅन म्हणाले. 'रेमंड मला लगेच डॉक्टर बांदांकडे परतले पाहिजे. उद्या दहाला कॅबिनेट मिटिंग आहे विसरू नकोस.'

पंतप्रधान आत गेले तरी रेमंड उभाच होता. रेमंड गोल्ड आता कॅबिनेट मिनिस्टर झाला होता. केटला इथूनच फोन करावा की घरी जाऊन—त्याचा निर्णय होईना.

रॉबर्टचा मृत्यू झाल्याला वर्ष होत आले. अँड्र्यूने लंडनमध्येच नवे घर घेतले होते. लुईसच्या आईने त्यांना सगळा संसार हलविण्यास मदत केली. नव्या घरात अँड्र्यू आणि लुईसबरोबर ती दोन महिने राहिली देखील; पण लुईसच्या प्रकृतीत फरक नव्हता.

अँड्र्यू डिफेन्स डिपार्टमेंटच्या कामात गुंतल्यामुळे हळूहळू तो मुलाच्या मृत्यूच्या दुःखातून बाहेर पडला; पण लुईसची स्थिती तशी नव्हती. रॉबर्ट गेल्या दिवसापासून तिच्या तोंडून एक शब्दही बाहेर फुटला नव्हता.

अँड्र्यूला काम भरपूर असायचे. एअरफोर्ससाठी विमानांची खरेदी, रॉयल नेव्हीसाठी पोलादीय क्षेपणास्त्रे, लष्करासाठी रणगाड्यांची निवड अशा एक ना अनेक कामात अँड्र्यूला क्षणाचीही फुरसत मिळत नसे. रात्री लुईसशी जेव्हा तो दिवसातल्या घडामोडींबद्दल बोलायचा तेव्हा ती आपले बोलणे लक्षपूर्वक ऐकते आहे असे त्याला वाटायचे. कधी कधी संमती दर्शविण्यासाठी ती मानही डोलवत असे.

लुईसच्या सहवासात अँड्र्यूला अपराधी असल्यासारखी भावना व्हायची. आपण दुःखातून बाहेर पडलो; पण लुईसला मात्र अजूनही रॉबर्टला विसरता येत नाही. त्याला वाटे लुईस तासनतास रॉबर्टच्या फोटोकडे टक लावून पाहात बसलेली असे.

रॉबर्टच्या सहाव्या वाढदिवसाला अँड्र्यू घरीच थांबला. त्या दिवशी पहिल्यांदा लुईसला रडू कोसळले. अँड्र्यू संपूर्ण दिवस तिच्या सोबत राहिला; पण त्याने तिला आवरले नाही. डॉक्टरांचे म्हणणे पडले की ती जितकी रडेल तितके तिचे दुःख कमी होईल. तिला विरंगुळा वाटावा म्हणून अँड्र्यू तिला आठवडाभर व्हेनिसलाही घेऊन गेला. प्रवासाचा फायदा एवढाच झाला की, लुईस आता अंथरुणावर पडल्या पडल्या वाचन करायला लागली. अजून ती लोकांत मिसळत नसली तरी स्वतःची बारीकसारीक कामे ती स्वतःच करायला लागली. लुईसची काळजी घ्यायला सतत चोवीस तास घरात नर्स बाळगायची अँड्र्यूला गरज राहिली नाही.

लुईसच्या प्रकृतीबद्दल अँड्र्यूने मानसोपचार तज्ज्ञांशी चर्चा केली तेव्हा त्यांनी त्याला सुचवले की, त्यांनी रॉबर्टच्या वयाचे एखादे मूल दत्तक घ्यावे. 'तुमच्या पत्नीला मुलांची आवड आहे. तिच्या पसंतीचे मूल जर तुम्ही निवडले तर कदाचित तिचे मन रमू शकेल.' त्याला डॉक्टरांनी सल्ला दिला.

'लुईसची इच्छा असेल तर माझी काहीच हरकत नाही.' अँड्र्यू म्हणाला, 'पण मूल शक्यतो स्कॉटिश अनाथालयातून मिळाले तर बरे.'

## क्लेअरची ओळख

डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार अँड्र्यूने लुईसबरोबर एडिंबरोमधल्या ग्रुंचन चिल्ड्रन्स होमला भेट दिली. स्टेट मिनिस्टर फॉर डिफेन्स अँड्र्यू फ्रासर आपल्या अनाथगृहाला भेट देणार हे कळल्यावर अनाथालयाच्या मेट्रनने अनाथालयाला नवा रंगही देऊन घेतला होता.

शनिवारी सकाळीच अँड्र्यू लुईसला घेऊन अनाथालयात आला. ती दोघं मेट्रनच्या ऑफिसमध्ये बसली होती तेव्हा मुले बाहेर ग्राऊंडवर खेळत होती. लुईसला घेऊन येण्याआधी अँड्र्यूने सगळ्या मुलांचे फोटो आणि केस हिस्ट्री मागवून घेतली होती.

मेट्रनने खिडकीतून लुईसला मुलांना पहायला सांगितले. मुले बाहेर फुटबॉल खेळत होती. लुईस पाच–दहा मिनिटे खिडकीशी उभी राहिली; पण तिला या मुलांमध्ये काही इंटरेस्ट आहे असे अँड्र्यूला वाटले नाही. रॉबर्टसारखा दिसणारा मुलगा तर जेव्हा खिडकीशी धावत आला तेव्हा ती चटकन् दूर होऊन खुर्चीत बसली. लुईसला अनाथालयात आणण्यात चूकच झाली असे अँड्र्यूला वाटायला लागले. मेट्रनबरोबर चहा आणि फोटोचा कार्यक्रम झाल्यावर अँड्र्यूला वाटले आता निघावे.

'त्यांना बोलवायला सांगू का कुणा मुलाला ?' अँड्र्यूने विचारले. लुईसने मानेनेच नकार दिला.

लुईसला घेऊन अँड्र्यू निघणार एव्हढ्यात मेट्रन म्हणाल्या, 'एक छोटी मुलगी आहे पण तुम्हाला आवडणार नाही म्हणून दाखवली नाही.'

का ? अँड्र्यूला नवल वाटून त्याने विचारले. 'वेल, यू सी, शी इज ब्लॅक.' मेट्रन म्हणाल्या. त्यांनी अँड्र्यूला सांगितले की त्या मुलीला अनाथालयाच्या दरवाजाशी सोडून देण्यात आले होते. तिच्या आई–वडिलांचा पत्ता नव्हता. 'मंत्र्याच्या घरात असे मूल शोभणार नाही' त्या म्हणाल्या.

अँड्र्यूला मेट्रनचा संताप आला. लुईस नसती तर त्याने त्यांना चांगलेच फैलावर घेतले असते. लुईसचे मत घेण्याआतच त्याने मेट्रनला सांगितले.

'आय शुड लाईक टू सी हर.'

अँड्र्यूच्या आवाजातली धार पाहून मेट्रनने घाईघाईने नोकराला त्या मुलीला आणायला सांगितले. पाच मिनिटांत नोकर मुलीला घेऊन आला. मुलगी चार-पाच वर्षांची. अगदी हडकुळी. अँड्र्यूपुढे ती मान खाली घालून उभी राहिली. पाहुण्यापुढे तिला आणायचा विचारच नसल्याने तिला कपडेही चांगले घातले नव्हते.

'लुक अप, चाईल्ड' मेट्रन म्हणाली.

मुलीने हळूच डोके वर केले आणि अॅन्ड्र्यूकडे पाहिले. तिचे मोठे काळेभोर डोळे अँड्र्यूला आवडले.

'नाव काय तुझे?' त्याने विचारले.

'क्लेअर' असे म्हणून तिने पुन्हा मान खाली घातली. रॉबर्ट जन्माला आला तेव्हा मुलगी होईल असे लुईसला वाटले होते. तिने मुलीचे नाव क्लेअर निश्चित केले होते.

अँड्र्यूने पुढे प्रश्न विचारला नाही म्हणून मेट्रन मुलीकडे वळल्या.

'यु कॅन लिव्ह अस् नाऊ चाईल्ड.' त्या म्हणाल्या. क्लेअर वळून परत जायला लागली. 'मला खात्री होती तुम्हाला मुलगी आवडणार नाही.' मेट्रन म्हणाल्या.

पण लुईसचे मेट्रनकडे लक्ष नव्हते. रॉबर्ट गेल्यापासून पहिल्यांदाच अँड्र्यूने तिच्या डोळ्यात अशी चमक पाहिली. ती खुर्चीवरून उठली आणि क्लेअरकडे चालत गेली. तिला थांबवलं. मग तिच्यापुढे गुडघ्यावर बसून तिच्या डोळ्यात पाहात लुईस म्हणाली, 'किती छान दिसतेस तू. आमच्या घरी रहायला येतेस?'

लुईस स्वतःहून बोलायला लागली याचाच आनंद अँड्र्यूला जास्त झाला होता.

१६ डिसेंबर १९७७ ला हिथ्रो विमानतळाच्या अंडरग्राऊंड एक्स्टेंशनचे उद्घाटन राणीने केले तेव्हा रेमंड प्रमुख पाहुणा म्हणून हजर होता. उद्घाटनानंतर बकिंगहॅम पॅलेसमध्ये भोजनाचे निमंत्रण होते. कार्यक्रमासाठी जॉईस खास लीडसहून लंडनला आली. कॅबिनेट मिनिस्टर ह्या नात्याने रेमंडने बऱ्याच वेळा राणीची भेट घेतली होती; पण जॉईसची मात्र राणीला भेटण्याची ही पहिलीच वेळ. तिने बराच वेळ खर्च करून नवीन ड्रेस विकत आणला.

आता इतक्या वर्षांनी आपल्याला मूलबाळ होईल अशी अपेक्षा जॉईसने ठेवली नव्हती; पण कमीत कमी आपण उत्तम पत्नी तरी व्हावे असा तिचा प्रयत्न असे.

लेबर पार्टीच्या बऱ्याच मतदार संघातल्या निवड समित्यांत अतिडाव्या गटाचा जोर वाढत होता. अँड्र्यूच्या एडिंबरो कार्लटन मतदार संघातही त्याला ह्या लोकांना तोंड द्यावे लागत होते; पण जॉईस लीडसमध्ये ठाण मांडून बसली असल्याने रेमंडविरूद्ध ह्या लोकांना तिने कधीच डोके वर काढू दिले नव्हते.

रेमंडच्या मतदार संघातले सगळे प्रश्न जॉईस स्वतः सोडवत असे 'रे कॅबिनेट मिनिस्टर आहे. त्याच्या डोक्यावर संपूर्ण इंग्लंडची जबाबदारी आहे. त्याला लीडसमधल्या कामासाठी कशाला त्रास द्यायचा' असे तिचे म्हणणे असे.

रेमंड कॅबिनेट मिटिंग आटोपून परत आल्यावर कपडे करून ताबडतोब उद्घाटनासाठी निघायला वेळ होऊ नये म्हणून जॉईसने स्वतःची तयारी आधीच आटोपली होती. रेमंडचा शर्ट, कोट, टाय, सूट तिने पलंगावर काढून ठेवले होते. रेमंडला नेहमी पांढरा स्वच्छ हातरुमाल लागत असे त्यामुळे हातरूमाल शोधण्यासाठी तिने कपड्यांचे कपाट उघडले. रूमाल शोधताना तळाशी घडीही न मोडलेला गुलाबी शर्ट तिला दिसला. असल्या रंगाचे शर्टस् रेमंड घालत नाही हे जॉईसला ठाऊक होते. जॉईसने शर्ट बाहेर काढून पाहिला. कॉलरशी एक चुरगाळलेला कागद होता. जॉईसने तो जुने लॉंड्रीचे बिल समजून फेकून दिला असता पण तिने त्याच्या कोपऱ्यात 'डार्लिंग' असे लिहिलेले पाहिले म्हणून चिठ्ठी वाचली.

डार्लिंग रे,

तू जर हा शर्ट घालायचे कबूल केलेस तर तुझ्याशी लग्न करायचीही माझी तयारी आहे!

केट

एका क्षणात जॉईसचा सारा नूर पालटला. ती मटकन पलंगावर बसली आणि तिच्या डोळ्यातून अश्रू ओघळायला लागले.

थोड्याच वेळात डोळे पुसून जॉईसने शर्ट घडी करून जसाच्या तसा चिठ्ठीसकट कप्प्याच्या तळाशी ठेवला. कपाट बंद करून ती रेमंडची वाट पाहात बसली.

जॉईस तयार होऊन बसलेली पाहून रेमंडला हायसे वाटले. तो घाईघाईने बेडरूममध्ये गेला आणि कपडे बदलायला सुरुवात केली. जॉईसने आधीच कपडे बाहेर काढून ठेवलेले पाहून त्याला समाधान वाटले. भराभर कपडे बदलून दहा मिनिटांत रेमंड जॉईसबरोबर गाडीतही बसला. जॉईसचा चेहरा थोडा निस्तेज दिसतो आहे याकडे कॅबिनेट मिनिस्टर रेमंड गोल्ड यांचे लक्षही गेले नाही.

अठरा हजार पौंडाच्या कर्जामुळे सायमनची सांपत्तिक स्थिती फार हलाखीची झाली होती. अगदी दोन वेळच्या जेवणाची पंचाईत होती असे नसले तरी बारीक सारीक बाबतीत, मुलांची हौस पुरवताना त्यांना पैशाची कमतरता जाणवायची. त्यातच एलिझाबेथची 'सेंट मेरीज' हॉस्पिटलमधली नोकरी सुटली. हॉस्पिटलमधल्या कामात दुर्लक्ष होत असल्याबद्दल एलिझाबेथला आधी तीन–चारदा वॉर्निंग मिळाली होती. स्वतःची करीअर सांभाळून सायमनला त्याच्या मतदार संघातील कामात मदत करताना तिची फार ओढाताण व्हायची.

'यू शुड सेलिब्रेट डिझॅस्टर्स, नॉट सक्सेस' असे म्हणून सायमनने तिची समजूत काढायचा प्रयत्न केला; पण तिने नोकरी करावी की न करावी ह्याबद्दल सल्ला मात्र दिला नाही.

एलिझाबेथ स्वतंत्र वृत्तीची होती. आपला नवरा एम्.पी. असला तरी नोकरी मिळवण्यासाठी त्याच्या नावाचा उपयोग एलिझाबेथने केला नसता. दोन चार महिन्यांनी तिची पकल्ब्रिज जनरल हॉस्पिटलमध्ये निवड झाली. पकल्ब्रिज सायमनचा मतदार संघ होता निवड होईपर्यंत एलिझाबेथने हॉस्पिटलच्या लोकांना आपण सायमन कसलेकची पत्नी असल्याचे सांगितले नाही. नोकरीच्या अर्जात तिने तिचे माहेरचे एलिझाबेथ ड्रुमंड हेच नाव दिले होते. एलिझाबेथला सायसायमनच्या मतदार संघातच काम मिळाल्याने आता तिला सायमनच्या कामाकडेही लक्ष द्यायला वेळ मिळणार होता.

अँड्र्यूची मात्र तशी स्थिती नव्हती. मंत्रिपदाची जबाबदारी सांभाळून लुईसच्या प्रकृतीकडे लक्ष देताना त्याला दर शनिवार, रविवार एडिंबरो कार्लटन मतदार संघात जाणे शक्य होत नसे.

क्लेअरची लुईसशी आता चांगलीच गट्टी जमली होती. दिवसभर लुईसच्या उशाशी ती बडबड करीत बसलेली असायची. लुईस आपले बोलणे ऐकते आहे की नाही ह्याकडे तिचे लक्षही नसायचे. क्लेअर पाच वर्षांची होती पण अजूनही अंथरूण ओले करायची तिला सवय होती. लुईस मात्र तिच्यावर कधीच रागवत नसे.

घराची घडी आता व्यवस्थित बसत चालली आहे असे अँड्र्यूला वाटते आहे तोच त्याच्या मतदार संघात अतिडाव्या गटाने डोके वर काढायला सुरुवात केली. एडिंबरो कार्लटनच्या लेबर पार्टीच्या निवड समितीवर डाव्या गटाचे पाच लोक होते. ते आपल्या गटाला 'मिलिटंट टेंडन्सी' असे म्हणत. फ्रँक बॉईल म्हणून एक कामगार नेता ह्या गटाचा प्रमुख होता. फ्रँक बॉईलला एडिंबरो कार्लटनमधून आपल्या ऐवजी निवडणूक लढवायची आहे असा अँड्र्यूला संशय येत होता.

हाऊस ऑफ कॉमन्समध्ये संरक्षण खात्याच्या वार्षिक अहवालाचे वाचन होते. त्याच दिवशी फ्रँक बॉईलने एडिंबरो कार्लटन मतदार संघात अँड्र्यूविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडायचे ठरवले. कॉमन्स-मधले काम टाकून अँड्र्यूला निवड समितीच्या सभेसाठी एडिंबरोला येणे शक्य नाही याची बॉईलला खात्री होती.

निवड समितीचा अध्यक्ष हमिश रॅमसे अँड्र्यूच्या बाजूचा होता. त्याने ताबडतोब अँड्र्यूला फोनवर बातमी कळवली. अँड्र्यूने चीफ-व्हिपशी आणि पंतप्रधानांशी चर्चा केली. त्यांनी ताबडतोब त्याला एडिंबरोला जाण्याचा सल्ला दिला.

'अहवालाचे आम्ही पाहून घेऊ' व्हिपने त्याला सांगितले.

गुरुवारी पहाटेचे विमान पकडून अँड्र्यू एडिंबरोला आला. लुईस काळजी करत बसू नये म्हणून त्याने तिला काहीच कल्पना दिली नव्हती. विमानतळावर त्याला घेण्यासाठी रॅमसे आले होते. ते अँड्र्यूला म्हणाले की वीस वर्षांपूर्वी त्यांनी ज्या लेबर पार्टीत प्रवेश केला होता ती पार्टी आता राहिली नव्हती. अति डाव्या विचार-सरणीचे लोक पक्षाचे वाटोळे करतील असे त्यांचे स्पष्ट मत होते. ते अँड्र्यूला म्हणाले की ह्या वेळी निवडसमितीत तो निभावून जाईल पण पुढच्या खेपेस काय होईल याची त्यांना खात्री देता आली नसती.

अँड्र्यू निवड समितीच्या सभेला हजर झालेला पाहून फ्रँक बॉई-लला आश्चर्य वाटले. मतदानाआधी अविश्वासाच्या ठरावावर जी चर्चा झाली त्यात फ्रँक बॉईलने अँड्र्यूवर वारेमाप टीका केली. बॉईल आणि त्याच्या पाठीराख्यांनी अँड्र्यूला निवडणुकीत कधीच मदत केली नव्हती मात्र निवड समितीवर बसून वाक्ताडन करण्यात त्यांचा पुढाकार असे. अॅन्ड्र्यूचे वडील सर डंकन फ्रासर कॉन्झर्व्हे-टिव्ह पार्टीत होते. बॉईलने अॅन्ड्र्यूचा 'सन ऑफ अटोरी' असा उल्लेख केला.

'माझ्या वडिलांनी एकट्याने ह्या शहरासाठी जेवढे कष्ट घेतले आहेत तेवढे तुम्हा पाच लोकांना पुऱ्या आयुष्यात घेता येणार नाहीत.' अॅन्ड्र्यू संतापून म्हणाला.

'मग तु सुद्धा कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीत का जात नाहीस?' बॉईल म्हणाला.

रॅमसेने दोघांनाही शांत करून ठरावावर मतदान घेण्यास सुरुवात केली. निकाल पाच विरुद्ध पाच मतांचा होता. रॅमसेने ताबडतोब त्यांचे कास्टींग व्होट अँड्र्यूच्या बाजूने दिले.

अँड्र्यूला विमानतळावर सोडताना रॅमसेने त्याला सांगितले की ते लवकरच समितीवरून निवृत्त होणार आहेत त्यामुळे ह्या पुढे अँड्र्यूला काळजी बाळगणे आवश्यक होणार आहे.

शुक्रवारी सकाळी अँड्र्यू घरी परतला तेव्हा लुईस दारातच उभी होती.

'कशी काय झाली मिटींग?' तिने विचारले.

'उत्तम', तिला जवळ घेत अँड्र्यू म्हणाला.

'तुला आणखी एक चांगली बातमी ऐकायची आहे?' लुईसने विचारले.

'कोणती?' अँड्र्यूने हसत विचारले.


'काल क्लेअरनी गादी ओली केली नाही. याचा अर्थ पूर्वी घरात तिला संरक्षण मंत्र्यांची भीती वाटत असणार.'

फिओनाला चार्ल्सने घरातून बाहेर काढल्याला आता दीड वर्ष होत आले होते. चार्ल्सला आता एकटे रहायची सवय झाली होती. सकाळचा वेळ तो सेमूर बँकेत असायचा आणि दुपारी तो हाऊस ऑफ कॉमन्समध्ये येत असे. सभागृहातील चर्चा आता बीबीसीवरून प्रसृत व्हायला सुरुवात झाली होती. रोज सकाळी अंथरुणातच चार्ल्स बीबीसीवरचा 'यस्टरडे इन पार्लमेंट' हा कार्यक्रम ऐकत असे त्यामुळे एखादे दिवस सभागृहात जाणे शक्य झाले नाही तरी सर्व घडामोडींवर लक्ष ठेवणे त्याला शक्य होत असे.

फिओनाने त्याला पत्र लिहून कळविले होते की अलेक्झांडर डग्लसची बायको व्हेरोनिकाने अलेक्झांडरला घटस्फोट द्यायचे मान्य केले. फिओनाचे म्हणणे होते की चार्ल्सने तिला दोन वर्षं वाट पाहा-यला न लावता शक्यतो लवकर घटस्फोट द्यावा. चार्ल्सने त्या पत्राचे तुकडे करून कचरा पेटीत टाकले.

चार्ल्स, सायमन, रेमंड आणि अॅन्ड्र्यू यांचे आयुष्य अशा प्रकारे चालले असताना लेबर गव्हर्नमेंटची पाच वर्षांची मुदत संपत आली होती. मागच्या निवडणुका १० ऑक्टोबर १९७४ ला झाल्या होत्या. आता १९७९ साल सुरू झाले होते. गुरुवारी रेमंड कॅबिनेट मीटीं-गला गेला तेव्हा पंतप्रधान कॅलहॅननी मंत्रिमंडळाच्या सदस्यांना सांगितले की, लिबरल पार्टीचा नेता डेव्हीड स्टील ह्याने ह्या पुढे सभागृहात लेबर पार्टीला पाठिंबा देण्यास नकार दिला होता. मार्गा-रेट थॅचरनी अविश्वासाचा ठराव मांडला तर आपली पार्टी तरून जाईल ह्याची कॅलहॅनना खात्री होती; पण तरीही लवकरात लवकर निवडणुका घेणे आपल्याही पक्षाच्या हिताचे ठरेल असे त्यांचे मत पडले. रेमंड मात्र ही बातमी ऐकून अस्वस्थ झाला. नुकताच कोठे कॅबिनेट मिनिस्टर म्हणून त्याचा जम बसायला लागला होता.

सहा एप्रिल १९७९ ला मार्गारेट थॅचरनी कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या वतीने कॅलहॅनच्या लेबर गव्हर्नमेंट विरुद्ध अविश्वासाचा ठराव सभा-गृहात मांडला. त्या दिवशी दोन्ही पक्षांच्या व्हीपना प्रचंड धावपळ



रेमंड–त्याला इतके निराश झालेले केटने कधी पाहिले नव्हते.

◻

करावी लागली. महत्त्वाच्या ठरावासाठी कॉमन्सच्या सभासदांना एकत्र आणणे काही सोपे काम नसते. कुणी सभासद परदेशी गेलेला असतो, कुणाच्या कंपनीच्या संचालक मंडळाची मीटिंग असते. एखादा कोणत्या तरी शिष्टमंडळाचा सदस्य म्हणून गेलेला असतो तर कुणी मतदार संघाच्या कामात गुंतलेला असतो.

विरोधी पक्षाच्या वतीने मार्गारेट थॅचरनी प्रथम भाषण केले. सरकारच्या वतीने समारोपाचे भाषण पंतप्रधान कॅलहॅन यांनी केले. रात्री दहाला ठराव मतदानाला आला. ठरावाच्या बाजूत ३११ मते पडली. विरुद्ध ३१०. कॅलहॅनने ताबडतोब सभागृह बरखास्त झाल्याची घोषणा केली. नंतर राणीबरोबर चर्चा करून पंतप्रधानांनी निवडणुकीची तारीख जाहीर केली–३ मे १९७९.

याच आठवड्याच्या शेवटी मार्गारेट थॅचरच्या शॅडो कॅबिनेट मधले शॅडो मिनिस्टर फॉर नॉर्दन आयर्लंड एरे नेव्ह हे आयरिश रिपब्लिकन आर्मीच्या (आय् आर् ए) दहशतवादी संघटनेकडून ठार मारले गेले हाऊस ऑफ कॉमन्सच्या आवारातून त्यांची गाडी बाहेर पडत असतानाच त्यांच्या कारमध्ये बॉंबचा स्फोट झाला. त्यांना हॉस्पिटलमध्ये नेईपर्यंत वाटेतच त्यांचा मृत्यू झाला.

निवडणुकीची तारीख जाहीर झाल्याबरोबर प्रचारासाठी सभासद आपापल्या मतदार संघात परतले. रेमंड आणि अँड्र्यू मंत्रिमंडळात असल्याने त्यांना इतक्या लवकर परतणे शक्य झाले नाही.

३ मे १९७९ ह्या दिवसाला इंग्लंडच्या संसदीय इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे या दिवशी इंग्लंडला पहिली स्त्री–पंतप्रधान लाभली. मार्गारेट थॅचरच्या नेतृत्वाखाली कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा प्रचंड विजय झाला आणि ४३ सभासदांच्या बहुमताने कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे सरकार स्थापित झाले.

अँड्र्यूच्या राजकीय आयुष्यातली ही सहावी निवडणूक. या खेपेस लुईस आणि क्लेअरला लंडनमध्येच ठेवून तो प्रचारासाठी एडिंबरो कार्लटनला आला. अँड्र्यूचा ३,७३८ मतांनी विजय झाला; पण प्रचाराचा त्याला फार वाईट अनुभव आला. त्याच्या विरुद्ध उभा राहिलेल्या स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टीचा ज्यो मॅक पर्सनने ह्या वेळीही अत्यंत गलिच्छ भाषेत अँड्र्यूविषयी पत्रके काढली, तरीही अँड्र्यूने आपल्या प्रचाराची पातळी सोडली नाही. स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टीचा निवडणुकीत चांगलाच धुव्वा उडाला. त्यांचे फक्त दोनच उमेदवार कॉमन्समध्ये निवडून आले. फ्रॅंक बॉईल आणि त्याच्या पाठीराख्यांनी अँड्र्यूच्या प्रचारात काहीही मदत केली नाही.

अतिडाव्या विचारसरणीच्या लोकांचा रेमंडलाही लीडस् मतदार संघात त्रास जाणवला; पण जॉईसने निकाल जाहीर व्हायच्या आधीच त्याला किती मतांची आघाडी मिळेल ते सांगितले. आपल्यापेक्षा जॉईसला लीडस् मतदार संघाची माहिती अधिक आहे हे रेमंडला मान्यच करावे लागले.

निवडणुकीचा निकाल लागल्यावर दोन दिवसांनी रेमंड लंडनला परतला. त्याला इतके निराश झालेले केटने कधीच पाहिले नव्हते. त्रेचाळीस सभासदांचे बहुमत असल्याने आता मार्गारेट थॅचरना पाच वर्षे पूर्णपणे स्थैर्य लाभेल याची रेमंडला खात्री होती. त्यामुळे कमीत कमी पाच वर्षे तरी विरोधी पक्षात काढावी लागणार होती. लेबर पार्टीच्या मंत्रिमंडळात रेमंडने आतापर्यंत अंडर सेक्रेटरी फॉर डिपार्टमेंट ऑफ एम्प्लॉयमेंट, मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर डिपार्टमेंट ऑफ ट्रेड, आणि सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर ट्रेड म्हणून काम केले होते.

ससेक्स डाऊन मतदार संघात प्रचारासाठी फिरताना चार्ल्सबरोबर ह्या वेळी फिओना नव्हती. त्यांचे लग्न मोडल्याची बातमी हळूहळू मतदारसंघात पसरली होती. चार्ल्स २०,१७६ मतांनी निवडून आला. दोन दिवस तो फोनपाशी बसून होता; पण थॅचरकडून फोन काही आला नाही.

सायमनचे नशीब मात्र जोरावर होते. पकल्ब्रिजच्या मतदारसंघातून कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या तिकीटावर तो १९,४६१ मतांनी विजयी झाला. निकाल जाहीर झाला त्याच दिवशी दुपारी त्याला मार्गारेट थॅचरचा फोन आला. पंतप्रधानांनी फोनवर मंत्रिपद देऊ करण्याऐवजी टेन डाऊनिंग स्ट्रीटवर बोलावून घेतले याचे त्याला आश्चर्य वाटले. असा मान फक्त कॅबिनेट मिनिस्टर्सनाच मिळतो. बाकी सर्व अपॉइंटमेंटस् फोनवरच होतात.

सायमन ताबडतोब पंतप्रधानांच्या भेटीला निघाला. पंतप्रधानांशी अर्धा तास चर्चा करून तो बाहेर पडला. थॅचरनी निवासस्थानी खास बोलावून त्याला मंत्रिमंडळात येण्याची विनंती केली होती. पण त्या म्हणाल्या की, पद स्वीकारण्यापूर्वी त्याने इलिझाबेथशी चर्चा करावी. सायमन इलिझाबेथशी विचारविनिमय करेपर्यंत निर्णय राखून ठेवला जाईल असे त्या म्हणाल्या.

सायमनने परत आल्यावर इलिझाबेथला थॅचरबरोबर झालेले संभाषण सांगितले. इलिझाबेथला धक्काच बसला. सायमनला मार्गारेट थॅचरनी मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर नॉर्दन आयर्लंड हे पद देऊ केले होते. ब्रिटनच्या मंत्रिमंडळात हेच पद सर्वात धोक्याचे मानले

जाते. मागे सांगितल्याप्रमाणे आपल्याकडल्या पंजाबच्या प्रश्नाइतकाच आयर्लंडचा प्रश्न नाजूक बनला आहे. नॉर्दन आयर्लंडचा प्रश्न हाताळणाऱ्या मंत्र्याच्या जीवाला आयरिश रिपब्लिकन आर्मीकडून जास्तीत जास्त धोका असतो. सायमनने हे पद स्वीकारणे म्हणजे पाच वर्षे डोक्यावर सतत टांगती तलवार असल्यासारखे होते; पण सायमनने हे आव्हान स्वीकारावे असे एलिझाबेथचे म्हणणे पडले. पंतप्रधानांनी इलिझाबेथच्याही संमतीचा विचार करावा याचे दोघांनाही विशेष वाटले. सायमनने ताबडतोब पंतप्रधानांना फोन करून आपला होकार कळवला.

सायमनने होकार कळवल्याच्या दुसऱ्याच दिवशी स्पेशल ब्रँचच्या लोकांनी येऊन त्याच्या पकलब्रिजच्या घराची पाहणी केली. त्यांचे मतदार संघातले घर इतर वस्तीपासून दूर असल्याने अधिकच सुरक्षितता बाळगण्याची गरज होती. अधिकाऱ्यांनी सायमनला, इलिझाबेथला आणि पीटर व मायकेल ह्या दोन्ही मुलांना घराभोवती उभारलेली इलेक्ट्रॉनिक यंत्रणा समजावून सांगितली. घरातल्या प्रत्येक खोलीत लाल बटण बसविण्यात आले होते. बटण दाबले की; अर्ध्या मिनिटात पोलीस आतच शिरले असते.

त्यांच्या लंडनमधल्या घरातही अशाच प्रकारची सुरक्षा यंत्रणा उभारण्यात आली होती. पकलब्रिजच्या घराभोवती फ्लड लाईटस् लावण्यात आले होते. घराभोवती पहारा इतका कडक असायचा की, सायमनच्या मतदारसंघाचे अध्यक्ष मिलबर्न त्याला भेटायला आले तेव्हा त्यांचीही खास प्रशिक्षित कुत्र्यांच्या मदतीने तपासणी करण्यात आली.

त्याच दिवशी जेवताना एलिझाबेथने मिलबर्नला सांगितले की, एकदा तर संध्याकाळी खेळताना पीटरचा बॉल लागून खिडकीची काच फुटली, तेव्हा एका क्षणात त्यांचे सारे घर फ्लड लाईटच्या प्रकाशात उजळून निघाले आणि अर्ध्या मिनिटात पोलिसांनी घराला वेढले. 'आम्हाला आता खाजगी असे आयुष्यच राहिले नाही.' ती म्हणाली.

रोज सकाळी सायमन हाऊस ऑफ कॉमन्सकडे निघत असे तेव्हा त्याच्या गाडीच्या पुढे आणि पाठी स्पेशल ब्रँचच्या गाड्या असत. सतत दोन दिवस त्याला कधीच एकाच रस्त्याने नेण्यात येत नसे. सर्वांत त्रासाची गोष्ट म्हणजे, त्याचा दिवसभरचा कार्यक्रम इतका गुप्त ठेवला जाई की इलिझाबेथलाही त्याला केव्हा ब्रेकफास्टला जावे लागेल याची कल्पना नसे. रॉनी नेदरकोरला तर त्याचे दर्शनही दुर्लभ झाले होते.

सायमनला मात्र हे नवे काम मानवले. त्याच्या धाडशी स्वभावाला असेच काम अधिक पसंत पडले असते. त्याने ह्या पूर्वीही आयर्लंडच्या प्रश्नाचा खोलवर अभ्यास केला होता. आता तर त्याला प्रत्यक्ष ह्या क्षेत्रात काम करायची संधी लाभली होती.

दक्षिण आयर्लंडमधले कॅथलिक आणि उत्तर आयर्लंड (आल्स्टर) मधले प्रॉटेस्टंट ह्यांना एकत्र आणण्यासाठी त्याचे प्रयत्न सुरू झाले. आयर्लंडच्या प्रश्नावरून घेतलेल्या सर्वपक्षीय सभा सायमन ज्याप्रकारे हाताळत असे त्याचे विरोधी पक्षातल्या सभासदांनाही कौतुक वाटत असे. सायमन अतिशय चिकाटीने आणि मन लावून काम करायचा त्यामुळे लवकरच मार्गारेट थॅचरनी नॉर्दन आयर्लंडसाठी योग्य मनुष्य निवडला अशी त्याची स्तुती होऊ लागली; पण ह्यामुळे आय्आर्ए-कडून त्याच्या जीवाला असलेला धोका अधिकच वाढला.

. . .

केटची न्यूयॉर्कमधल्या केमिकल बँकेत व्हाईस प्रेसिडेंट म्हणून निवड झाली होती. तिने लंडनमधल्या बँक ऑफ अमेरिकेच्या युरो-बाँड मॅनेजरच्या जागेचा राजिनामा दिला होता. रेमंड निवडणुकीच्या निकालामुळे अगदी निराश झाला होता त्यामुळे तिने ही बातमी त्याला सांगितली नव्हती. बँक ऑफ अमेरिकेतील तीन महिन्यांचा नोटिस–पिरियड संपल्यावर तिने रेमंडकडे विषय काढला.

केट लंडन सोडून जाणार म्हटल्यावर रेमंडला धक्काच बसला. त्यांच्या मैत्रीला आता पाच वर्षे होत आली होती. रेमंडने परत लग्नाची गळ घातली; पण केटच्या मते ते शक्य नव्हते. जॉईसला दूर करणे त्याला वाटले तेवढे सोपे गेले नसते. जॉईस इतके त्याच्या मतदार संघाकडे लक्ष देणे तिला जमलेही नसते. पाच वर्षे आयुष्याबद्दल इतक्या गंभीरपणे तिने विचार केला नव्हता; पण आता अमेरिकेला परत गेल्यावर तिला नव्याने आयुष्याची घडी बसवायची इच्छा होती.

पण रेमंड ऐकायला तयार नव्हता.

'डू यू नो हाऊ मच् आय लव्ह यू ?'

'आय् होप् इनफ् टू लेट् मी गो' केट म्हणाली.

रेमंड आपल्याला जाऊ देणार नाही हे ठाऊक असल्याने केटने सर्व गोष्टी निश्चित झाल्यावर रेमंडला बातमी सांगितली. केमिकल बँकेतली अपॉईंटमेंट तिने स्वीकारली होती. त्यामुळे आता रेमंडला तिला अडवणे शक्य नव्हते.

केट निघण्यापूर्वीचे दोन आठवडे भर्रकन उडून गेले आणि तिच्या जाण्याचा दिवस उजाडला. रेमंड तिला गाडीने विमानतळावर घेऊन गेला. केटने दिलेल्या गुलाबी शर्टाची घडी रेमंडने आजच मोडली होती. केटने सगळे सामान परत एकदा तपासले. एकूण अकरा बॅगज् होत्या.

विमान सुटायला अजून पंधरा मिनिटे अवकाश होता. कामाच्या घाईत त्यांचे बरेच बोलणे राहून गेले होते. केटचे सामान चढवून झाले तेव्हा रेमंड दोघांसाठी कॉफी घेऊन आला. केटच्या डोळ्यात पाणी उभे होते. तिच्या खांद्यावर हात ठेवून रेमंड म्हणाला.

'व्हाईस प्रेसिडेंट्स् ऑफ बँकस् शुडंट क्राय.'

'नायदर शुड कॅबिनेट मिनिस्टर्स' डोळे पुसत केट म्हणाली. दोघेही हसायला लागले.

विमान सुटायची वेळ झाली तशी रेमंडचा निरोप घेऊन केट निघाली. आपण भेट दिलेला शर्ट रेमंडने घातला याचा तिला आनंद झाला. आपण कॉलर खाली ठेवलेली चिठ्ठी त्याने पाहिली की नाही याचे तिला नवल वाटत होते.

विमान दृष्टीआड होईपर्यंत रेमंड उभा राहिला. आतापर्यंत फक्त दोनदाच तो अमेरिकेला गेला होता. आता पुन्हा केव्हा भेट होईल कुणास ठाऊक ? रेमंड मागे वळला तोच त्याच्या शेजारी उभ्या असलेल्या एका कामगार पुढाऱ्याने त्याला हात केला.

'अमेरिकन लेडी' त्याने विचारले.

'येस' रेमंड म्हणाला.

'अ फ्रेंड ऑफ युवर्स ?'

'मात्र बेस्ट फ्रेंड' रेमंड म्हणाला.

## सायमन बाहेर पडतो तोच ....

फिओना गेल्यापासून चार्ल्स कोणत्याही पार्ट्यांना फारसा जात नसे; पण लेडी कॅरिंग्टनशी जुने संबंध असल्याने त्याने जायचे ठरविले. याच पार्टीत अलेक् पिमकीनने चार्ल्सची ओळख आमांदा वॅलेसशी करून दिली. आमांदा जेमतेम २६ वर्षांची आणि चार्ल्स ४८.

आमांदा मॉडेल म्हणून काम करते अशी माहिती पिमकीननेच चार्ल्सला पुरवली; पण त्याची आवश्यकता नव्हती. चार्ल्सने तिचे फोटो बऱ्याच मासिकात पाहिले होते. आमांदाचे डोळे आणि नाक ह्याकडे कुणाचेही लक्ष आकर्षित झाले असते. आता तिला प्रत्यक्षात पाहिल्यावर तिचे सौंदर्य पाहून चार्ल्स थक्कच झाला. आपल्याशी बोलायला पुरुष उत्सुक असतात याची आमांदाला कल्पना होती. तिचे बऱ्याच प्रकरणात नाव घेतले जाते अशी माहिती पिमकीनने पुरवली तेव्हा तर चार्ल्सला तिच्याबद्दल अधिकच आकर्षण वाटू लागले.

आमांदाशी ओळख झाल्यानंतर दहा मिनिटातच चार्ल्सने तिला रात्रीचे जेवण बाहेर घेण्यासाठी निमंत्रण दिले. लंडनमधील उच्चभ्रू लोकांत वावरण्याचा आनंदाचा अनुभव नवा नव्हता. आतापर्यंत किती लोकांशी तिचा संबंध होता याची यादीच पिमकीन्कडे तयार होती. चार्ल्सचे नाव आमांदा ऐकून होती. तिने ताबडतोब चार्ल्सला वॉल्टन हॉटेलमध्ये भेटायचे कबूल केले.

चार्ल्स लवकरच पार्टीतून बाहेर पडला. वॉल्टन हॉटेलमध्ये बराच वेळ बसून त्याने आमांदाची वाट पाहिली. तिने आपल्याला चांगलेच चकवले असे वाटून तो निघणार एवढ्यात 'हॅलो चार्ली' असे म्हणत आमांदा हजर झाली.

जेवताना तिच्याशी काय बोलायचे हा चार्ल्सपुढे प्रश्नच होता. आमांदाला राजकारणात गती नव्हती आणि चार्ल्सला तिच्या पलिकडे दुसऱ्या विषयात गम्य नव्हते.

जेवण झाल्यावर कॉफी आपल्या घरी घ्यावी असे चार्ल्सने सुचवले. आमांदाने तात्काळ होकार दिला. वाटेत गाडीत चार्ल्सच्या खांद्यावर डोके ठेवून आमांदा त्याच्याशी गप्पा मारीत होती. शेवटपर्यंत कॉफीपानाचा कार्यक्रम काही झाला नाही. सकाळी चार्ल्सला जाग आली त्यावेळी इतके महिन्यात पहिल्यांदा त्याने बीबीसी वरचा 'यस्टरडे इन पार्लमेंट' हा कार्यक्रम ऐकला नाही. आमांदाने त्याला तो ऐकूही दिला नसता.

चार्ल्सबरोबर राहायला आमांदाने सुरुवात केली तरी त्याच्याशी लग्न करण्याचा तिचा विचार नव्हता. आयुष्याकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोनच इतका थिल्लर होता की चार्ल्स भेटण्यापूर्वीच्या पाच वर्षांत तीनदा गर्भपाताचा प्रसंग येऊनही स्वतःचा वेगळा संसार उभारावा अशी तिला कधी इच्छा झाली नाही.

मॉडेल म्हणून जगण्यात जे थ्रिल आहे ते लग्न केल्याने नष्ट होईल असे आमांदाला वाटे. चार्ल्सने आता त्याची मुलगी शोभेल अशा वयाच्या आमांदाबरोबर लग्न करायचा विचार केला आहे हे कळल्यावर फिओनाचा त्यावर प्रथम विश्वासच बसला नाही. चार्ल्स मात्र आमांदाच्या प्रेमात इतका अडकला होता की आमांदासारख्या स्त्रीशी आपल्यालाच काय कुणालाही संसार थाटणे शक्य होणार नाही, याचे भान त्याला उरले नाही. फिओनानंतर तिच्यापेक्षाही सुंदर आणि तरुण स्त्री आपल्या आयुष्यात आली याचाच चार्ल्सला अधिक आनंद होता. आमांदाचे वडील ब्रिगेडिअर वॅलेस सहा वर्षांपूर्वीच मरण पावले होते, त्यामुळे तिलाही कोणता धरबंध उरला नव्हता.

ह्या मधल्या काळात सायमनची मार्गारेट थॅचरने मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर नॉर्दन आयर्लंड म्हणून केलेली निवड योग्य ठरली होती. त्याने वर्षभर खपून 'अ जेनुविन् पार्टनरशीप फॉर आयर्लंड' ही आयर्लंडच्या प्रश्नावर श्वेतपत्रिका तयार केली होती.

उत्तर आयर्लंडचा प्रश्न हाऊस ऑफ कॉमन्सपुढे चर्चेला आल्यावर कॉन्झर्व्हेटिव्ह सरकारतर्फेही ही श्वेतपत्रिका सभासदांपुढे मांडण्यात येणार होती.

श्वेतपत्रिकेचे उद्दिष्ट मर्यादित होते. उत्तर आणि दक्षिण आयर्लंडला दहा वर्षांसाठी एकत्र आणल्यानंतर कायम स्वरूपाची योजना आखण्याचा विचार होता. ह्या दहा वर्षांच्या काळात वेस्टमिनिस्टर आणि डब्लिन ह्या दोन्ही ठिकाणाहून आयर्लंडवर नियंत्रण ठेवण्यात येणार होते. सायमनने कित्येक महिने खपून आयर्लंडमधील प्रॉटेस्टंट आणि कॅथॉलिक नेत्यांची ह्या श्वेतपत्रिकेतील तरतुदींसाठी मान्यता मिळवली होती.

हाऊस ऑफ कॉमन्स पुढे ठेवण्यासाठी सायमनने १२९ पानांचा मसुदा तयार केला होता. सभागृहाने सायमनच्या ह्या श्वेतपत्रिकेला मान्यता दिली नसती, तर ह्या साऱ्या लिखाणाला रद्दी पलिकडे किंमत उरली नसती. एलिझाबेथला सायमनने हा मसुदा पन्नासवेळातरी वाचून दाखवला असेल. सायमनने रात्रंदिवस केलेल्या चर्चांचे, परिश्रमाचे एलिझाबेथलाही आश्चर्य वाटले होते. गेली शंभर वर्षे जो प्रश्न सोडवण्यास संसदेतील नेत्यांना अपयश आले होते तो सायमनच्या प्रयत्नांनी जर सुटला असता तर एक नवा इतिहास घडवण्याचे श्रेय त्याला लाभले असते.

हाऊस ऑफ कॉमन्स पुढे नॉर्दन आयर्लंडचा विषय यायला आता केवळ महिनाभराचा अवकाश उरला होता. सभागृहापुढे श्वेतपत्रिका चर्चेसाठी मांडल्यानंतर सरकारतर्फे समारोपाचे भाषण सायमनने करावे असे कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या व्हिपचे म्हणणे होते. श्वेतपत्रिकेला जर सभागृहाने तत्वतः मान्यता दिली तर त्या आधारावर आयर्लंडच्या प्रश्नावर निश्चित स्वरूपाचे विधेयक सभागृहात मांडणे सरकारला शक्य झाले असते. सायमनच्या श्वेतपत्रिकेबद्दल वृत्तपत्रांतूनही अनुकूल असे लेख आले होते.

सायमन नुकताच आयर्लंडच्या नेत्यांशी चर्चा करून घरी परतला. चर्चेच्या अनुषंगाने त्याने पुन्हा एकदा श्वेतपत्रिका वाचून पाहिली आणि नव्याने काही बदल करायचे ठरवले. कामामध्ये तो इतका गुंग झाला की, जेवणाच्या वेळेचेही त्याला भान राहिले नाही.

रात्रीचे आठ वाजत आले होते. एलिझाबेथने त्याला अभ्यासिकेत येऊन सांगितले की, जेवण तयार होते फक्त ब्रेड आणायचा राहिला होता. सायमन फाईल बंद करून उठला आणि म्हणाला, 'गाडी बाहेर च उभी केली आहे. मीच पाच मिनिटात ब्रेड घेऊन येतो.'

एलिझाबेथने पिटरला सांगण्याच्या आतच सायमन बंगल्याच्या बाहेर पडला. गेटबाहेर दोन पोलिस उभे होते. सायमनने बाहेर

जायचे आहे म्हटल्यावर ते म्हणाले की तो ह्या वेळेला बाहेर पडणार आहे याची त्यांना कल्पना देण्यात आली नव्हती. त्यामुळे त्याचा ड्रायव्हर गाडी घेऊन गेला होता. आता सकाळशिवाय तो परतला नसता. सायमनला गाडीशिवाय बाहेर जाऊ देणे सुरक्षिततेच्या दृष्टीने सोईचे नव्हते.

एलिझाबेथची गाडी मेकॅनिकने दोन दिवसापूर्वीच दुरुस्त करून ठेवली होती; पण एलिझाबेथ सायमनबरोबर त्याच्याच गाडीतून बाहेर पडत असे. सायमनने तिची गाडी घेण्याचे ठरवले. बार्कर नावाचा पोलीस शरीररक्षक म्हणून त्याच्याबरोबर निघाला. सायमनने बंगल्यावर परत जाऊन एलिझाबेथच्या गाडीची किल्ली आणली.

बार्कर गेले वर्षभर सायमनच्या बंगल्यावर पहारेकरी म्हणून काम करीत होता. सायमनने लहान-थोर असा भेद कधीच केला नसल्याने बार्करशी गप्पा मारत तो बंगल्याच्या आवारातल्या गॅरेजशी आला. बार्कर त्याच्याकडे पोलिसकँटीनमध्ये मिळणाऱ्या जेवणाबद्दल तक्रार करीत होता. 'तू एकदा हाऊस ऑफ कॉमन्सच्या कॅन्टीनमध्ये जेवून पहा म्हणजे तुला तू किती नशिबवान आहेस याची कल्पना येईल,' सायमन एलिझाबेथच्या गाडीचा दरवाजा उघडत म्हणाला. दोघेही हसले.

पकल्ब्रिजच्या बहुसंख्य रहिवाशांनी तो कानठळ्या बसविणारा आवाज ऐकला. काय घडते आहे हे कळायच्या आतच सायमन खाली कोसळला. बाँब स्फोट झाला आहे हे लक्षात येऊन एलिझाबेथ घरातून धावत बाहेर पडण्याच्या आत त्यांचे घर फ्लड लाईटस्नी झळाळून उठले. एलिझाबेथच्या कारमध्ये बाँबचा स्फोट झाला होता. एलिझाबेथ गॅरेजकडे पोहोचण्या आधीच एका पोलिसाने तिला अडवले.

कारचे तुकडे-तुकडे होऊन रस्त्यापर्यंत उडाले होते. गॅरेजच्या बाहेर धडावेगळे झालेले डोके कोणाचे होते हे दुरून एलिझाबेथला कळले नाही. अर्ध्या मिनिटात बंगल्याला पोलिसांनी वेढले आणि कंपाऊंडमधून ॲम्ब्युलन्स सरळ आत शिरली.

सायमन जबर जखमी झाला होता. बार्कर जागच्याजागी ठार झाला होता. रस्त्यावरून जाणारी एक म्हातारी बाई छातीत गाडीचा पत्रा घुसल्याने रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. तिच्या पिशवीतली भाजी रस्त्यावर पसरली होती. कंपाऊंडबाहेर उभा असलेल्या पहारेकऱ्याच्या डोक्याला जबर जखम झाली होती.

पुढच्या तीन मिनिटात सायमनला ॲम्ब्युलन्समध्ये घालून वेस्टमिनिस्टर हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. गाडी हॉस्पिटलमध्ये पोहोचेपर्यंत वायरलेस मेसेजमुळे इमर्जन्सी ऑपरेशनची तयारी झाली होती. एलिझाबेथही पोलिसांच्या गाडीतून हॉस्पिटलमध्ये गेली.

म्हातारी बाई वाटेतच मरण पावली. सायमनची प्रकृती चिंताजनक होती. त्याच्या तीन बरगड्या, मांडीचे हाड आणि त्रिकास्थीचे हाड मोडले होते, रक्तस्रावही बराच झाला होता. पहिल्या तासाभरात डॉक्टर एलिझाबेथला काहीच सांगायला तयार नव्हते. मग जेव्हा तिने त्यांना सांगितले की तीसुद्धा डॉक्टर आहे तेव्हा त्यांनी तिला सायमनला कोणत्या प्रकारची इजा झाली आहे ते समजावून सांगितले.

'आता काहीही सांगणे कठीण आहे. पुढच्या चार तासांवर त्यांचे



**तो दिवस येवढ्या लवकर येईल याची कल्पना नव्हती—सायमन**

◻

जगणे मरणे अवलंबून आहे' डॉक्टर म्हणाले.

ऑपरेशन थिएटरबाहेर पुढचे चार तास एलिझाबेथने कसे काढले तिचे तिलाच ठाऊक. सायमनने वर्षभर प्रॉटेस्टंट आणि कॅथॉलिकांना एकत्र आणायचे प्रयत्न केले आणि आता आय्‌आर्‌एचे दहशतवादी त्याच्याच जीवावर उठले, एलिझाबेथला वाटले सायमनचा त्यांच्या हिटलिस्टवर फार वरचा नंबर आहे याची त्या दोघांनाही गेले कित्येक महिने जाणीव होती; पण तो दिवस इतक्या अचानक येईल याची तिला कल्पना नव्हती. कारमधील बाँब खरे पहाता तिला मारण्यासाठीच होता हे लक्षात आल्यावर एलिझाबेथच्या अंगावर शहारे आले.

हॉस्पिटलबाहेर गर्दी जमायला लागली. फोटोग्राफर, पत्रकार आत शिरण्याचा प्रयत्न करीत होते; पण डॉक्टर कोणतीच बातमी द्यायला तयार नव्हते. हॉस्पिटलच्या स्टाफने एलिझाबेथला झोपण्यासाठी वेगळी खोली देऊ केली; पण तिला झोपण्याची इच्छा नव्हती.

रात्रीचा एक वाजून गेल्यावर तिला मुलांची आठवण झाली. तिने ताबडतोब घरी फोन केला. बीबीसीवर बातमी ऐकल्यावर तिची आई ताबडतोब त्यांच्या घरी पोहोचली होती. घराभोवती इतका कडेकोट बंदोबस्त ठेवला होता की, एलिझाबेथच्या आईलाही आत शिरताना फार परिश्रम पडले होते. तिने एलिझाबेथला सांगितले की मुले सुरक्षित आहेत. एलिझाबेथला हायसे वाटले. तिच्या दहा वर्षाच्या धाकट्या मुलाने मायकेलने तिला फोनवर 'आम्ही आजीची काळजी घेतो तू चिंता करू नकोस' असे सांगितल्यावर तिला रडू कोसळले. 'थँक्‌ यू डार्लिंग' असे म्हणून तिने चटकन्‌ रिसीव्हर खाली ठेवला.

इमर्जन्सी रूमच्या बाहेर बाकावर बसल्या बसल्या पहाटे चारला एलिझाबेथला झोप लागली ते एकदम सकाळी सातला दचकून जाग आली. तिच्या खांद्यावर हात ठेवून डॉक्टर म्हणाले,

'युवर हजबंड विल लिव्ह, डॉक्टर कस्लेक, बट इटस्‌ अ मिरॅकल.'

एलिझाबेथने मोठ्या धैर्याने स्वतःला आवरून धरले होते. आता

मात्र तिला रडू आवरले नाही. तिला थोपटत डॉक्टर म्हणाले, ' ईश्वराची इच्छा आयर्लंडचा प्रश्न सुटावा अशीच दिसते आहे. '

सायमनचा धोका संपूर्ण टळेपर्यंत दीड दिवस एलिझाबेथ हॉस्पिटलमधून हलली नाही.

सायमनला वेस्टमिनिस्टर हॉस्पिटलमधून बाहेर पडायला तीन आठवडे लागले. मधल्या काळात पंतप्रधानांसहित अनेक महत्त्वाच्या व्यक्ती त्याच्या भेटीला येऊन गेल्या होत्या. एलिझाबेथच्या खांद्यावर हात ठेवून काठी टेकत टेकत तो हॉस्पिटलच्या बाहेर पडला त्यावेळी जवळजवळ दोनशे पत्रकार आणि छायाचित्रकार हे दृश्य टिपण्यासाठी बाहेर त्याची वाट पहात उभे होते. सायमन गाडीत बसताना हॉस्पिटलबाहेर जमलेल्या लोकांनी घोषणांनी त्याचे स्वागत केले. तीन आठवड्यात सायमनची लोकप्रियता अगदी कळसाला जाऊन भिडली होती.

## सायमन–भावना आवरल्या नाहीत

सायमनने तयार केलेल्या श्वेतपत्रिकेची चर्चा अजून सुरू व्हायची होती. त्याच्या खात्याच्या कॅबिनेट सेक्रेटरींनी आणि इतर अधिकाऱ्यांनी त्याच्या घरी येऊन चर्चा करून श्वेतपत्रिकेचे काम पुरे केले. डॉक्टरांनी सायमनला विश्रांती घेण्याचा सल्ला दिला असल्याने चर्चेच्या दिवशी सायमन ऐवजी त्याच खात्याच्या उपमंत्र्याने समारोपाचे भाषण करावे असे ठरले. सायमनने बिछान्यात पडल्यापडल्या अंतिम मसूदा तयार करण्यास मदत केली.

सायमनवरील हल्ल्यामुळे श्वेतपत्रिकेबद्दल लोकांमध्ये इतके कुतूहल जागृत झाले होते की बीबीसीने श्वेतपत्रिकेवरील चर्चा चॅनेल चारवर दुपारी साडेतीनपासून रात्री दहापर्यंत प्रसृत करण्याचे ठरविले.

श्वेतपत्रिका सभागृहापुढे मांडली गेली. त्या दिवशी दुपारी अंथरुणावर पडल्या पडल्या सायमन बीबीसीवर सभागृहातील चर्चा ऐकत होता. सरकारतर्फे चर्चेची सुरुवात नॉर्दन आयर्लंडसाठी असलेल्या कॅबिनेट सेक्रेटरींनी केली. लेबर पार्टीच्या प्रवक्त्याने भाषणात सायमनच्या प्रयत्नांची स्तुती केली पण आयर्लंडमधील स्वातंत्र्य सैनिकांबद्दल सायमनने मसुद्यात जी तरतूद केली होती त्याबद्दल शंका प्रदर्शित केली. साडेदहापर्यंत झालेल्या चर्चेवरून श्वेतपत्रिका एकमताने मान्य होईल ह्या विषयी सायमनला खात्री वाटायला लागली आणि इतके दिवसांनंतर पहिल्यांदा त्याच्या चेहऱ्यावर समाधान पसरले.

पण पुढच्या अर्ध्या तासात स्वातंत्र्य सैनिकांबद्दलच्या तरतुदीबद्दल आणखी चार–पाच सदस्यांनी असमाधान व्यक्त केले होते. सायमनला शंका आली की काही सभासद जाणून बुजून श्वेतपत्रिकेवरील मतदान लांबणीवर टाकण्याच्या प्रयत्नात आहेत.

श्वेतपत्रिकेवरील निर्णय लांबणीवर पडला की थोड्याच काळात प्रश्नाला आणखी फाटे फुटतील त्यामुळे आपले वर्षभराचे प्रयत्न पाण्यात जातील अशी सायमनला भीती वाटू लागली. आज जर श्वेतपत्रिकेवर मतदान झाले नाही तर आयर्लंडचा प्रश्न सोडवण्यात इंग्लंडला कधीच यश लाभणार नाही अशी त्याची भावना होती. त्याच्या खात्याच्या प्रवक्त्यावर त्याचा भरवसा होता; पण सायमन इतके आत्मविश्वासाने ह्या विषयावर कोणी बोलू शकले नसते. स्वातंत्र्य सैनिकांबाबतच्या तरतुदीमागची पूर्वपिठीका आणि आयरिश लोकांची भावना सायमनला ठाऊक होती.

लेबर पार्टीच्या शॅडो मिनिस्टरने सुचविले की सायमन बरा होऊन सभागृहात येईपर्यंत श्वेतपत्रिकेवरील मतदान लांबणीवर टाकावे. सायमन हे ऐकून अस्वस्थ झाला. आज जर ठराव मतदानाला सभागृहापुढे आला नाही तर आपले वर्षभरातील परिश्रम धुळीला मिळतील त्याला वाटले. रात्रीचे पावणे नऊ वाजले होते. सायमनने निश्चय केला.

एलिझाबेथ खालच्या खोलीत त्याचे जेवण आणण्यासाठी गेली होती. सायमन पलंगावरून खाली उतरला. पलंगाच्या कडेला अडकवून ठेवलेली काठी घेऊन तो हलकेच बाहेर पडला. आयर्लंडचे पंतप्रधान डॉक्टर फिट्जिराल्डनी त्याला हॉस्पिटलमधून बाहेर पडल्यावर चालण्यासाठी कोरीव काम केलेली ही काठी भेट दिली होती. सायमन बंगल्याबाहेर पडून रस्त्यावर आला तेव्हा पहारेकऱ्यांना त्याला बाहेर पडलेला पाहून आश्चर्य वाटले. सायमनने तोंडावर बोट ठेवून त्याला गप्प राहायला सांगितले आणि बाहेर उभा असलेल्या पोलीस व्हॅनमध्ये तो चढला. सायमनने गाडी सरळ हाऊस ऑफ कॉमन्सकडे घ्यायला सांगितली. व्हॅनमधल्या रेडिओवर सायमन कॉमन्स मधली चर्चा ऐकायला लागला.

सायमन सभागृहाच्या आवारात पोहोचला तोवर नऊ पंचवीस झाले होते. साडेनऊ वाजता सरकारच्या वतीने समारोपाचे भाषण सुरू झाले असते आणि दहा वाजता श्वेतपत्रिका मतदानासाठी सभागृहापुढे ठेवण्यात येणार होती.

सभापती सायमनच्या खात्यातील उपमंत्र्याला समारोपाचे भाषण करण्याची विनंती करणार एवढ्यात सायमनने सभागृहात प्रवेश केला. सायमनच्या अनपेक्षित हजेरीमुळे सभागृहाचे वातावरण एका क्षणात पालटले. सायमन त्याच्या जागेवर जाऊन बसेपर्यंत दोन्ही पक्षाच्या सभासदांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात त्याचे स्वागत केले.

टाळ्यांचा आवाज शांत झाल्यावर सायमन समारोपाच्या भाषणाला उभा राहिला. आतापर्यंतची भाषणे आपण बीबीसीवर ऐकल्याचे त्याने सांगितले. स्वातंत्र्य सैनिकांसंबंधी श्वेतपत्रिकेत त्याने केलेल्या तरतूदीसंबंधी काही सदस्यांनी शंका उपस्थित केल्याने त्याचे निरसन करण्यासाठी सभागृहात येणे आपणास जरुरीचे वाटल्याचे त्याने सांगितले.

सायमनने त्याच्या अर्ध्या तासाच्या भाषणात उत्तर आणि दक्षिण आयर्लंडमधील नेत्यांशी त्याने वेळोवेळी केलेल्या चर्चेतून स्वातंत्र्य सैनिकांबद्दलची तरतूद कशी मान्य करण्यात आली याचे विवेचन केले.

' आज जर आपण ही संधी हातून गमावली तर दहशतवाद पुढे चालूच राहील आणि एक वेळ अशी येईल की आयर्लंडचा प्रश्न सामोपचाराने सोडवला जावा अशी इच्छा बाळगणारा एकही माणूस जिवंत राहायचा नाही ' तो म्हणाला.

सायमनचे विवेचन अगदी तर्कशुद्ध होते. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये इतक्या शांतपणे फारच कमी भाषणे ऐकली गेली.

भाषणाच्या आखेरीस मात्र सायमनला त्याच्या भावना आवरल्या नाहीत.

' लेट अस् शो द मर्डरर्स दॅट हिअर इन वेस्टमिनिस्टर वुई कॅन

कास्ट अ व्होट् फॉर् द चिल्ड्रन ऑफ टुमारोज् आयर्लंड, लेट् द ट्वेंटी फर्स्ट सेंचुरी बी वन इन विच द आयरिश प्रॉब्लेम इज ओनली अ पार्ट ऑफ हिस्ट्री ' तो म्हणाला.

टाळ्यांच्या गजरात सायमन खाली बसला आणि श्वेतपत्रिका एक मताने पास झाली.

रात्री साडे अकराला सायमन घरी परतला तेव्हा पावलांचा जराही आवाज न करता हलकेच काठी टेकत तो खोलीत शिरला. अंधारात चाचपडत त्याने बटन दाबले. दिव्याच्या प्रकाशात एलिझाबेथ पलंगावर उठून बसलेली त्याने पाहिली.

'जाताना रेडिओ चालू ठेवून गेलास म्हणून नशीब. तू कोठे नाहिसा झालास याची मला चिंता करीत बसायला लागले नाही.

(क्रमशः)

---

# पुस्तके

## पहाडातील पाऊलवाटा माळरानातील फुलबाग

शिक्षण म्हणजे केवळ क्रमिक अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तकांचे पठण आणि दहावीच्या परिक्षेतली टक्केवारी नव्हे. शिक्षणाचे स्वरूप आणि कार्य याहून बरेच व्यापक, समाजजीवनाच्या पुष्कळ अंगाला अर्थपूर्ण ठरू शकते. विशेषतः खेड्या–पाड्यातून, शिक्षणाच्या सुविधांपासून पूर्णपणे दूर असलेल्या आदिवासी भागातून चालणाऱ्या शाळांकडून केवळ पढिक शिक्षण देणे एवढीच अपेक्षा नसते, तर त्यांनी संपूर्ण समाजाचा शैक्षणिक केंद्रबिंदु बनावे आणि आपल्या विद्यार्थ्यांचा तरफेप्रमाणे वापर करून संपूर्ण समाजाला ज्ञान आणि प्रगतीच्या नव्या दिशा दाखवाव्यात हे आवश्यक असते. जव्हारसारख्या आदिवासी वस्तीच्या एका छोट्याशा गावात प्रा. अनत पाटील यांनी एका अशाच शाळेचे मुख्याध्यापक म्हणून काही वर्षे काम केले, तेव्हा त्यांना आलेले अनुभव 'पहाडातील पाऊलवाटा' या लेखसंग्रहात एकत्र केले आहेत.

पुस्तकाचे शीर्षक बोलके आहे आणि सार्थही. जव्हारसारख्या भागातले पहाड दुर्गम निसर्ग, नैसर्गिक आपत्ती आणि दारिद्र्य असे एका बाजूला, तर दुसऱ्या बाजूला डोंगराएवढे अज्ञान, अंधश्रद्धा, शिक्षणाविषयी अनास्था. या पहाडातून राजरस्ता मिळणे कठिणच, मिळणार ती फक्त पायवाट आणि तीही कष्टसाध्य. ही वाट शोधायला कुणी मदत केली आणि ही वाट कशी सापडत गेली याविषयीचे हे अनुभव आहेत. बरीच लक्षणीय प्रगती केली आहे अशा समाधानाची छाप या पुस्तकावर आहे. 'दहा वर्षांचा कालखंड हा तसा संस्थेच्या इतिहासात फारसा मोठा नाही तथापि विकासाचा एक टप्पा व नव्या काळातील आव्हाने स्वीकारण्यासाठी झालेली कटिबद्धता या दृष्टिकोनातून या काळाचे सिंहावलोकन व मिळविलेले स्पृहणीय यश यांची नोंद करावीच लागेल.' (पहाडातील हुंकार)

पाटील लिहितात– 'सन १९७३ पासून मी या संस्थेचे (के. व्ही. हायस्कूल) काम पाहू लागलो. माझा कालखंड हा नवनवीन योजनांचा व उपक्रमांचा होता.' (पार्श्वभूमी). हे उपक्रम कोणते? विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकापलीकडे नेण्याची धडपड आणि आदिवासी भागात अल्पबचतीसारख्या योजना रुजवण्याचे प्रयत्न 'एका संचयिकेची यशस्वी कथा' या निबंधात आहेत. १९७३ सालच्या रु. २५०२ च्या सुरुवातीपासून १९८२ सालच्या रु. ४४,६८७ पर्यंतची प्रगती लक्षणीय म्हणायला हवी.

यापुढच्या प्रकरणात आपली व्याख्याता म्हणून प्रगती कशी झाली हे पाटलांनी लिहिले आहे, तर 'गोंदाघाट स्टेट हायवे' प्रकरणात नाशिक–जव्हार भागातून जाणारा हा हायवे कसा महत्त्वाचा आहे, तो रखडल्यामुळे कशा गैरसोयी होताहेत याचे वर्णन आहे. आणखी प्रकारणात काही गरीब विद्यार्थ्यांना कशी मदत केली याची माहिती आहे. 'शिक्षणाच्या साधनाने आदिवासींचे संपूर्ण जीवन परिवर्तन करा' अशा शीर्षकाच्या निबंधात जव्हारला झालेल्या एका आदिवासी परिसंवादातले काही विचार मांडले आहेत. शाळेत ज्युनियर कॉलेज सुरू होण्याविषयी आणि सूर्यानगर प्रकल्प वसाहतीत हायस्कूल सुरू होण्याविषयी एक एक निबंध आहे. जव्हारचे माजी राजे यशवंतराव मुकणे, नानासाहेब ओक, तात्या शिखरे, चंपूताई म्हापणकर, श्री. रा. टिळेकर, गं. बा. सरदार, बाळासाहेब मुळे, डॉ. सुधीर फडके इत्यादींवर काही टिपणे आहेत. माध्यमिक मुख्याध्यापकांच्या एका शिबिराचा वृत्तान्त 'शैक्षणिक विचारमंथन' अशा शीर्षकाखाली दिला आहे. 'धडपड' अशा शीर्षकाखाली शाळेच्या उपक्रमांची यादी दिली आहे.

आदिवासी भागामध्ये शाळा चालवण्याचा अनुभव साधारण आणि चाकोरीतला नव्हे. अशा भागातल्या शिक्षकाच्या नोकरीचे तास शाळेच्या वेळापुरतेच मर्यादित नसतात. त्याच्यासाठी शिक्षकाचा पेशा म्हणजे केवळ पोटा-पाण्याची सोय नसते, तर तो जीवनाचा मार्ग असतो. तेव्हा पाठ्यपुस्तके शिकवणे, विद्यार्थ्यांच्या आर्थिक चिंता शिरावर घेणे, संचयिका, वैद्यकीय तपासणी इथपासून ते फलोद्यान, गावातला एस. टी. स्टँड साफ ठेवणे, शाळेचा रस्ता ते स्टेट हायवेपर्यंत सर्वांबद्दल आस्था, राजापासून रंकापर्यंत सर्वांशी जवळचे संबंध हे सारे वरकरणी असंबद्ध वाटले, तरी ते शाळा–शिक्षणाच्या एकाच सूत्रात बांधले गेलेले आहेत. या जोडीला राजकीय, सामाजिक, सरकारी पातळीवर येणाऱ्या कडु–गोड अनुभवांनी या साऱ्याला एक मानवी परिमाण–ह्युमन टचही मिळतो. हे सर्व मांडण्यासाठी लेखसंग्रह हा प्रकार समाधानकारक नाही. कारण या वैविध्यपूर्ण जीवनाचा एकजिनसीपणा त्यातून जाणवत नाही. हे लेखही वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या संदर्भात लिहिले गेलेले आहेत, त्यामुळे त्यांच्यात विस्कळितपणा आणि पुनरावृत्ती जाणवते. आपल्या या अनुभवातून कुणाला तरी प्रेरणा मिळावी, नवीन शिकायला मिळावे अशी आशा लेखकाने एके ठिकाणी व्यक्त केली आहे. लेखकाचे अनुभव निश्चितच या तोडीचे आहेत.

या अनुभवांना योग्य तो न्याय मिळावा

आणि ध्येयशून्यतेच्या परिस्थितीत काही मूल्ये ठळकपणे मांडली जावीत, यासाठी खरे तर लेखकाने हे अनुभव अधिक तपशीलवार, जव्हारच्या शिक्षकीय अनुभवास मध्यवर्ती ठेवून आणि आत्मकथनाच्या स्वरूपात, विशेषतः त्यातल्या अपेक्षाभंग, कडवट अनुभवासह मांडायला हवेत, तरच ‘माळरानावरची ही फुलबाग’ कशी फुलली याचे वस्तुनिष्ठ दर्शन घडू शकेल.

—ललिता बर्वे

‘पहाडातील पाऊलवाटा’
ले. प्रा. अनंत पाटील.
गोखले एज्युकेशन सोसायटी प्रकाशन
पृष्ठसंख्या : ८४, मूल्य : रु. २०.

□




शोभा भागवत

# अवघड जागचं दुखणं

**स्त्री**-पुरुष संबंधांबद्दल माझ्याशी एरवी मोकळेपणानी बोलणारी एक मैत्रीण परवा अगदी एक मोठा प्रश्न म्हणून घेऊन आली. सतरा-अठरा वर्षाची तिची मुलगी अभ्यासाच्या पुस्तकात घालून घाणेरडी पुस्तकं वाचते. तिला वाईट संगत लागतेय. तिच्या दोन-चार मैत्रिणी अशा आहेत की, ज्या तिला ही पुस्तकं देतात. त्यांची एकत्र कुजबूज, खिदळणंपण चालू असतं पुस्तकं बघून. आपण गेलं की, त्या मिटवून, लपवून ठेवतात पुस्तकं....

ती सांगत होती. ‘अगदी अवघड जागचं दुखणं झालंय ग! मी काही विचारावं तर मलाच इतकं लाजल्यासारखं होतंय आणि तीपण फार चोरटेपणा करतीय. संगतच तसली लागल्यावर काय करणार! हे म्हणत होते मी तिला दरडावून विचारतो म्हणून; पण मीच म्हटलं नको. तुम्ही काही बोलू नका. सांग आता काय करू!’

मी तिला मजेत म्हटलं, ‘तू शैले सगळ्या गोष्टी माझ्याशी इतक्या मोकळेपणानी बोलतेस आणि मुलीशी बोलायची लाज वाटते काय तुला?’

ती तत्परतेनी आणि जरा रागावून एवढं कसं कळत नाही तुला या स्वरात म्हणाली, ‘तू पण काय बोलतेस! तुझ्याशी एखादी गोष्ट बोलणं वेगळं. तू माझ्या वयाची आहेस. पण त्या १७–१८ वर्षाच्या मुलीशी मी काय बोलू?’

आपल्या ह्या वयाची आठवण तिला करून द्यावी म्हणून मी म्हटलं, ‘आपण कॉलेजमध्ये असताना आठवतं ना तुला त्या दिघेनी तिच्या मामाकडचं एक पुस्तक आणलं होतं? किती चवीनी आपण ते पाहिलं होतं? असंच चोरून?’

‘अग ते एक झालं तरी आपला सगळा ग्रूप चांगला होता. आपल्याला संगत वाईट नव्हती. मला ती काळजी आहे मुख्य.’

घाणेरडी पुस्तकं चोरून वाचतात म्हणून या वयात येणाऱ्या मुलींवर शैला ‘वाईट संगत’ म्हणून शिक्का मारत होती. खरं तर ह्या मुली काय करत होत्या? त्यांना काही एक नवं जग कळायला लागलं होतं ज्याच्याबद्दल त्यांना पुरेसं ज्ञान नव्हतं; पण भरपूर कुतूहल होतं. त्या ज्ञान मिळवायला धडपडत होत्या. ज्ञानाचे मार्ग त्यांना उपलब्ध नव्हते त्यामुळे समोर आलेल्या मार्गावर त्या धडपडत होत्या. तेही मोठ्यांच्या भीतीनं चोरून मारून. तसं पाहिलं तर मनावर केवढा ताण असेल ह्या मुलींच्या असं लपून छपून काही वाचताना, बोलताना!

आपण पालक का आपल्या मुलांची अवस्था अशी करतो? वयात येणाऱ्या मुलांसाठी स्त्री–पुरुष संबंधाबद्दल स्पष्टीकरणं देणारी त्या बाबतीतल्या जबाबदारीची योग्य ती जाणीव करून देणारी चांगली पुस्तकं आपण त्यांना का देऊ नयेत?

आमच्या एका सरांनी मुलं १५–१६ वर्षाची झाल्यावर अशी दोन–चार पुस्तकं आणून घरात पुस्तकांच्या शेल्फात ठेवून दिली होती. मुलांनी ती काही न बोलता वाचली. सरांचं काम झालं.

ह्या सरांना संकोच वाटत होता मुलांशी ह्या विषयाबद्दल बोलायचा.

दुसऱ्या एका ओळखीच्या गृहस्थानी आपल्या मुलाच्या पाठीवर थाप मारून म्हटलं होतं, ‘आता मोठा झालास तू बाबा! चल जरा आपण गप्पा मारू या!’

स्वतः काही समजावून द्यायचा मोकळेपणा सगळ्यांच्यात असेल असं नाही; पण असं बोलू शकणाऱ्या आपल्या मित्रमंडळींपैकी एखाद्याकडे मुलांना पाठवता येईल हा एक मार्ग आहे.

आपल्याला पालकांना तरी ह्या विषयाबद्दल बोलायला इतका संकोच का वाटावा हीही विचार करण्याजोगी गोष्ट आहे. स्त्री-पुरुष संबंध ही गोष्ट आपल्या जीवनात आली तशीच अटळपणे आपल्या मुलांच्या अनुभवात येणार आहे. आपल्या अनुभवातले किंवा ऐकण्यात आलेले घोटाळे मुलांच्या जीवनात येऊ नयेत आपण अज्ञानापायी केलेल्या चुका मुलांनी करू नयेत याची काळजी आपण नाही घ्यायची तर कुणी? पण आपल्या पालकांनी याबाबत मौन पाळलेलं असतं म्हणून आपणही त्याच मार्गावरून जातो.

पाळी येण्यापूर्वी जर आईनी मुलीला समजावून सांगितलं– ‘हे बघ, तू आता १०–११ वर्षाची आहेस. १२–१३ व्या वर्षी, कुणाला लवकर कुणाला उशीरा पाळी यायला लागते. सगळ्या मुलींना आणि बायकांना पाळी येते. तेव्हा काय होतं तर शू आणि शीच्या मध्ये एक जागा असते तिथून रक्त यायला लागतं. त्यात घाबरण्यासारखं काही नसतं. असे असे कपडे घेतले की झालं तर असं जेव्हा होईल तेव्हा घाबरू नको आणि मला सांग’ तर हा अनुभव किती सोपा होईल!

घरात सॅनिटरी नॅपकिन्स बघून मुलं विचारतातच ‘ह्या छोट्या छोट्या उशा कशाला आणल्यात?’ तेव्हा ही संधी साधून त्यांना त्या वयाला समजेल असं उत्तर देता येतं.

माझ्या मैत्रिणीची मुलगी १७, १८ वर्षाची असून तिला असं वाटत होतं की

तिच्याशी काय बोलायचं ? पण तिला जेवढी गरज आहे तेवढं तिच्याशी बोलायला हवंच.

उघडं नागडं म्हटलं की अगदी ४, ५ वर्षांच्या मुलांनाही केवढं कुतुहल असतं चित्र पाहण्याचं ! ते पाहून शी ! म्हणणं, लाजणं हसणं मित्रांना ते चित्र दाखवणं चालू असतं. अशा प्रसंगी पालक ह्या प्रकाराकडे कसे पाहतात यातून मुलं शिकत असतात.

मायकेल एंजेलोच्या शिल्पांचे सुरेख फोटो असलेलं एक पुस्तक घरात आहे ते एकदा मी मुलीला दाखवत होते. तिचं वय ८–९ वर्षांचं. डेव्हिड नावाच्या एका तरुण, सुंदर, नग्न पुरुषाच्या शिल्पाचा एक फोटो होता. ह्या डेव्हिडचा चेहरा, केस, नाक, डोळे, हनुवटी, पिळदार, बाहू, छाती, पोट, पाय इतकंच नव्हे तर त्याचं इंद्रिय त्या भोवतालचे कुरळे केस हेही या शिल्पात इतकं रेखीव काढलेलं आहे. त्याच्या उभं राहण्यातली ऐट, मार्दव, त्याचं देखणेपण त्याच्या स्नायूंवरच्या रेषा...सारं बघत रहावं इतकं छान आहे. मी मुलीला म्हटलं मला हा पुतळा फार आवडतो. ती म्हणाली– 'शी ऽऽ घाणेरडी !'

नागडेपणाचा इतका बाऊ मुलांच्या मनात आपण निर्माण करून ठेवतो की त्यापायी जे पहायला हवं त्याच्याकडे त्यांचं लक्षच जात नाही. मी तिला या पुतळ्यातलं मला काय आवडतं ते सांगितलं. संगमरवरातून ते कोरून काढणं ही केवढी मोठी कला आहे ते सांगितलं. मायकेल एंजेलोबद्दल सांगितलं. ह्या निमित्तानं मला वाटतं तिला एक छोटासा धडा मिळाला तो तिचा दृष्टिकोन तयार करायला उपयोगी पडावा.

नग्नतेचा हा जो बाऊ मुलांच्या मनात असतो तो आपल्या मनातल्या त्याच्या स्थानाचं प्रतिबिंबच असतं. स्त्री–पुरुष संबंधाबद्दल मुळात आपल्याच मनात फार गंड, लाज, अज्ञान असतं त्यामुळे आपल्याला त्याबद्दल नितळपणे बोलता येत नाही. अजंठा वेरूळ, खजुराहोसारख्या आपल्या प्राचीन शिल्पांमधून समाजमनातलं हे अज्ञान, लाज, गंड काढून टाकण्याची दृष्टी असेल का ?

शैलाचं हे अवघड जागचं दुखणं मुलीच्या १८ व्या वर्षी निर्माण झालेलं नाही. ते वर्षानुवर्षांचं जुनं आहे आणि खरं तर ते ह्या मुलीचं दुखणं नाहीच आहे. ते शैलाचं तिच्या नवऱ्याचं आणि तुम्हा आम्हा सगळ्या पालकांचं न् आपल्या पालकांचंही...आहे.

उपाय अनेक आहेत. मुलगी जे ज्ञान मिळवू पाहते आहे ते तिला उपलब्ध करून देणं चांगल्या पुस्तकांमधून. त्याचा ती लगेच उपयोग करील का काय ! अशी धास्ती न बाळगता स्त्री पुरुष संबंधातली जबाबदारी, धोके, संबंधित स्त्री–पुरुषांचं भावविश्व याचं महत्त्व तिला समजवायला हवं. या संबंधांचे मनावर होणारे खोलवरचे परिणाम तिला सांगायला हवेत. त्यामुळे हा खेळ नव्हे कुणीही जोडीदार घेतला की खेळला असं चालत नाही. हे तिला पटवायला हवं आणि या संबंधातली बाईची भूमिकाही तिला सांगायला हवी. कुणी तरी म्हटलं म्हणून बळी गेली, फसली असं होऊ नये. 'नाही म्हणू शकत नाही म्हणून हो झालं.' असं होऊ नये याचीही कल्पना तिला द्यायला हवी. शेवटी ही एक सुंदर गोष्ट आहे आणि ती पुरेसं सावध नाही राहिलं तर खूप कुरूप होऊ शकते हेही म्हणायला हवंच.

आपण आपल्या मनाशी तयारी करायला हवी की, आपली मुलं वयात येताना आपण त्यांना काय–कसं सांगणार आहोत ? □

चित्रपट

## त्याग, ममता, अब्रू, वात्सल्य–वगैरेंचा 'भावना'

स्त्रीचा त्याग, स्त्रीची ममता, स्त्रीची अब्रू, स्त्रीचं वात्सल्य, स्त्रीचा सोशिकपणा वगैरे विषय म्हणजे बॉक्स ऑफिसवरचे हुकमी एक्के. हे विषय आपापल्या परीनं उलटसुलट फिरवले, त्याग, ममता, वात्सल्य आदींचं महत्त्व पटवलं की झाला तयार स्त्रीची महती गाणारा एक छानसा, गुळगुळीत चित्रपट. अगदीच कुणी नाही तरी स्त्रीप्रेक्षकवर्गाची तरी या चित्रपटाला उणीव भासत नाही. साहजिकच फायदा झाला नाही तरी तोटा होण्याचा धोका कमीच. 'भावना' या चित्रपटाच्या निमित्तानं दिग्दर्शनाच्या क्षेत्रात प्रवेश करताना प्रवीण भट्ट यांनी हाच विचार डोळ्यासमोर ठेवला असावा आणि मुलांसाठी धडपडणाऱ्या एका मातेची कहाणी चित्रपटासाठी निवडली असावी.

प्रवीण भट्ट हे या चित्रपटद्वारा दिग्दर्शनाच्या क्षेत्रात नव्यानं प्रवेश करत असले तरी चित्रपट व्यवसायाशी मात्र बऱ्याच काळापासून संबंधित आहेत. छायाचित्रकार म्हणून 'विश्वासघात', 'लहूके दो रंग', 'हीरा और पथ्थर' असे अनेक चित्रपट त्यांच्या खात्यावर जमा असले तरी प्रवीण भट्ट यांच्या वाटयाला भरभरून कौतुक आलं ते 'उमराव जान' या चित्रपटापासून आणि तियून मग 'मासूम', 'अर्थ', 'कानून क्या करेगा', 'रावण' अशी यशस्वी वाटचाल सुरू झाली; पण फक्त एवढयावरच प्रवीण भट्ट समाधानी नव्हते. दिग्दर्शनाची हौस त्यांना गप्प बसू देत नव्हती. या हौसेला खतपाणी मिळालं ते 'उमराव जान' च्या वेळेस. कारण मुझफ्फर अलींनी शॉट डिव्हिजनची जबाबदारी प्रवीण भट्ट याच्यावर सोपवली. मुझफ्फर अलींच्या तालमीत तयार झालेल्या प्रवीण भट्ट यांनी ही जबाबदारी तितक्याच सहजतेनं उचलली. त्यामुळं दिग्दर्शनाबद्दल थोडा आत्मविश्वासही वाटायला लागला. आपल्या चित्रपटासाठी विषयाच्या शोधात असताना बी. बी. सी. वरून प्रसारीत झालेल्या एका वेश्येच्या मुलाखतीची हकिकत मित्राकडून त्यांना ऐकायला मिळाली. तेव्हाच त्यांनी आगामी चित्रपटासाठी हा विषय निश्चित केला; पण निर्मात्यानं दिग्दर्शक म्हणून त्यांना स्वीकारायला पाहिजे, ही शंका देवी दत्त ('मासूम' फेमस्) यांनी आपोआपच दूर सारली.

भावना सक्सेना (शबाना आझमी) ही एक अनाथ मुलगी. चित्रकार अजयशी (मार्क झुबेर) तिची योगायोगाने गाठ पडते. अजय बडे बापका गरीब बेटा. (म्हणजे महिन्याच्या खर्चासाठी फक्त दोन हजार रुपये वडलांकडून मागवणारा) तेव्हा अजय-भावनाच्या लग्नाला मान्यता नसणार हे उघड. म्हणून अजय–भावना लग्न करतात

आणि मग घरी कळवतात; पण बेटेसे बाप सवाई. तो मुलाला पैसे पाठवायचंच बंद करतो. भावना किंवा अजयला नोकरी नाही, अजयला चित्र काढण्याशिवाय दुसरं काही येत नाही, त्यावर भागत नाही, तशात बाळाची चाहूल–हे पाहून अजय वडलांकडे नाक घासत जातो, तो परततच नाही. वेड्यासारखी वाट पाहून कंटाळलेली भावना सासरी जाते, तेव्हा तिला कळतं अजयचं दुसरं लग्न झालंय. भावना अपमानानं एकटीच परतते. भावनाची नर्स मैत्रिण शोभा (रोहिणी हट्टंगडी) तिला आसरा देते. पुढं भावनाला मुलगा होतो; पण एक दिवस शोभावर अत्याचार करू पाहणाऱ्या माणसाचा भावनाच्या हातून खून होतो आणि भावना मुलाला शोभाजवळ सोपवून तुरुंगात जाते. ती तुरुंगातून सुटून येते आणि मुलाला भेटायला त्याच्या शाळेत जाते; पण तिच्या भूतकालाचा मुलाच्या मनावर परिणाम होईल म्हणून शाळेचे फादर तिला मना करतात. तेव्हा मुलाला ती सांगते की, त्याची आई गेली आणि ती त्याची 'आंटी' आहे. याच नात्यानं पुढंही ती मुलाला भेटत राहते. स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी भावना नोकरी धरते; पण तिथं बॉसच तिच्याशी लगट करू पाहतो. त्या कंपनीचा मालक रामकिशन (सईद जाफरी) तिची सुटका करतो आपल्या तीन मुलांची गव्हर्नेस म्हणून घरी घेऊन जातो. रामकिशनच्या सर्वात छोट्या मुलात भावना स्वतःच्या मुलाला शोधण्याचा प्रयत्न करते आणि केव्हाच या तीन मुलांशी–पर्यायानं साऱ्या कुटुंबाशी एकरूप होते; पण इथं पुन्हा एकदा तिला पुरुषी वृत्तीचा अनुभव येतो. बायको–मुलं घरात नाहीत, हे पाहून रामकिशनची पापवासना जागृत होते. रामकिशनचं कृत्य सगळ्या जगाला ओरडून सांगून त्याच्यावर सूड उगवण्याच्या प्रयत्नात भावना स्वतःच बदनाम होते. खुनाचा आळ असलेल्या, तुरुंगात जाऊन आलेल्या, अब्रू घालवलेल्या भावनाला नोकरीची दारं बंद झालेली असतात. तेव्हा कॉलगर्ल होण्याखेरीज तिला गत्यंतरच नसतं. भावना हा व्यवसाय स्वीकारते आणि तन-मन जाळून मुलाच्या भविष्यासाठी पैसा उभा करते. त्याच वेळेस मुलगा आणि पत्नी अपघातात गमावून बसलेला अजय पुन्हा भावनाच्या आयुष्यात येतो. कारण अजयच्या वडलांनी सर्व संपत्ती नातवाच्या नावे आणि नातू गेल्यास धर्मादाय दिलेली असते. तेव्हा भावनाच्या मुलाकरवी संपत्ती मिळवायची या हेतूनं अजय भावनाकडे येतो. भावना ते नाकारते. ती बधत नाही, हे पाहून अजय भावनाचे पैसे (जवळ जवळ पन्नास हजाराहून अधिक रक्कम जी तिनं बँकेत वगैरे न ठेवता घरातच एका बॅगेमध्ये ठेवलेली असते पळवून नेण्याच्या प्रयत्नात असतानाच संतापानं भावना त्याचा खून करते. पुन्हा तुरुंगवास–जन्मठेप; पण चांगल्या वर्तणुकीमुळे सुटका. ती मुलाकडे येते. मुलाचा संसार, दवाखाना पाहून सुखावते; पण तरीही मुलाला खरी ओळख द्यायचं नाकारते; पण आयुष्यभर तिचं ऐकत आलेली शोभा या वेळेस मात्र ऐकत नाही. अनूला (कँवलजीत) ती भावनाची खरी ओळख करून देते. मुलाचा आनंदी चेहरा पाहातच मुलाच्या कुशीत भावना प्राण सोडते.

## शबानासाठीच भावना

अलीकडे चित्रपटाचा शेवट दुःखद करण्याचा नवीन पायंडा आहे. (गल्याच आठवड्यात प्रदर्शित झालेला 'रावण' याला अपवाद नाही.) एकेकाळी चित्रपटभर चांगल्या वाईट घटनांचे काहीही घोळ झाले तरी शेवट मात्र सुखदच असावा लागे. चित्रपटाचा शेवट दुःखद म्हणजे तो चित्रपट पडणार असंच गृहीत धरलं जात असे आणि त्यामुळं फारसं कोणी त्या वाटेला जायला धजावत नसे. एवढंच कशाला, या प्रचलित समजामुळे 'मुगले आझम'मधील सलीम–अनारकलीच्या प्रेमकहाणीचा दुःखांत असूनही सुखांतात बदल करण्यात आला होता. भूतकाळातील ही परिस्थिती लक्षात घेऊनच बऱ्याच जणांनी प्रवीण भट्ट यांना दोन शेवट तयार ठेवण्याची सूचना दिली होती. म्हणजे दुःखद शेवट खपला नाही तर सुखद शेवट जोडायचा; पण प्रवीण भट्ट सुरुवातीपासूनच दुःखद शेवटाच्या विचाराशी पक्के होते. कारण ते म्हणतात. 'दुःखद शेवट हा केवळ ओढूनताणून आणलेला नाही. तर ती कथेची गरज आहे. भावना जिवंत राहली तर मुलाला तिच्या भूतकाळाबाबत उत्सुकता निर्माण झाली असती आणि त्यासाठी नवीन स्पष्टीकरण देण्याची वेळ आली असती. तिच्या मृत्यूनं आपोआपच तिच्या भूतकाळावर पडदा पडतो.

विचारातील हा बारकावा संपूर्ण चित्रपटभर राखला गेला असता तर 'भावना' अधिक आटोपशीर होण्याला मदत झाली असती. कथेत वर्णन केल्याप्रमाणे अनेक घटना एकमेकात न घुसडता घटनांचं प्रमाण कमी करण्याची आवश्यकता होती. प्रवीण भट्ट यांच्या मूळ कथाकल्पनेप्रमाणे एका वेश्येनं आपल्या मुलाला शिकून सवरून मोठा करण्यासाठी केलेली धडपड आहे; पण 'भावना'चा बराचसा वेळ भावना वेश्या (कॉल गर्ल) का झाली हे विशद करण्यातच जातो.

मूळ कथाकल्पना तशी जुनी-जुन्या काळात शोभून दिसावी अशी; पण जुन्या चित्रपटांमध्ये जसा मेलोड्रामा ठासून भरलेला असे, तसा 'भावना'त नाही. रडवणारे प्रसंग आहेत पण अतिरेक नाही. प्रवीण भट्ट यांच्या दिग्दर्शनावर महेश भट्ट, शेखर कपूर यांच्या दिग्दर्शनाची झाक आहे यात नवल काहीच नाही; पण तरीही 'भावना'त त्यांच्यातील दिग्दर्शकापेक्षा कॅमेरामन अधिक भाव खाऊन जातो. 'भावना'तील दिग्दर्शक म्हणून त्यांची कामगिरी तितकीशी समाधानकारक नसली तरी भट्ट–कपूर यांच्या चौकटीच्या बाहेर येऊन काही करण्याचा प्रयत्न करणं–त्यांना फारसं अवघड जाऊ नये.

या प्रकारच्या चित्रपटांसाठी हल्ली प्रामुख्यानं नावं डोळ्यासमोर येतात ती शबाना आझमी, स्मिता पाटील यांची; पण प्रवीण भट्ट यांना मात्र फक्त शबानाच हवी होती. सुरुवातीला ही भूमिका करायला तयार नसणाऱ्या शबानानं नन्नाचा हेका कायम ठेवला असता तर कदाचित 'भावना' पडद्यावर आलाच नसता. कारण 'शबाना नाही, तर भावना नाही' हे प्रवीण भट्ट यांनी मनाशी निश्चित केलं होतं; पण शबानानं नंतर मान्य केलं आणि नेहमीच्या सफाईनं पारही पाडलं. अजय आणि अनूच्या (मुलगा) भूमिकेसाठी पहिल्यांदा कुलभूषण खरबंदा व राजकिरण यांची निवड केली होती; पण 'अर्थ'मधील नकारात्मक भूमिका (निगेटिव्ह रोल) करून पस्तावलेल्या कुलभूषण खरबंदाला पुन्हा त्या वाटेनं जायचं नव्हतं

तर अनिलच्या भूमिकेला काहीच महत्त्व नसल्यानं राजकिरणनं टाळलं. त्यामुळं नंतर या भूमिका मार्क सुबेर आणि कंवलजीतकडे आल्या. योगायोगानंच हे घडलं; पण चेहरेपट्टीतील साम्यामुळं हे दोघं बाप लेक म्हणून शोभतात खरे. मार्क सुबेर 'ये नजदिकीयाँ'त अपेक्षा पूर्ण करून जातो पण 'भावना'त नाही. याचे अद्याप दोनच चित्रपट आल्यानं त्याचा पिंड नक्की कोणत्या भूमिकेचा आहे हे आताच ठरवणं अवघड आहे; पण भावना बघून तरी वाटतं की निदान नकारात्मक भूमिकांचा तरी पिंड नाही. छोट्या अनिलचं काम मकरंद शुक्ला हा गुजराती चित्रपटसृष्टीतला बालकलाकार नीटसपणे करून जातो. मैत्रिण झालेली रोहिणी हट्टंगडीही उत्तम. सगळ्यात या दोघींचं (शबाना, रोहिणी) म्हातारं होणं बघण्याजोगं. सईद जाफरी ओव्हरॲक्टींग का करतो कळत नाही.

गाणी लक्षात न राहण्याजोगी.

—शुभदा रानडे

# रंगभूमी

## थिएटर अकॅडमी निर्मित अरुण साधूंचे

# 'पडघम'

वि. भा. देशपांडे

आजची युवा पिढी किंवा तरुणांची पिढी. या पिढीचे असंख्य प्रश्न जीवनाची गुंतागुंत वाढवीत आहेत. शिक्षणपद्धतीतील अनिश्चितता, पदवीचे पोकळपण, त्यातून येणारी बेकारी, नोकरी आणि पदवी यांच्या परस्परसंबंधातून येणारे निराश जीवन. केवळ शिक्षणक्षेत्रात नव्हे तर सामाजिक-राजकीय जीवनातील भ्रष्टाचाराची कीड, पुढारीपणातील विशविशीतपण अशा अनेक प्रश्नांच्या गुंत्याने युवापिढी अस्वस्थ. या अवस्थेतून नकाराची संघर्षाची भाषा सुरू होते. प्रस्थापितांविरुद्ध ही बंडखोरी आव्हानात्मकरूपाने सिद्ध होते. या साऱ्या प्रश्नांना घेऊन येणारे 'पडघम' केवळ अराजकाचे नाहीत, केवळ विध्वंसाचे, विद्रोहाचे नाहीत तर साऱ्यांना अंतर्मुख करून विचार करायला लावणारे आहेत.

युवकांचा, तरुणांचा विषय तसा मराठी रंगभूमीला नवा नाही. प्रायोगिक रंगमंचावर तो एकांकिका, दीर्घांकाच्यारूपाने आलेला आहे. आजच्या सामाजिक, राजकीय जीवनातील दांभिकताही उपरोधाने वेळोवेळी प्रकट होत आलेली आहे. तरीही ती पुरेशी व्यक्त झाली आहे असे वाटत नाही. अरुण साधू ती आपल्या विचारमंथनातून, अनुभवातून मांडू इच्छितात. त्यात विशिष्ट व्यक्ती, संस्था, पक्ष यांचा कैवार किंवा विरोध अशी त्यांची भूमिका नाही, तर आजच्या वास्तवाचे, भेदक वास्तवातले विदारक सत्य मांडण्याचा ते प्रयत्न करीत आहेत.

प्रवीण नेर्लेकर हा राज्यशास्त्राचा एक हुशार विद्यार्थी. पी. एच. डी. करण्याच्या विचारात; पण परिस्थितीने त्याच्याकडे विद्यार्थी चळवळीचे नेतृत्व येते. अनपेक्षितपणाने आलेले हे नेतृत्व एकेक पाऊल पु जात राहते. इतके की, ज्या 'व्यवस्था विरोधात ही सारी मंडळी संघर्षपवित्र्यात उभी आहेत त्या व्यवस्थेचा प्रवीण एक भाग बनतो. अशा वेळी अनुयायांना चक्रावल्या सारखे होणे साहजिकच असते. विरोधातल माणूस सत्तेवर आला, मंत्रीपदी आरूढ झाल की, चित्र बदलेल असे वाटत राहते. सत्तेच्य किंवा व्यवस्थेच्या माणसाने संघर्षवाद्यांन विचारलेले प्रश्न निरुत्तर करणारे असतात त्यातला प्रश्न प्रा. हर्षे विचारतात की, ज्यांनी ३५–४० वर्षे सत्ता काबीज केली त्यांना ह्य प्रश्नांमधले काहीच कळत नाही का? त्यांन तुम्ही इतके नगण्य कसे समजता वगैरे; पण साधूंनी त्या अंगाने न जाता विद्यार्थी–तरुण नेतृत्व आणि त्या दिशेने जाणारे प्रश्नच केन्द्रीभूत केलेले आहेत. अर्थात व्यवस्थेमधल्या पोलीस, न्यायदान, राजकारणी ह्यांच्या पोकळपणाचे यथातथ्य दर्शन घडवण्याचा यत्न केला आहे. या बरोबरीनेच काही मुद्यांचे ओझरते दर्शन किंवा स्पर्श मूळ विषयांना, व्यक्तिरेखांच्या विकासाला पूरक म्हणून करण्यात आलेला आहे. उदाहरणार्थ दोन पिढ्यांमधील विचारांचे दृष्टिकोनांचे अंतर, आमच्यावेळी असे नव्हते. या चालीवरचे विविध धर्मगुरू समाजाला कसे वेढून आहेत, विविध पक्ष, निवडणुका आणि त्यातील भ्रष्टाचार इत्यादी. शिवाय प्रवीणचे खाजगी प्रेमसंबंध आणि प्रा. हर्षे यांच्या कौटुंबिक जीवनातील काही क्षणचित्रे आहेत. प्रवीणचे अंजू आणि सुनीता यांचे प्रेमसंबंध आहेत. अंजू आपल्या डॅडींच्या श्रीमंती मोठेपणासह प्रवीणवर प्रेम करते आहे. तिच्या पदरी पुढे निराशा. त्यातून आत्महत्या. तर सुनीता प्रवीणच्या विचाराला, व्यक्तिमत्वाला कळून घेऊन प्रेम करण्याचा यत्न करते आहे.

असे बरेच काही सांगणारे 'पडघम' रूढार्थाने नाटक म्हणता येणार नाही. ही दृश्यसंबंधाची मालिका आहे. अनेक दृश्यबंधातून ते विषय आपल्यापुढे उलगडत जातात. अरुण साधूंनी याचे रूढ पद्धतीने नाटक केले नाही हे एका अर्थी बरेच केले. कारण अशी नाटके खटकेबाज संवादात आणि भावड्या, स्वप्नील प्रसंगांत अडकून पडतात. मूळ विषयापासून दूर जातात. तसे इथे काही ठिकाणी वेगळ्या अर्थाने घडले

आहे. काही दृश्यबंधांची मूळची आवश्यकता, काहींचा विस्तार, त्यातले नाट्य किती आणि कसे असावे याचा अंदाज प्रत्येक वेळी नेमका आला असे नाही. असे होण्याचे कारण बहुधा असेल, ते म्हणजे साधू मुख्यत: पत्रकारितेच्या व्यवसायातले. नंतर ललित लेखक' म्हणून मान्यता पावलेले. त्यांचा नाट्यलेखनाचा हा पहिलाच अनुभव. पत्रकारितेत त्यांनी अनेक प्रसंग पाहिलेले, ऐकलेले, त्यातले काही अनुभवलेले आहेतच. त्या प्रसंगांना रंगमूल्य येण्यासाठी दर्शनी असणारी मिती सोडून आणखी दृश्य परिणामाची जी दुसरी मिती असते त्याचा नेमका अंदाज नाही. त्यामुळे कोर्टाचा प्रवेश, नंदीबैलाचा प्रवेश, ऑपरेशन चीफ मिनिस्टर आदी तुकड्यांचे प्रयोजन आणि परिणाम यांचा तोल राखू शकले नाहीत. संहितेचा आणि प्रयोगाचा परिणामी विस्तार जाणवण्या इतका दीर्घ झाला. संहितेचे संपादन किंवा आटोपशीरपण ही जशी लेखकाची जबाबदारी असते तशीच आणि तितकीच ती दिग्दर्शकाचीही असते. प्रयोगासाठी जी रंगावृत्ती तयार होते त्यावेळी काळजी घेणे महत्त्वाचे. (पहिल्या प्रयोगानंतर लेखक, दिग्दर्शक यांच्याशी जी काही बातचीत झाली त्यात संपादनाचा मुद्दा मान्य झाल्याने त्यावर अधिक लिहिण्याचे कारण नाही.)

## नवा आकृतीबंध

अशी संहिता दिग्दर्शकाला आवाहन आणि आव्हान असते. जब्बार पटेल अशी आव्हाने स्वीकारण्यात आणि यशस्वी करून दाखवण्यात तरबेज आहेत. कोणतीही संहिता प्रयोगाच्या रूपाची, पद्धतीची ' मागणी ' करीत असते. या संहितेच्या विषय–आशयाची मागणी ही समूहनाट्याची अपरिहार्यतेने होती. ती तशीच व्यक्त झाली. तीस-पस्तीस मुले–मुली घेऊन हा प्रयोग पेश झाला. या प्रयोगाचा प्रथम दर्शनी जाणवलेला विशेष म्हणजे नवकलाकारांमुळे एक ताजेपणा, टवटवीतपणा होता. अर्थात केवळ याचमुळे तो होता असे नव्हे तर जब्बारने या प्रयोगाचा एकूणच आकृतीबंध जो तयार केला होता तो रंगमूल्यांना गृहीत धरून केलेला होता. कलाकलांच्या शारीर हालचाली, त्यांच्या विविध विरचना, संगीत आणि नृत्य यांच्या तालांचा वापर आणि एकूणच प्रयोगाची लय ध्यानी घेऊन मांडणी केलेली होती. यासाठी रंगमंचाला छेद देणाऱ्या दोन लाकडी लेव्हल (स्तर) आणि तिसरी जमीन यांच्या वापरातून संपूर्ण रंगमंचावर हालचाली, विरचना दृश्यरूप केलेल्या होत्या. आवश्यक त्या ठिकाणी स्थिरचित्रणाचा (स्लाइडचा) वापर अतिशय प्रभावी होता. रंगमंचावर स्लाईड वापरणे यात गैर काहीच नाही. उलट रंगमंचाच्या चौकटीत जी दर्शने येणे शक्य नसते अशा दृश्यांचा अंतर्भाव करता येतो. एका अर्थाने रंगमंचाचा तो माध्यम विस्तारच असतो. प्रवीण नेर्लेकराच्या संदर्भातला स्लाईडचा वापर विशेष परिणामकारक वाटला. सर्वच दृश्यांची गुणवत्ता सारखी नसते, नसणारच. त्यामुळे व्यक्तिपरत्वे जी आवडनिवड असेल तसे त्या दृश्यांच्या आकृतीबंधांचे स्वागत होणार. तसे याही प्रयोगात झालेच. कोणतीही कलाकृती निर्दोष असणे असंभवनीय असते. या प्रयोगात घडले असे की, पहिला तीस–पस्तीस मिनिटांचा काळ समूहाच्या प्रश्नांची आवर्तने किंवा नृत्यसंगीताची काही झलक दाखवण्यात गेला. जब्बारसारख्या अनुभवी दिग्दर्शकाला असा वेळ घालवण्याची काहीच आवश्यकता नव्हती. आलेल्या प्रेक्षकाला ' दिपवून ' टाकणे किंवा ' चिमित्कार ' करवून दाखवणे यात गुंतून पडायचे कारण नाही. तो भाग आणखी कमी होता तर प्रयोगाची बंदिस्तता वाढती राहिली असती. अर्थात हा दोष दुरुस्तीतला आहे ! कारण संहितेचे आकलन किंवा संकल्पनेच्या संदर्भातला हा घोटाळा नाही !

गेल्या बारा वर्षांत जब्बारने तीन समूहनाट्यं दिग्दर्शित केली. अर्थात प्रत्येक नाटकाचा बाज आणि ऐवज वेगळा होता. पहिल्या नाटकांचा दिग्दर्शन प्रभाव प्रत्यक्ष अप्रत्यक्ष तिसऱ्या नाटकावर येण्याची शक्यता असते. तसे या प्रयोगात काही ठिकाणी झालेले आहे. विशेषत: 'तीन पैशाचा तमाशा' तील मुक्तगानाचा प्रभाव आणि पद्धती काही प्रसंगात दिसते. उदाहरणार्थ कमिशनर भावे यांच्या तोंडी असलेले गाणे, समूहाने म्हटलेले ' प्रवीण आला रे ' इत्यादी.

या प्रयोगाच्या यशात जब्बारच्या बरोबरीने संगीतकार आनंद मोडक याचाही वाटा मोठा आहे. त्याने आजवर दिलेल्या अनेक लहान मोठ्या रचना मी ऐकल्या पाहिल्या आहेत. त्यामध्ये ' पडघम ' हा त्याच्या बाबतीतला एक महत्त्वाचा टप्पा आहे. हे नाटक तसे ' म्युझिकल ' सदरात मोडणारे. पण परंपरागत अर्थाने संगीत नाटक नसलेले ! हे भान ठेवून मोडकने गाण्यांच्या चाली आणि दृश्यांमधल्या अनेक जागा अर्थपूर्ण रीतीने भरीव केल्या आहेत. अनेक वाद्यांचा सुमेळ साधून संपूर्ण प्रयोगाची गती निश्चित केली आहे. प्रयोग चालू असताना आपण त्या संगीताबरोबर राहतो. संपूर्ण संगीत ध्वनिमुद्रित आहे. ध्वनिमुद्रणाची गुणवत्ता उत्तम आहे, पण काही वेळा समूगानातील काही शब्द स्पष्ट ऐकू येत नाहीत. त्याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. संगीताच्या जोडीला समर नखाते आणि सहकाऱ्यांनी केलेली प्रकाशयोजना, माधुरी पुरंदरेने केलेला वेशभूषेच्या रंगसंगतीचा विचार प्रयोग परिणामाला पूरक ठरणारा होता. मात्र प्रकाशयोजनेच्या संदर्भात अतिशय कच्चा असणारा भाग म्हणजे प्रेक्षागृहातून प्रवीण किंवा अन्य कोणी आलेल्या कलाकारावर प्रकाशझोत टाकण्याची समयसूचकता नेमकी नव्हती. कलाकाराच्या हालचालीनुसार प्रकाशयोजना ' चलत ' ठेवणे हा प्रामुख्याने बंगाली रंगभूमीचा खास विशेष आहे. त्यातली गतिमानता आणि अचूकता स्मरणीय अशी असते. या प्रयोगात तशी अपेक्षित होती ! हा प्रयोग पाहताना एकूणच बंगाली रंगभूमीवरचे काही प्रयोग स्मरत होते. काही वर्षांपूर्वी उत्पल दत्तने पेश केलेला ' दु:स्वप्न नगरी ' (ज्यावर १९७४ मध्ये बंदी आली होती ) आणि बादल सरकारांचा ' जुलूस ' इत्यादी नाट्यप्रयोग ' पडघम ' च्या धर्तीचेच आहेत. कलकत्त्यात अनेक ठिकाणी समूहाचे प्रश्न मांडण्यासाठी असाच मुक्त दृश्यबंधांचाच वापर होत असतो !

हे समूहनाट्य असले, यात समूहगान मोठ्या प्रमाणात असले तरी या समूहातले काही कलाकार आपापल्या गुणवैशिष्ट्याने ध्यानात राहणारे आहेत. जसे थिएटर ॲकॅडमीच्या जुन्या मंडळींपैकी श्रीराम रानडे, उमेश देशपांडे, चंद्रकांत काळे, कल्पना देवळणकर, श्रीराम पेंडसे, रमेश मेढेकर, श्रीकांत गद्रे, सुरेश नसाळे, उदय लागू आदी मंडळी होती; तसेच नव्या दमाचे आणि ज्यांच्या–

कडून अधिक अपेक्षा ठेवाव्यात असेही कलाकार होते. त्यामध्ये सर्वात महत्त्वाचा म्हणजे प्रसाद पुरंदरे. प्रवीणसाठी याची निवड यथायोग्य होती. मात्र त्याचे मुद्राभाव अधिक परिणामकारक हवेत. त्याच्या साथीला असणाऱ्यांमध्ये अतुल टेंबे, सुरेखा दिवेकर, ललितागौरी गोखले, राहूल सोलापूरकर, अतुल पेठे, गौरी पाळदे, राहूल रानडे, राहूल घोरपडे, नरेंद्र कुलकर्णी, अनुपमा ढमढेरे, श्रुती घडफळे अशी कितीतरी नावे सांगता येतील.

असे हे आजच्या पिढीच्या प्रश्नांचे, संघर्षाचे नारे घेऊन आलेले 'पडघम' त्यातल्या अनेक प्रश्नांनी आपल्याला अंतर्मुख करायला लावणारे आहे. आजचे विषय घेऊन अरुण साधूंसारखा एक चिंतनशील लेखक आपल्याला काही देऊ पाहतो आहे. जब्बार सारखा अनुभवी दिग्दर्शक प्रयोगरूपाने ते साकार करतो आहे. रंगभूमीच्या दृष्टीने ही अतिशय महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. केवळ रंजनाच्या स्तरावर नव्हे तर स्वत:च स्वत:ला शोधण्याच्या संदर्भात ! □

# नाट्यपंढरी



## □ स्वप्न नटसम्राटाचे

'मला कधी गाणं ऐकावंसं वाटलं तर मी बालगंधर्वांच्या नाटकाला जातो.'

—अल्लादिया खासाहेब

'बालगंधर्वांच्या कीर्तिचंद्राला उदय, मध्य आणि अस्त या अवस्थाच माहित नाहीत.'

— गोविंदराव टेंबे

'विधात्याने बालगंधर्वांना जणू काय नाट्य—संगीत—काव्य—चित्र आणि शिल्प या ललितकलांची एकरस मूस ओतून तिलोत्तमेप्रमाणे इर्षेने निर्माण केले. बालगंधर्व हा केवळ एक नट केवळ एक गायक किंवा केवळ एक सौंदर्याचा आदर्श नसून, नाट्य, संगीत, काव्य, चित्र आणि शिल्प या ललित कलांचे निधान आहे... गंधर्व नाटक मंडळीची रंगभूमी म्हणजे जणू काय गंधर्वलोक! अलका आणि अमरावती यांचे सारे वैभव त्या रंगभूमीवर एकवटलेले... बालगंधर्व म्हणजे त्या रंगभूमीची जणू उर्वशी !'

—ग. त्र्यं. माडखोलकर

बालगंधर्वांना ऐन उमेदित आपल्या साऱ्या कलावैभवानिशी पाहिलेल्या मान्यवरांचे हे काही सहजोद्गार ! शेकडो रसिकांच्या मनी मुखी, हे असेच कौतुकाचे बोल घोळत होते. आजही बालगंधर्व हे नाव जुन्या पिढीच्या कानावर पडताच, ती मंडळी क्षणात तरुण होऊन, साक्षात जणू नारायणरावांचे सौभद्र, मानापमान, स्वयंवर, एकच प्याला पहात आहोत, अशा आनंदात त्यांच्या अनेक आठवणी, तरुण पिढीला मोठ्या उत्साहाने ऐकवित असतात; पण आजच्या तरुणांच्या लेखी ते एक स्वप्न ठरले आहे. सुलेमानचा खजिना नाहीतर गुलबकावलीचे फूल झाले आहे.

नाही हो, अगदी काल परवापर्यंत, ते स्वप्न नव्हते. सत्य होते. तीन पिढ्यानी डोळे भरून पाहिलेले ते एक निखळ सत्य होते. नारायणराव बालगंधर्व हे रसिकांचे दैवत २५ ऑक्टोबर १९०५ गुरुद्वादशीच्या सुमुहूर्ती रंगभूमीवर अवतीर्ण झाले नि मराठी मनाला 'आनंदाचे डोही आनंद तरंग' अशा सुखसागरात तब्बल पन्नास वर्षे न्हाऊमाखू घालून ५ जून १९५५ पहाटे—वटपौर्णिमेला, गडकऱ्यांच्या दैवतास्वरुप सिंधूची वेषभूषा उतरून अंतर्धान पावले. उरले ते कलेची कवचकुंडले उतरलेले गलितगात्र नारायणराव राजहंस ! पण तरीही मोत्याचा चारा खाणारा राजहंसच ! तुम्हाला आश्चर्य वाटेल त्याही विकलांग अवस्थेत, ते स्वप्न पहात होते, भव्यतेची, दिव्यतेची, ताजमहालची आणि कैलासलेण्याची.

पुण्यात विष्णू रामचंद्र तथा बापूसाहेब परांजपे यांच्याकडे त्यांचा महिनोगणती मुक्काम असे. बालगंधर्व हे बापूसाहेबांचे दैवत. नारायणराव आले की कोर्टकचेरीला सुट्टी. गाणं बजावण नि नारायणरावांची सेवा हे एकच काम. नारायणरावांना भेटायला येणाऱ्या मंडळींची उठबस करण्यात दिवस कसा जात असे हेच समजत नसे. पाच पन्नास कप तरी रोज नुसता चहा होत असे. दूध—कॉफी निराळी. नारायणराव अगदी खुशीत असत. बापूसाहेबांच्या घरची सगळीच माणसं एखाद्या राजासारखी बडदास्त ठेवीत. पाणी प्यायला चांदीचे तांब्याभांडे, मागतील तेव्हा केशराचं दूध. तुमचा विश्वास बसणार नाही, पण नारायणरावांना बेडपॅन दिलं, तर बापूसाहेब त्यात आधी युडिकोलन टाकीत असत.


बालगंधर्व एक दिवस (१९ जानेवारी १९६१) असेच दोन लोडांच्यामध्ये तक्याला टेकून (टेकवून म्हणा हवं तर) डोळे मिटून बसले होते. जणू आपल्या गतवैभवाच्या जीवन—नाट्याच्या पडद्याच्या दोऱ्या ओढीत, आपलीच शालूशेल्यातली स्वरूपगर्वा भामिनी रुक्मिणी, सिंधू पहात होते. तंद्रीतून जागे होताच म्हणाले, 'मायबापा, हसू नका; पण माझ्या मनात अजून एक कंपनी काढण्याची इच्छा आहे. कंपनीचं नाव ठेवायचं 'जयहिंद नाटक मंडळी.' पण ही कंपनी सरकारी बरं का ? त्यासाठी मी आमच्या बापूसाहेबांना घेऊन नेहरू, राधाकृष्णन यांना भेटणार आहे. ती फार चांगली माणसं आहेत. 'नाही' नाही म्हणायची. चौपाटीवर खूप मोठं थिएटर बांधायचं. पाच हजार सीट्स तरी हव्याच. मराठी—उर्दू—हिंदी सर्व भाषेत नाटकं करायची. पहिला खेळ मात्र आपल्या अण्णासाहेबांच्या सौभद्राचा हं ! कंपनीची माणसं थिएटरवरच रहायची. तालमीचा खूप मोठा हॉल हवा. साऱ्या तालमी हव्या. बायकांची कामं आता बायकाच करणार. त्यांना रहायला स्वतंत्र खोल्या हव्या. त्यांच्या गाण्याची तालीम आपल्या चंपूताई (हिराबाई बडोदेकर) घेणार. थिएटरमध्ये हत्यारे निराळी. तालमीला निराळी. तुम्हाला माहीत नाही, ऑर्गनची ने—आण करण्यात फार खराबी होते. देवा या खेळांना खूप गर्दी होणार. परदेशचे राजे, पुढारी अशी बडी-

या संघर्षातील माझे सर्वोच्च ध्येय ना गुलामी प्रथेला अभय देणे आहे ना तिचे उच्चाटन करणे आहे. ते आहे देशाची अखंडता अबाधित ठेवणे. जर एकाही गुलामाला मुक्त न करता मी देशाची अखंडता राखू शकलो तर ते मी करेन. जर काही गुलामांची मुक्तता केल्याने आणि काहींना तसेच ठेवून देश अखंड ठेवता आला, तर ते मी करेन. मी गुलामी प्रथेबाबत वा काळ्या वंशाच्या लोकांबाबत जे करतो ते देशाची अखंडता कायम रहावी यासाठीच करतो आणि त्याला विरोध करतो तो यासाठी की त्यामुळे देश अखंड रहायला साहाय्य होणार असते – **लिंकन**

**देशाचे विच्छेदन हेच पाप मानणाऱ्या**
**सर्वात महान राजकीय नेत्याची**
**संपूर्ण ओळख करून देणारा ग्रंथ.**

अब्राहम लिंकन

# फाळणी टाळणारा महापुरुष



वि.ग.कानिटकर

**फाळणी एकदा झाली**
**पुन: होणार नाही ह्याची शाश्वती वाटावी**
**अशी परिस्थिती नाही.**
**प्रत्येकाने अभ्यासायला हवी अशी**
**लिंकनची राजकीय कहाणी.**

**भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली**
**पहिली डिलक्स आवृत्ती.**
**मोठा क्राऊन आकार**
**पृष्ठे : सुमारे ४००**

आमची पंधरावी कला

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव पेठ, पुणे. ४११ ०३०

बडी मंडळी पंडितजींच्या बरोबर नाटक पहायला येणार. ड्रेपरी, सीनसिनेरी अशी करू की, भाषा नाही समजली, तरी त्यांना गाण्याभिनयातून नाटक समजेल. देवा, अशी बडी मंडळी आली की, पोलीस लोकांना खूप त्रास होतो. त्यांच्या बायका-मुलांना खेळाचे पास द्यायचे वरं का ?'

थिएटर कुणी बांधायचे, तालमी कुणी घ्यायच्या, चाली कुणी लावायच्या, एक ना दोन, प्रत्येक गोष्ट ते मनापासून सांगत होते. एका नटसम्राटाचं, कल्पना-कुबेराचं ते पहाटस्वप्न होतं. कुणी सांगावं कदाचित होईलही खरे !

**काय योग पहा !**

नारायणराव पुण्यातच १९६७ च्या जुलैत गेले.त्यांच्या अस्थी बापूसाहेबांनी जपून ठेवल्या होत्या. ते स्वतः अलाहाबादला जाऊन त्याचे विसर्जन करणार होते; पण त्यांच्या कामाचा व्याप नि तब्येत यातून ते अखेरपर्यंत घडले नाही. १९८१ च्या ऑगस्टमध्ये बापूसाहेब वारले. नारायणरावांच्या अस्थी एका चांदीच्या डब्यात ठेवून, वर भगवद्गीता ठेवलेली असे. लोक म्हणत, 'अस्थी घरात ठेवणं अशुभ आहे. नारायणराव भूत होऊन तुमच्या मागे लागतील.' त्यावर बापूसाहेब सांगत, 'निदान मला तरी या अस्थींसारखे दुसरे काहीच शुभ नाही. नारायणराव भूत झालेच तर आधी करीत होतो तसेच त्यांचे सारे काही करीन.'


शेवटी बापूसाहेबांचे सुपुत्र डॉक्टर बाळ (रामचंद्र विष्णू परांजपे) नि डॉ. प्रकाश यांनी अलाहाबादला जाऊन आपल्या वडिलांच्या अस्थींबरोबरच नारायणरावांच्या अस्थींचेही त्रिवेणी संगमात विधीपूर्वक विसर्जन केले. मला वाटतं, त्यावेळी बालगंधर्वांच्या अस्थीतूनही आवाज उमटला असेल, 'देवा, कसे चालले आहेत आपले खेळ ?'



विज्ञान

## माणूस अधिक बुद्धिमान होत आहे ?

दोनचार ठळक वैशिष्टयांमुळे माणूस इतर प्राण्यांहून वेगळा झाला आहे. उभे शरीर, त्यामुळे कामांसाठी मोकळे झालेले हात (पुढचे पाय), पकड घेता येईल अशी बोटे व अंगठा, सरळ पुढे पहाणारे डोळे आणि अपवादात्मक वाढलेला मेंदू ही त्यातील काही ठळक वैशिष्टये. पैकी 'मेंदू' हेच सर्वात ठळक व महत्त्वाचे मानले पाहिजे. शरीराच्या एकूण वजनाशी मेंदूच्या वजनाचे प्रमाण पाहिले तर मानवात ते सर्वात जास्त असते. म्हणजेच सर्व प्राण्यांत माणसाचा मेंदू सर्वात मोठा / खरे म्हणजे 'अधिक' असतो.



प्राणी जे अन्न खातात त्याचा बहुतेक भाग जगण्यासाठी आवश्यक ती ऊर्जा निर्माण करण्यात खर्च होतो. अधिक कष्ट करणाऱ्याला अधिक ऊर्जा, अर्थात अधिक अन्न लागते असे असले तरी प्रत्यक्ष कष्ट करणाऱ्या हातापायांपेक्षा, जलद श्वास घेणाऱ्या फुफ्फुसांपेक्षा शरीरभर रक्त पुरवणाऱ्या हृदयापेक्षा जास्त ऊर्जा एका जागी स्थिर राहून सर्व क्रियांचे नियमन करणाऱ्या मेंदूलाच लागत असते ! धावण्याच्या शर्यतीच्या वेळी सबंध शरीराचा इन्फ्रा-रेड किरणांनी फोटो काढून हे सिद्ध झालेले आहे की, प्रत्यक्ष शर्यतीत धावतानासुद्धा मेंदूलाच जास्त ऊर्जेचा पुरवठा होत असतो.

माणसाच्या उत्क्रांतीच्या इतिहासात मेंदूच्या उत्क्रांतीला अर्थातच अनन्यसाधारण महत्त्व आहे. अगदी पहिला मानवसदृश प्राणी ऑस्ट्रेलोपिथेकसचा मेंदू खूपच लहान होता. लक्षावधी वर्षांच्या कालखंडात त्याचा विकास होत गेला. त्याचे आकारमान व अर्थात वजन वाढत गेले; पण मेंदूची ही उत्क्रांती, ही वाढ थांबलेली नाही. अजूनही मानवी मेंदू वाढतोच आहे. दोन ब्रिटिश शरीररचना शास्त्रज्ञांच्या मताने मानवी मेंदूचे वजन पिढीपिढीने वाढते आहे. त्यांच्या संशोधनाप्रमाणे, '१८६० ते १९४० या ८० वर्षांत पुरुषाच्या मेंदूचे सरासरी वजन १३७२ ग्रॅमपासून १४२४ ग्रॅमपर्यंत वाढले आहे. तर त्याच काळात स्त्रियांच्या मेंदूचे सरासरी वजन १२४२ ग्रॅमपासून १२६५ ग्रॅमपर्यंत वाढले आहे.'

त्यामुळे आपली मुले आपल्यापेक्षा बुद्धिमान होत आहेत यात काहीच संशय नाही !

## 'अप्सरा' ते 'आदित्य'

निसर्गात ऊर्जा अनेक स्वरूपात दिसते. प्रकाश, उष्णता, वीज इ. ही सर्व ऊर्जेचीच निरनिराळी रूपे आहेत. १९०५ मध्ये प्रसिद्ध केलेल्या एका निबंधात आइन्स्टाइनने असे सिद्ध केले की, वस्तुमान हेही एक ऊर्जेचेच स्वरूप आहे. तसेच वस्तुमानाचे रूपांतर ऊर्जेत केल्यास $E=mc^2$ या समीकरणाप्रमाणे किती ऊर्जा निर्माण होईल हेही आइन्स्टाइनने सांगितले होते. हीच अणू-ऊर्जा. पुढील चाळीस वर्षे अणुऊर्जा प्रत्यक्ष मिळविण्यासाठी प्रयत्न केले गेले. हिरोशिमा व नागासाकी येथे टाकलेले बॉम्ब म्हणजे अणुऊर्जेचा विध्वंसक आविष्कार होता. तेव्हापासून आजपर्यंत मानवाने अधिकाधिक विध्वंसक अण्वस्त्रे तयार केली.

परंतु अणुऊर्जेचा विधायक उपयोगही करण्याचे तंत्र माणसाने हस्तगत केले. आज जगभर हजारो अणुभट्ट्या वीजनिर्मिती वा इतर विधायक कामे करीत आहेत. भारतातही कित्येक अणुभट्ट्या आज वीजनिर्मितीचे काम करीत आहेत. विख्यात शास्त्रज्ञ भाभा यांनी भारतातील पहिली अणुभट्टी 'अप्सरा' तयार केली असे म्हटले पाहिजे.


अणुविस्फोटामध्ये एका अणूचे विघटन होऊन दोन वेगळ्या मूलद्रव्यांचे अणू तयार होतात; पण असे होत असताना काही वस्तुमान समूळ नाहीसे होते व त्याचे रूपांतर ऊर्जेमध्ये होते अगदी थोड्या वस्तुमानापासून प्रचंड ऊर्जा निर्माण होते. या प्रक्रियेला 'विघटन' (Fission) क्रिया म्हणतात.

सूर्य व इतर तारे प्रति सेकंदाला प्रचंड ऊर्जा उत्सर्जित करीत असतात. लक्षावधी वर्षे सतत बाहेर पडणारी ही ऊर्जा सूर्यात कशी निर्माण होते हे माणसाला अनादि काळापासून पडलेले एक कोडे होते. अणुऊर्जेचा शोध लागल्यावर हे कोडे सुटले. सूर्यावर सतत अणुस्फोट होत असावेत असा शास्त्रांनी तर्क केला; परंतु त्यानेही सूर्याच्या प्रचंड ऊर्जेचा हिशेब लागेना. पुढे हैड्रोजन बॉम्बचा शोध लागला. हैड्रोजन बाँबमध्येही अणुऊर्जा बाहेर पडते; पण ती अणूंच्या विघटनातून निघत नाही तर अणूंच्या संयोगक्रियेतून बाहेर पडते. या प्रक्रियेला अणूंचे 'संघटन' (Fusion) म्हणतात. ही ऊर्जा वरील 'विघटन' प्रक्रियेने मिळणाऱ्या ऊर्जेपेक्षा खूपच जास्त असते. सूर्य आणि विश्वातील असंख्य ताऱ्यांची ऊर्जा तेथे सतत चालणाऱ्या अणूंच्या संघटनातूनच निर्माण होते अशी आता शास्त्रज्ञांची खात्री पटली आहे. याच प्रक्रियेने पृथ्वीवर ऊर्जा निर्माण करता येणार नाही का ?

इतर प्रगत राष्ट्रांप्रमाणे भारतानेही या दिशेने प्रयत्नांना सुरुवात केली आहे. 'अप्सरा' चे शिल्पकार डॉ. भाभा होते. तसे संघटनभट्टीचा विचार प्रथम डॉ. विक्रम साराभाईंच्या मनात आला होता. त्यांनी अनेक तरुण शास्त्रज्ञांना एकत्र करून एका संस्थेची जुळवाजुळव करायला सुरुवात केली होती. सूर्यावर पदार्थ घन, द्रव किंवा वायूरूपात नसतात तेथील पदार्थाच्या अवस्थेला 'प्लाझ्मा' म्हणतात. डॉ. साराभाईंच्या अभ्यासगटाचे नाव 'प्लाझ्मा फिजिक्स प्रोग्रॅम' (P P P) असे होते; परंतु ही जमवाजमव झाली आणि डॉ. साराभाई मृत्यू पावले. हा सर्व कार्यक्रमच त्यानंतर मागे पडला.

१९८० नंतर या कार्यक्रमाला पुन्हा चालना मिळाली असून अहमदाबादच्या 'फिजिकल रिसर्च लॅबोरॅटरी' तच PPP चे काम सुरू झाले आहे. डॉ. काव, स्वदेश महाजन, ए. सेन यांसारखे तरुण शास्त्रज्ञ एकत्र आलेले आहेत. हे सर्वजण अमेरिकेत अत्यंत महत्त्वाचे संशोधन करीत होते. यांच्याप्रमाणेच आणखीही वैज्ञानिक यायला तयार झाले आहेत. येत्या तीन वर्षांत हे शास्त्रज्ञ भारताची आपली अणु–संघटन भट्टी तयार करतील. सूर्याच्या अंतर्भागात चालू असणाऱ्या काही प्रक्रिया या भट्टीत होणार असल्याने तिचे नाव ठेवले आहे 'आदित्य.' त्याचे कार्य सुरू करणे ही भारताची अणुयुगातील फार मोठी झेप ठरणार आहे.

—भा. रा. बापट





**मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई या संस्थेने यंदा आयोजित केलेल्या सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक स्पर्धेत माणूस दिवाळी अंकाला उत्कृष्ट अंक पारितोषिक मिळालं आहे.**

**गेल्याही वर्षीच्या माणूस दिवाळी अंकाला या संस्थेचे उत्कृष्ट अंक पारितोषिक मिळाले होते.**

## ह्या ना त्या निमित्ताने : पृष्ठ २ वरून

पण हा अमेरिकी मामा नुसता कालगतच नव्हे तर कालगतीचे यंत्रच बक्षिस देऊन गेला होता.

आता राधा दररोज सकाळी सगळ्यांना त्यांची प्रकृती कशी आहे विचारायची, मग त्यांचा उपवास आहे का ? त्यांना बाहेर पार्टी वगैरे आहे का ही चौकशी करायची व ती माहिती कॉम्प्युटरमध्ये भरून ते देईल त्या उत्तराप्रमाणे स्वैपाक करावयाची. भात, पोळ्या, वरण वगैरे.

श्यामचा कोणी सहकारी बदलून वरच्या जागी गेला होता तेव्हा आज कचेरीत श्यामला पार्टी होती. त्यामुळे राधाने त्याच्या हिशोबाची फक्त एकच पोळी केली होती. ताटात फक्त एकच पोळी पाहून श्याम तडकला.

'इतका साधा अंदाज तुम्हाला करता येत नाही ?' आता आम्ही पार्टीत काय पोटभर जेवतो की काय ?'

'आता अंदाजाचे दिवस गेले.' शांत राधा.

'पण झाल्या दोन–चार पोळ्या जास्त तर काय बिघडते ?' तडकलेला श्याम.

'मग त्या निःसत्व पोळ्या कोण खाणार? आता आपण एकविसाव्या शतकात प्रवेश... राधा.

'बरं मला शहाणपण शिकवू नकोस...' अर्थातच परत तडकलेला श्याम.

'तुम्हाला कचेरीत पार्टी होती तेव्हा कॉम्प्युटरने एकच पोळी...' वगैरे पुटपुटत राधा निघून गेली.

श्यामच्या कचेरीत पार्टी होती हे खरं होतं. श्याम त्याला गेला होता हे ही खरे होते. तेथे चिवडा, केकस्, बर्फी, सामोसा पदार्थ होते हेही खरे होते; पण त्यातले श्यामला काही खायला मिळाले नव्हते हेही खरे होते.

त्याचे काय झाले होते की पार्टीच्या वेळी सगळ्यात मोठा साहेब श्यामशी बोलत उभा राहिला होता. त्यामुळे श्यामला काही खाता आले नव्हते. श्यामचे इतर सहकारी त्याला 'टुकटुक माकड...' करत सगळ्या वस्तूंवर ताव मारत होते.

कारण असले मोठे साहेब असल्या पार्ट्यातून काही खात वगैरे नाहीत फार फार तर एक कप चहा पितात. त्यामुळे श्यामची फक्त चहाच्या एका कपावर बोळवण झाली. त्यानंतर ती कंटाळवाणी भाषणे. ह्या सगळ्यामुळे भुकेला व कातावलेला श्याम पानातली एकूलती एक पोळी पाहून तडकला तर नवल नव्हते; पण कॉम्प्यूटर पुढे त्याचा इलाज चालला नाही.

'नशिब देते न् दैव नेते म्हणतात ते असे! श्याम एकूलती एक पोळी कुरतडत म्हणाला. 'घरात कणिक आहे, पोळ्या करायला बायको आहे पण ह्या × × × कॉम्प्यूटरमुळे उपाशी रहावे लागते आहे.' श्यामने फुल्यांच्या जागी शिव्या मोजल्या होत्या. प्रत्येकाने आपल्या श्रद्धेप्रमाणे शिव्या मोजाव्यात.

राधालाही एक दिवस असे फुल्यामय वाक्य म्हणण्याची वेळ आली. त्या दिवशी महिला समाजाची बैठक होती व त्यात पोहे व चहा होणार होता. तेव्हा कॉम्प्यूटरने तिच्या करता फक्त अर्धी पोळी करावी असे सुचवले होते.

पण पोह्यांत मीठ जास्त झाल्यामुळे ते अंमळ खारटच झाले होते. त्यामुळे राधाचा फक्त चहाच झाला होता. श्याम राधावर राग काढू शकत होता; पण ते स्वातंत्र्य राधाला नव्हते. एकविसाव्या शतकात जायचे म्हणजे थोडे उपास–तापास सहन करायला लागणारच होते; पण आता आपण एकविसाव्या शतकापर्यंत जिवंत रहातो की नाही त्याबद्दलच श्यामच्या मनात संदेह निर्माण झाला व तो जाता येता उघडपणे कॉम्प्यूटरला नावे ठेवू लागला व राधा मनातल्या मनात; पण भावाने दिलेल्या व तोही अमेरिकन भावाने दिलेल्या कॉम्प्यूटरची कास सोडून कसे चालले असते ?

पण निवडणुकांचे निकाल लागू लागले आणि कॉंग्रेस अर्थातच आय वरची व कॉम्प्यूटरवरची टीका कमी होऊ लागली. पुढे पुढे त्या भावनेचे मोठ्या कौतुकरसात रूपांतर होऊन गेले व त्या कौतुकरसाची मोठी लाट उसळली.

दर अर्ध्या का एक तासाने निकालांच्या समालोचनाचा कार्यक्रम होत होता. बंगालच्या कोणा तरुण डॉ प्रणय रॉयला ही 'लाट' त्याच्या कॉम्प्यूटरवर दिसली होती म्हणे. त्याने आपले अंदाज अगदी भीत भीत सांगितले होते. त्याच्या 'कल' मापण्याचे यंत्रात २० टक्केपेक्षा जास्त घरे पण केली नव्हती व काही ठिकाणी 'कल' होता ३० ते ३५ टक्के ! ते यंत्रही त्या लाटेपुढे निकामी ठरले

आता सगळ्या पुढाऱ्यांचे आत्मनिरीक्षण सुरू झाले. विरोधी पक्षांचे दुःखाने तर कॉंग्रेस पक्ष पुढाऱ्यांचे आनंदाने ! फक्त एका बाबतीत ह्या दोन्ही बाजूच्या पुढाऱ्यांची एकवाक्यता होती. कोणालाही म्हणे ह्या लाटेची कल्पनाच नव्हती. विरोधी पक्ष नेत्यांना नव्हती वा विजेत्या पक्षाला !

पंतप्रधानांचा चेहरा तर परिक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थ्याला तो विश्वविद्यालयात पहिला आला असे कळल्यावर त्या विद्यार्थ्यांचा जसा होईल तसा झाला होता. दिल्लीतल्या दिल्लीत राहून तेथे त्यांच्या पक्षाला सगळ्या सातच्या सात जागा मिळतील असा संशय सुद्धा आला नव्हता मग खात्री कुठली ?

फक्त त्या बंगाली बाबूचा कॉम्प्यूटरच १०० टक्के बरोबर भाकीत करू शकला होता. पूर्वी बंगाली जादुगार असत. तसलाच हा डॉ. रॉय असला विचार श्यामचे मनात आला

'अरे ह्या काय बायका आहेत त्यांना आपल्या नवऱ्या-मुलांच्या जेवणाचे अंदाज करता येत नाहीत ? आणि हे पुढारी कसले, जिंकलेले असोत, हरलेले असोत, त्यांना आपल्या लोकांचा कल कुठे आहे, तो किती झुकलेला आहे ते कळत नाही, त्याचा अंदाज करता येत नाही ?

आणि हे पुढारी म्हणे जनता संपर्क ठेवून असतात, जनतेच्या नाडीवर ह्यांचा हात असतो म्हणे, मग ही कोणती जनता आणि ही कोठली नाडी ?

काही डावे–पुढारी तर अगदी तळागाळापर्यंत पोहोचले आहेत म्हणे. ते तळागाळात पोहोचले आहेत की तळागाळात बुडून गेले आहेत ?

ह्या सगळ्या प्रश्नांनी श्यामचे डोके अगदी पिंजून गेले. तोच दूरदर्शनवर पंतप्रधानाची धीरगंभीर छबी दिसू लागली. ते तेवढ्याच धीर गंभीरपणे म्हणत होते की, आता आपल्याला एकविसाव्या दशकात जायची तयारी करावयाची आहे.

'त्याला अजुनी १५ वर्षे म्हणजे कमीत कमी तीन निवडणुका आहेत हे विसरू नका.' श्याम नेहमीप्रमाणे मनाशी म्हणाला. ☐

**MANOOS WEEKLY** ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. **PNCW–28**

